
॥ डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी ॥



# डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार

MR
923.2
Am 16 D

प्रा. म. द. देशपांडे

MR
923.2
Am16D

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार

प्रा. म. द. देशपांडे

लोकवाङ्मय गृह

**डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार** / प्रा. म. द. देशपांडे
Dr. Ambedkar Yanche Rajkiya Vichar / Prof. M. D. Deshpande

Library IIAS, Shimla
MR 923.2 Am 16 D
00124312

म/१९८

© प्रा. म. द. देशपांडे

दुसरी आवृत्ती : मार्च १९९८
तिसरी आवृत्ती (I) : नोव्हेंबर २०००
चौथी आवृत्ती (I) : मे २००३
पाचवी आवृत्ती (I) : एप्रिल २००६

MR
923.2
Am16D

मुखपृष्ठ : कमल शेडगे

मूल्य : ३० रुपये

ISBN 81-86995-95-1

12431२
31.3.08

मुद्रक/प्रकाशक :
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन ,
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिशताब्दीनिमित्त त्यांच्या मूलभूत विचारांवर पुस्तकाच्यारुपाने ऊहापोह करणारा उपक्रम करावा असे आमच्या मनात आले. तसे डॉ. आंबेडकरांच्या विचारांविषयी व एकूण त्यांनी केलेल्या समाजक्रांतिच्या अग्रदूताची भूमिका लक्षात घेऊन खूप लिखाणही झालेले आहे. तरीही त्यातील विविध बाजूंचे पैलू उरतातच व नव्या प्राप्त परिस्थितीत त्यांना स्पर्श करण्याचा प्रयत्नही होत राहतो. क्रियाशील विचारवंत हा कोणाचा एकाचा न राहता तो नेहमी सर्वांचा असतो कारण त्यातील एकूण विचार हा मानवी कल्याणाचाच असतो. म्हणून वैचारिक संघर्षात गुंतलेल्या आपणा सर्वांना त्यातील विविध कंगोरे आणि गांभीर्य कळले तर सामाजिक क्रांतीची चळवळ अधिक वस्तुनिष्ठ व भक्कमपणे उभी राहते, असा अनुभव आहे.

ह्या पुस्तक-मालिकेत लेखन करणारी ही सर्व विचारवंत मंडळी स्वतःचा प्रागतिक वारसा सांगणारी व वैज्ञानिक दृष्टीकोनाने उपस्थित समस्यांची उकल करू पहाणारी, आणि वस्तुनिष्ठ भूमिकेने समाजप्रबोधनाच्या सर्वव्यापी चळवळीत गुंतलेली आहेत. ह्या मालिकेचे संपादक डॉ. अशोक चौसाळकर यांचे आम्हाला खूपच सहकार्य लाभले आहे. त्यांचे आम्ही आभार मानतो.

वाचक आणि कार्यकर्ते महात्मा जोतीराव फुले ह्यांच्या कार्याविषयी आम्ही प्रकाशित केलेल्या पुस्तक-मालिके इतकेच याही मालिकेचे स्वागत करतील असा पूर्ण भरवसा आहे.

—प्रकाशक

# प्रस्तावना

एक-दोन वर्षापूर्वी लोकवाङ्मयगृहाने म. जोतीराव फुल्यांच्या स्मृतिशताब्दी निमित्त त्यांच्या कार्याचे क्रांतिकारक स्वरूप स्पष्ट करणाऱ्या काही पुस्तिका प्रकाशित केल्या. या पुस्तिकांचे चांगले स्वागत झाले. इ. स. १९९१ हे वर्ष डॉ. बाबासोहब आंबेडकर यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्त डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्याची आणि विचार-संपदेची माहिती करून देणाऱ्या पुस्तिका लोकवाङ्मय गृहातर्फे प्रकाशित करण्याचे आम्ही ठरविले आहे.

भारतीय समाजक्रांतीच्या वाटचालीत डॉ. आंबेडकर यांचे स्थान महत्त्वाचे आहे. समाजातील जागृती आणि प्रगती संघर्षजन्य असते असे त्यांचे मत होते. त्यांचे कार्य आणि विचार आज भारतातील परिवर्तनवादी शक्तींना मार्गदर्शक ठरणारे आहेत. कारण आज देशभर सामाजिक न्याय प्रस्थपित करण्यासाठी साधन संपत्तीच्या समान वाटपासाठी आणि नव्या पुरोगामी संस्कृतीच्या स्थापनेसाठी पददलित आणि सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या अभावग्रस्त समाज, प्रस्थापितांशी जारीने संघर्ष करीत आहेत. या संघर्षांना वैचारिदृष्ट्या जास्त टोकदार बनविण्यासाठी त्यांना योग्य असा क्रांतिकारक आणि प्रगतीशील घाट देण्यासाठी बाबासाहेबांच्या विचारांची नव्या संदर्भात मांडणी करणे अगत्याचे बनत चालले आहे. त्यातूनच, विचारांना भारतीय संदर्भात नेमकेपणा येण्याची शक्यता आहे.

सध्या महाराष्ट्रात सुरू असणाऱ्या वेगवेगळ्या सामाजिक आणि राजकीय चळवळींना एक वैचारिक धार देण्यासाठी, त्यांचा आशय अधिक क्रांतिकारक व संपन्न करण्यासाठी या पुस्तिका आम्ही प्रकाशीत करीत आहोत. बाबासाहेबांच्या विचारांचा परामार्ष घेणाऱ्या या पुस्तिका, वेगवेगळ्या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना उपयुक्त वाटतील अशी आशा आहे.

या पुस्तक-मालेतील पहिली पुस्तिका, डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार ही आहे. या पुस्तिकेत डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही उदारमतवाद, राष्ट्रवाद, समाजवाद या संबंधींच्या विचारांचा परामर्ष घेण्यात आला आहे. डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणारी समग्र समाजक्रांती लोकशाही व समाजवादाच्या मार्गाने आपणास यशस्वी करता येईल, असे विचार या पुस्तिकेत प्रा. देशपांडे यांनी व्यक्त केले आहेत.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार संदर्भ आणि स्वरूप | १ |
| २. | डॉ. आंबेडकर आणि उदारमतवाद | ७ |
| ३. | डॉ. आंबेडकर आणि लोकशाही | १३ |
| ४. | डॉ. आंबेडकर आणि लोकशाही राज्याचे संघटन | २८ |
| ५. | डॉ. आंबेडकर आणि राष्ट्रवाद | ३३ |
| ६. | डॉ. आंबेडकर - राजकीय-सत्ता आणि राजकीय प्रतिकार | ३९ |
| ७. | डॉ. आंबेडकर आणि महात्मा गांधी | ४६ |
| ८. | डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना | ५२ |
| | संदर्भ | ५९ |

# १.

# डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार : संदर्भ व स्वरूप

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार - संदर्भ व स्वरूप :

### (१) समाजक्रांतीचा व्यापक संदर्भ :

आधुनिक भारताच्या उभारणीत व वाटचालीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका व योगदान अतिशय महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण आहे. विसाव्या शतकातील स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील इतिहासाचे आकलन व विवेचन, डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा आणि चळवळींचा संदर्भ व परामर्श घेतल्याखेरीज पूर्ण होणार नाही. डॉ. आंबेडकरांनी भारतातील समाजक्रांतीचा प्रवाह अधिक व्यापक, सखोल व सघन केला, यात कोणताही संदेह नाही. पारंपरिक भारतीय समाजव्यवस्था सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रातील विषमता, अन्याय, अज्ञान व दारिद्र्य यावर उभी होती. त्या समाजव्यवस्थेत शूद्र, अतिशूद्र, स्त्रिया यांना सर्वच मानवी हक्क नाकारले होते. मध्ययुगात संरजामी समाजरचनेला परंपरागत हिंदू धर्मविचारांचे व धर्मव्यवहारांचे अधिष्ठान होते. सर्वच सामाजिक संस्था बहुसंख्य असणाऱ्या कनिष्ठ जातींच्या, शूद्रातिशूद्रांच्या वा पूर्वास्पृश्यांच्या शोषणाची, दमनाची - पर्यायाने गुलामगिरीची साधने होती. बळीराजाला पाताळात दडपण्याचे वामनाचे कसब या समाजव्यवस्थेने आत्मसात केले होते.

या समाजव्यवस्थेतील गुलामगिरीविरुद्ध बहुसंख्य शोषितांच्या वतीने म. जोतीबा फुले यांनी आवाज उठविला. समता, स्वातंत्र्य, न्याय आदि आधुनिक मूल्यांवर आधारित नव्या समाजनिर्मितीसाठी विद्रोहाच्या व विधायकतेच्या विचारांचा आणि चळवळींचा पाया त्यांनी घातला. हळूहळू या समाजक्रांतीचा पाया रुंदावत गेला. राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रात होत चाललेल्या बदलांच्यामुळे या म. फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीत काही अपप्रवृत्ती शिरत होत्या. त्यामुळे समाजक्रांतीची गतिमानता व व्यापकता संकुचित होत गेली. याच वेळी ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी सत्तेविरुद्ध राजकीय स्वातंत्र्याचा लढा लो. टिळकांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस तीव्र करीत होती. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये जहाल व मवाळ किंवा नेमस्त असे दोन गट पडले होते. १९०७ च्या सुरत काँग्रेसमध्ये जहाल गटाला जरी वर्चस्व मिळाले नाही; तरी नेमस्तांचे सनदशीर राजकारण मात्र मागे पडले. संघर्षात्मक व जनसंघटित राजकारण होऊ लागले. केवळ राजकीय स्वातंत्र्यावर भर

व लक्ष देण्याने न्या. रानडे व ना. गोखले यांच्या उदारमतवादातील आणि म. फुले व आगरकर यांनी सुरू केलेल्या सामाजिक चळवळीतील सामाजिक समतेचा व स्वातंत्र्याचा विचार व आशय मागे पडू लागला. आधी राजकीय की आधी समाजिक सुधारणा ह्या दुर्दैवी वादाने समाजव्यवस्थेच्या आमूलाग्र परिवर्तनाची क्रिया खच्ची झाली. एवढेच नव्हे, तर सामाजिक समतेच्या व स्वातंत्र्याच्या दिशेने होणाऱ्या चळवळीने विकसीत होणारा आधुनिक राष्ट्रवादाचा विचारही बाजूला पडला आणि हिंदू-मुस्लिम परंपरा व धर्माधिष्ठित राष्ट्रवादाचा भारतीय राजकीय व सामाजिक जीवनात शिरकाव झाला.

## (२) घटनात्मक सुधारणा :

याच काळात १९०९ मध्ये घटनात्मक राजकीय सुधारणा जाहीर झाल्या. अंशतः प्रातिनिधिक जबाबदार संसदीय राज्यपद्धतीचे प्रस्थान ठेवण्यात आले. त्याच बरोबर धर्माच्या, जातीच्या व शिक्षण, संपत्तीच्या आधारावर मतदानाचा हक्क व मतदारसंघ अस्तित्वात आल्याने, जातीय राजकारणाला चालना मिळाली. हिंदू मुस्लिम धर्मनिष्ठ द्विराष्ट्रवादाची बीजे रोवली गेली. यावर मात करण्यासाठी काँग्रसने प्रयत्न केला. लो. टिळकांनी १९१६ मध्ये मुस्लिम लीगशी लखनौ करार करण्यात पुढाकार घेतला. पुढे १९१९ च्या घटनात्मक कायद्याने लोकप्रतिनिधींची संख्या व सत्ता वाढविली. परंतु अशा विभक्त मतदारसंघामुळे संसदीय शासन व राजकारण, समाजकारण एकसंध होण्याऐवजी समाज धार्मिक व जातीय गटात विघटित होण्याची क्रिया सुरू झाली.

## (३) म. गांधींचे आगमन :

या सुमारास म्हणजे १९१५ मध्ये म. गांधींचे दक्षिण आफ्रिकेतून भारतात आगमन झाले. म. गांधींच्या राजकीय क्षितिजावरील उदयाने व नेतृत्वाने काँग्रसचे राजकारण, स्वातंत्र्य चळवळ यांचे स्वरूप पार बदलून गेले. गांधींनी राजकीय स्वातंत्र्यासाठी संसदीय राजकारणापेक्षा जनचळवळीच्या व जनसंघटनेच्या सामर्थ्यावर भर दिला. तसेच विविध स्वरूपाच्या विधायक चळवळी व संघटना उभारून स्वातंत्र्याचा रचनात्मक आशय समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. राजकीय व सामाजिक चळवळी एकमेकांना मारक नसून नवसमाज निर्मितीसाठी त्या परस्परपूरक आहेत, एकाच वेळी समन्वयाने त्या चालू शकतात असे आग्रहाने प्रतिपादन केले. त्यासाठी अस्पृश्यता निवारण कार्य, स्त्री-जागृती व संघटन यांना उत्तेजन दिले. खादीचा, ग्रामोद्योगांचा, स्वावलंबनाचा आर्थिक कार्यक्रम, नई तालिम सारखा शैक्षणिक प्रयोग आणि धार्मिक व जातीय गटांच्या सामंजस्यासाठी सातत्याचे प्रयत्न गांधींनी केले. अशा प्रकारे विधायक कार्य व संघटना यांच्याबरोबरच राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा त्यांनी अधिक व्यापक व तीव्र केला. असहकार, सविनय कायदेभंग, निःशस्त्र प्रतिकार, सत्याग्रह अशा स्वरूपाचे राजकीय प्रतिकाराचे अहिंसक मार्ग त्यांनी अवलंबिले. त्यामुळे जनतेत एक प्रकारचे निर्भयता, निर्भरता, नैतिकता आणि नेतृत्व यांचे सामर्थ्य उभे राहिले.

गांधींच्या या विधायक व संघर्षात्मक चळवळीतून निर्माण झालेल्या वैचारिक स्त्रोतातून व कार्यातून जे प्रश्न व प्रवाह प्रत्यक्षात उद्भवले, त्यांच्याशी डॉ. आंबेडकरांना वाद-प्रतिवाद करावा लागला आणि साद-प्रतिसादही द्यावा लागला.

## (४) डॉ. आंबेडकरांचा उदय :

अमेरिका-इंग्लंडमधून आपले उच्च शिक्षण संपवून डॉ. आंबेडकर १९२३-२४ च्या सुमारास भारतात आले. आणि भारतातील समाजकारण व राजकारण याच क्षेत्रात एका नवीन पर्वाला सुरूवात झाली. आयुष्याच्या अखेरीपर्यंत डॉ. आंबेडकरांनी या पर्वाचे नेतृत्व केले. गांधी-आंबेडकर या नेतृत्वाच्या वाद-प्रतिवादातून व साद-प्रतिसादातून भारतीय समाजक्रांतीची वाटचाल होऊ लागली. काँग्रेस पक्ष वा गांधी हे अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधी नाहीत. त्यांची चळवळ ही केवळ अस्पृश्यता-निवारणाची चळवळ आहे, या समाजाचे दलितत्व निर्मूलन करणारी नाही; ती अस्पृश्यांना त्यांचे मानवी हक्क हे हक्क म्हणून, उपकार म्हणून नव्हे, मान्य करू शकणार नाही असे डॉ. आंबेडकरांचे म्हणणे होते. जातीय निवाड्यासंबंधात गांधी-आंबेडकर यांच्यामध्ये झालेला पुणे-करार हा या दोन नेत्यांच्या वैचारिक व कार्यात्मक भूमिकांच्या परस्पर प्रभावाचे दर्शन आहे. पुणे-करारानंतरच्या काळात, गांधींनी दलितांचे प्रश्न व चळवळ यासंबंधात व डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य व एकात्मतेच्या संबंधात नवी जाण दाखविली. यामुळे भारतीय समाजक्रांतीचा प्रवाह व्यापक व आशयसमृद्ध होऊ लागला.

## (५) वैचारिक जडणघडण :

डॉ. आंबेडकरांच्या समाजक्रांतीच्या राजकीय व आर्थिक विचाराला जागतिक संदर्भाचाही स्पर्श आहे. केवळ भारतीय भूमी व संदर्भात त्यांच्या विचारांची बीजे होती असे नाही. हिंदू वा बौद्ध साहित्य, धर्मग्रंथ यातील धार्मिक व सामाजिक तत्त्वविचारांचा त्यांच्या विचारांवर पाश्चिमात्य उदारमतवादी परंपरेचा मोठा प्रभाव आहे. भारतात ब्रिटिशांनी सुरू केलेल्या उदारमतवादी शिक्षणाने व अमेरिका - इंग्लंडमधील विद्यापीठीय शिक्षणाने विद्यार्थीदशेतच उदारमतवादी राजकीय - सामाजिक सिद्धांतांचा आणि जे. एस्. मिल, जेफरसन, बुकर टी. वॉशिंगटन यांच्या तसेच फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकन राज्यघटना यातील विचारांचा मोठा प्रभाव डॉ. आंबेडकरांच्यावर पडला. अमेरिका व इंग्लंड या देशातील वास्तव्यात तेथील उदारमतवादी राजकीय पद्धतीचा व शासनव्यवस्थेचा एक भारतीय व्यक्ती म्हणून त्यांनी अनुभव घेतला. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनेक भाषणात व लिखाणात लोकशाही, अध्यक्षीय शासनपद्धती, संसदीय शासनपद्धती, संघराज्य, एकात्म राज्यपद्धती आदिसंबंधात वेळोवेळी प्रसंगोपात्त विचार व मते व्यक्त केली आहेत. लोकशाहीत अंतर्भूत असलेल्या व्यक्ती समानता, व्यक्ती प्रतिष्ठा व व्यक्तीस्वातंत्र्य या संकल्पनांचा अनुभव त्यांना भारतात येणे शक्यच नव्हते. कारण भारतीय समाजव्यवस्थेत या आधुनिक मूल्यांना मुळीच स्थान नव्हते.

भारतातील सामाजिक वास्तव या मूल्यांविरुद्धच होते. भारतात आल्यावर, राजकीय आणि सामाजिक नेतृत्व करू लागल्यावर पाश्चिमात्य उदारमतवादाच्या मर्यादाही त्यांच्या लक्षात आल्या. उदारमतवादी राजकीय लोकशाहीत आर्थिक व सामाजिक आशय ओतल्याखेरीज समग्र व समृद्ध लोकशाही अस्तित्वात येऊ शकत नाही, या दिशेने ते लोकशाहीचा विचार करू लागले.

१९१७ साली रशियन राज्यक्रांती झाली. त्या वेळी ते इंग्लंडमध्येच होते. समाजवादी तत्त्वज्ञानाचा व समाजबांधणीचे निरीक्षण व अभ्यास ते करीत होते. मार्क्सवादी विचारांचा प्रभाव त्यांच्या मतावर होता. मजूर पक्षाची स्थापना व जाहीरनामा, कामगारांपुढील त्यांची भाषणे, राज्य-समाजवादाचा आर्थिक कार्यक्रम यातून समाजवादी विचारसरणीचा त्यांच्यावरील प्रभाव जाणवतो. परंतु हे बदल लोकशाही मार्गाने आणावेत असे त्यांचे मत होते. भारतीय समाजक्रांतीच्या संदर्भात, त्यांनी मार्क्सवादाची चिकित्सा करून त्यातील अपुरेपणाही दाखविला.

डॉ. आंबेडकरांच्या भारतीय समाजक्रांतीचा स्त्रोत हा हिंदूधर्माच्या कठोर चिकित्सेतून व टीकेतून निर्माण होतो. 'समाजक्रांतीची व मूलभूत परिवर्तनाची सुरुवात धर्मचिकित्सेतून होते', ह्या मार्क्सच्या मताशी ते सहमत होते असे दिसते. परंतु त्यांच्या समाजक्रांतीची अंतिम परिणती बौद्ध धर्माच्या सुधारित धर्मस्वरूपात होते. पूर्वास्पृश्यांचे हिंदूधर्मातून बौद्ध धर्माकडे हे आंबेडकरप्रणीत धर्मांतर हे त्यांना अभिप्रेत असलेल्या क्रांतीच्या प्रगतीतील महत्त्वाचे पाऊल वा वळण आहे यात शंका नाही. परंतु डॉ. आंबेडकरांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर त्यांनी सुरू केलेली चळवळ, याच वळणार थबकली आहे काय असे मानण्यास आज बराच वाव आहे. कारण आजची दलित चळवळ सांस्कृतिक व धार्मिक प्रश्नावर अधिक लक्ष केंद्रित करीत आहे व क्रांतीची अन्य क्षेत्रे दुर्लक्षित होत आहेत.

## (६) आधुनिक राष्ट्राचे स्वप्नचित्र :

१९२४ ते १९५५ या काळात भारतीय समाजाच्या राजकीय व सामाजिक भवितव्याला आकार व चालना देणाऱ्या बहुतांशी घटनांमागील एक प्रमुख शक्ती व नेता म्हणून डॉ. आंबेडकर कार्यशील राहिले. या काळात भारतीय समाजक्रांतीच्या गतिशील प्रवाहात जे प्रसंग व प्रश्न निर्माण झाले, त्याला डॉ. आंबेडकर स्वतःच्या बौद्धिक व नैतिक सामर्थ्यानिशी आणि अस्पृश्य समाजाच्या जागृत व संघटित शक्तीनिशी सामोरे गेले. अनेक सामाजिक, राजकीय, शक्ती, संस्था व व्यक्ती आणि घटना यांच्याशी विविध मार्गांनी संघर्ष व सहकार्य त्यांना करावे लागले. शासन, राजकीय पक्ष, सामाजिक-सांस्कृतिक संघटना, त्यांचे नेते व संस्था यांच्याशी संघर्ष-सहकार्य करताना, डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य समजाचे सर्वांगीण हित व अनुमती यांना अग्रकम देऊन ते साधण्याचा प्रयत्न तर केलाच, पण त्या समाजाला एक नवा

आत्मविश्वास व आत्मसन्मान प्राप्त करून दिला. आपल्या समाजाला मानवी हक्क व मानवी प्रतिष्ठा प्राप्त करून देत असताना,च ते एका नव्या व्यापक, आधुनिक राष्ट्रीय समाजाचे स्वप्नचित्र रंगवीत होते. राजकीय स्वातंत्र्याच्या प्रमुख राष्ट्रीय प्रवाहापासून त्यांनी आपली चळवळ प्रारंभी दूर ठेवली असली, तरी त्यांच्या चळवळीचा राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील वैचारिक रोख व आशय भारतीय समाजाच्या लोकशाही परिवर्तनाला, राष्ट्रीय एकात्मतेला पूरकच होता.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्षपद डॉ. आंबडेकरांना देण्यात आले. केवळ अभ्यासू घटनातज्ज्ञ म्हणून ही जबाबदारी त्यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली नाही, तर ते देशातील शोषित, दलित, उपेक्षित बहुसंख्य जनविभागाच्या आशा-आकांक्षांचे प्रवक्ते व प्रतीक होते. या सामान्य जनतेच्या विचार-भावना व अपेक्षा यांचा प्रभाव व प्रतिबिंब राज्यघटनेत, देशाच्या मूलभूत कायद्यात उतरावे यासाठी डॉ. आंबेडकरखेरीज दुसरी अन्य व्यक्ती असू शकत नव्हती. भारताच्या राजकीय स्वातंत्र्याने एका पारतंत्र्य युगाचा अंत घडविला आणि त्यानंतर स्वतंत्र भारताच्या डॉ. आंबेडकरप्रेरित राज्यघटनेने न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांवर आधारित लोकसत्ताक, धर्मनिरपेक्ष राष्ट्र व समाजनिर्मितीच्या युगाचा उदय झाला. या युगांतराच्या प्रेरणा भारतीय स्वातंत्र्य-लढ्याच्या व डॉ. आंबेडकरांच्या समाजक्रांतीच्या विचारात होत्या.

डॉ. आंबेडकर भारतीय समाजातील एका मोठ्या लोकविभागाला अनेक शतकांच्या दास्यातून व अपमानाच्या गर्तेतून मुक्त करणाऱ्या चळवळीचे नेतृत्व करीत असताना, राजकीय लढ्याच्या प्रक्रियेत अस्पृश्य समाजाचा दबाव व प्रभाव वाढविण्यासाठी काही तात्कालिक डावपेच करणे त्यांना अपरिहार्य ठरलेही. ते तात्कालिक संदर्भ असलेले राजकारण होते. प्रत्येक राजकीय शक्तीला ते करावे लागते. तात्कालिक संदर्भातील तडजोडीतून व डावपेचातून स्थायी व मूलभूत विचाराचे सुसंगत व सम्यक् दर्शन होतेच असे नाही. एकूण परिस्थितीच्या व परिवर्तनाच्या व्यापक संदर्भातूनच डॉ. आंबेडकरांच्या राजकीय, सामाजिक विचारांचा मागोवा घेतला पाहिजे.

## (७) राजकीय विचारवंत :

डॉ. आंबेडकर हे मूलतः एका क्रांतीप्रवाहाचे नेते होते. ते केवळ सामाजिक, राजकीय शास्त्रज्ञ नव्हते. त्यांनी राजकीय-सामाजिक आर्थिक सिद्धांतांची मूलतः स्वतंत्र अशी मांडणी केली नाही. परंतु क्रांतीच्या यशस्वीतेसाठी अशा सिद्धांतांवर चिंतन केले, मंथन केले व भाष्यही केले. कृतिप्रवण क्रांतीसंदर्भातील त्यांच्या सैद्धांतिक चिंतन-मंथनाचे दर्शन त्यांनी केलेल्या अगणित भाषणात, विपुल लेखनात (वृत्तपत्रीय लेख, ग्रंथ, मुलाखती, साक्षी आदि) आपणाला घडते. तसेच औपचारिक व अनौपचारिक, अधिकृत चर्चा-निवेदने, विविध शासकीय-अशासकीय समित्यांतील त्यांचे कार्य, निवेदने,

अहवाल, राजकीय पक्ष व शासन या पातळीवरील त्यांचे कार्य, विविध सामाजिक-राजकीय परिषदांतील सहभाग व त्यातील विचार-प्रदर्शन या सर्वांतून त्यांचे राजकीय-सामाजिक विचार विखुरलेले आहेत. या विचारांची व्यवस्थित, सुसंगत अशी मांडणी काही व्यापक शीर्षकाखाली व विभागाखाली करता येणे शक्य आहे. अशा प्रकारच्या मांडणीतून डॉ. आंबेडकरांची राजकीय विचारवंत म्हणून एक स्पष्ट प्रतिमा निर्माण होते.

एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, डॉ. आंबेडकर राजकीय संकल्पनांचा वा प्रश्नांचा विचार केवळ राजकीय दृष्टीतूनच करीत नव्हते. त्यांना केवळ राजकीय परिवर्तन अभिप्रेत नव्हते. एकूण समाजव्यवस्थेच्या आमूलाग्र परिवर्तनाच्या संदर्भात ते प्रत्येक राजकीय संकल्पनेचा व समस्येचा, संस्थेचा व शक्तींचा विचार करीत. त्यामुळे राजकीय सत्ता, राजकीय संघटन, राजकीय संघर्ष–सहकार, लोकशाही, राष्ट्रवाद, समाजवाद आदि संकल्पना व साधने–मार्ग यासंबंधांची त्यांची मते व विचार समकालीन नेत्यांपेक्षा व विचारवंतांपेक्षा भिन्न परंतु अधिक वास्तव व विकसनशील होते.

□ □ □

# २.

# डॉ. आंबेडकर आणि उदारमतवाद

## डॉ. आंबेडकर - उदारमतवादाचा विचार :

### (१) उदारमतवादाचा प्रभाव :

डॉ. आंबेडकरांच्या राजकीय व सामाजिक विचारांचा मगोवा घेत असताना त्यावरील पाश्चिमात्य उदारमतवादी विचारसरणीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. डॉ. आंबेडकरांच्या सर्व स्वरूपाच्या विविध प्रश्नांवरील लिखाणात व भाषणात उदारमतवादाच्या पायाभूत तत्त्वांचा व मूल्यांचा सातत्याने जाणीवपूर्वक आग्रही उल्लेख झालेला आहे हे आपणास समजून येते. किंबहुना उदारमतवादी स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्यत्रयी त्यांच्या सर्वंकष समाजक्रांतीची व नवसमाजनिर्मितीची मूलप्रेरणा आहे असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही. डॉ. आंबेडकरांचे समाजकारण, राजकारण आणि अर्थकारणही उदारमतवादाच्या या मूल्यांचीच विकसनशील अभिव्यक्ती आहे. मागे उल्लेख केल्याप्रमाणे त्यांच्या विद्यार्थीदशेतच ब्रिटिशांनी भारतात सुरू केलेल्या उच्च शिक्षणातून, तसेच अमेरिका-इंग्लंडमधील वास्तव्यातून व विद्यापीठीय शिक्षणातून उदारमतवादी बौद्धिक परंपरेचा संस्कार त्यांच्या व्यक्तित्त्वावर व विचारांवर झालेला होता. बर्क, जे. एस्. मिल्. जेफरसन, बुकर टी. वॉशिंग्टन, बुद्ध, कबीर, म. फुले अशांच्या आणि फ्रेंच-अमेरिकन राज्यक्रांतीच्या वैचारिक प्रेरणांनी त्यांचा जीवनविषयक उदारमतवादी दृष्टिकोण दृढतर झाला. केवळ राजकीय सिद्धांत म्हणूनच नव्हे, तर जीवनविषयक आदर्श तत्त्वप्रणाली म्हणूनही डॉ. आंबेडकरांनी उदारमतवादाचा स्वीकार व समर्थन केले आहे.

परंतु एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, डॉ. आंबेडकरांचे उदारमतवादी विचार पाश्चिमात्य उदारमतवादापेक्षा थोडेसे भिन्न आहेत. भारतीय समाजाच्या संदर्भात तर पाश्चिमात्य उदारमतवादाचा राजकीय सिद्धांत सामाजिक-आर्थिक विचार अपुरा पडतो आणि त्या विचाराला काही अन्य परिमाणांची जोड देणे आवश्यक आहे ही जाणीव डॉ. आंबेडकरांच्या विवेचनात प्रकर्षत्वाने आढळून येते.

### (२) भांडवली समाजाचा सैद्धांतिक पाया :

औद्योगिक क्रांती झाल्यावर पश्चिमेकडील राष्ट्रात जो नवा आधुनिक

औद्योगिक-भांडवली समाज निर्माण झाला, त्याचा सैद्धांतिक पाया म्हणून उदारमतवादी सिद्धांत पुढे आला व विकसीत झाला. नैसर्गिक व निरपवाद व्यक्ती हक्क, राज्यसंस्थेचा कमीत कमी हस्तक्षेप व किमान शासन, बाजाराधिष्ठित मुक्त अर्थव्यवस्था आणि बहुसंख्यांकांच्या पाठिंब्यावर कार्यरत असणारी प्रातिनिधीक-अप्रत्यक्ष लोकशाही राज्यपद्धती अशा गृहितकृत्यांवर पाश्चिमात्य उदारमतवादी लोकशाही विचारसणीची उभारणी झाली. या विचारसरणीत अंतर्भूत असलेले सर्वच विचार जसेच्या तसे डॉ. आंबेडकरांना मान्य होते असे नाही. उदाहरणार्थ, उदारमतवादातील व्यक्तीचे हक्क, व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तीप्रतिष्ठा व व्यक्तिविकास या संकल्पनांबद्दल जरी त्यांना जबरदस्त आकर्षण होते, तरी व्यक्ती व समाज यांच्या परस्पर संबंधांच्या संदर्भात त्यांची मते काहीशी भिन्नच होती. उदारमतवादातील राजकीय व्यवस्थेच्या स्वरूपासंबंधीचे व कार्यप्रणालीसंबंधीचे विचार त्यांना बव्हंशी मान्य होतेच. म्हणून तर संसदीय लोकशाही, घटनात्मक मार्ग व नीतिमत्ता, स्वतंत्र न्यायसंस्था आदि विचार व संस्थात्मक प्रवृत्ती यांचा जोरदार पुरस्कार त्यांनी केला. परंतु उदारमतवादाचे आर्थिक विचार मात्र त्यांना मान्य नव्हते. डॉ. आंबेडकरांनी आर्थिक क्षेत्रातील सरकारच्या निर्हस्तक्षेपाच्या भूमिकेला, अनिर्बंध व अनियंत्रित मुक्त अर्थव्यवस्थेला मुळीच पाठिंबा दिलेला नाही. उलट राज्यसमाजवादाचा पुरस्कार त्यांनी केला. समाजवादातील आर्थिक समतेची व न्यायाची प्रेरणा आणि नियोजनाची आवश्यकता त्यांनी स्वीकारली होती. तरी पण राजकीय लोकशाहीच्या माध्यमातून ही प्रेरणा कार्यशील केली पाहिजे असे त्यांचे मत होते.

## (३) उदारमतवादाच्या पलीकडे :

काही बाबतीत पाश्चिमात्य उदारमतवादाच्या पलीकडे वैचारिक झेप घेण्याचा प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केला. त्यामुळे काही अभ्यासक असाही दावा करतात की, ते उदारमतवादी नाहीतच. त्यांच्या उदारमतवादी विचारात अंतर्विरोध नसला, तरी विरोधाभास व विसंगती आहे. 'मी उदारमतवादी नाही' असे डॉ. आंबेडकरांनी 'रानडे, गांधी व जीना' यावरील भाषणात स्वतःच म्हटले असले, तरी तो संदर्भ निराळा होता. या संदर्भातदेखील त्यांनी न्या. रानड्यांच्या उदारमतवादी विचारांची भलावण केली होती. यावरून हे स्पष्ट होते की, डॉ. आंबेडकर हे पूर्णतः उदारमतवादी नसले तरी त्यांच्यावर पाश्चिमात्य उदारमतवादाचा वैचारिक प्रभाव होता हे निःसंशय, भारतीय समाजाच्या संदर्भात त्यांनी उदारमतवादी लोकशाहीच्या विचाराला व्यापक परिवर्तनशीलतेचे व समाजाभिमुखतेचे प्रवाही परिमाण दिले.

## (४) व्यक्ती व वर्ग :

'व्यक्तिवादी हितसंबंधांच्या संवर्धनासाठी व्यक्ती म्हणून परस्परसंबंध असलेल्या व्यक्ती-व्यक्तींनी समाज बनतो.' ही पाश्चिमात्य उदारमतवादाची संकल्पना डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हती. त्यांच्या मते 'समाज हा विविध वर्गांचा, समूहांचा वा

गटांचा समुच्चय होय.' हे वर्ग वा समूह आर्थिक, सामाजिक इत्यादी स्वरूपाचे असू शकतात. पण समाजातील व्यक्ती ही नेहमीच कोणत्या ना कोणत्या तरी वर्गाची सदस्य असते. डॉ. आंबेडकरांच्या विचारात समाज ही वर्ग वा समूहनात्यांची व्यवस्था आहे ही कल्पना प्रभावी दिसते. भारतीय समाजकारणाचा व राजकारणाचा डॉ. आंबेडकरांनी लावलेल्या अन्वयार्थाचा हा विचार तात्त्विक आधार आहे. उदारमतवाद वर्ग वा समूह यांचे अस्तित्व नाकारीत नाही. परंतु स्वतंत्र व्यक्ती व व्यक्तिगत संबंध यांना प्राधान्य देऊन वर्ग वा समूह हे गौण, दुय्यम आहेत असे उदारमतवादातील व्यक्तिवाद अमान्य करतात, पण त्यातील वर्गसंकल्पना स्वीकारतात. 'जात हा बंदिस्त वर्ग आहे,' डॉ. आंबेडकरांच्या या विचारात हे दर्शित होते.

## (५) समाज व राज्य :

समाज व राज्य यांच्या परस्पर संबंधांचाही विचार पाश्चिमात्य उदारमतवादात अंतर्भूत आहे. या संदर्भातही डॉ. आंबेडकरांची मते थोडी वेगळी आहेत. त्यांच्या या वेगळ्या विचारांचा परिणाम भारतीय समाजकारण व राजकारण यावर अपरिहार्यपणे झाला आहे. पाश्चिमात्य उदारमतवाद समाज आणि राज्य या दोन्ही संस्था व व्यवस्था एकमेकांपासून अलग, स्वतंत्र व स्वायत्त आहेत, या दोन्ही व्यवस्थांमध्ये एक प्रकारचे द्वैत आहे असे मानतो. मिल्सारख्या उदारमतवादी विचारवंत तर असे म्हणतो की, मानवी स्वभावातील आप-पर प्रवृत्तीतूनच हे समाज-राज्य संस्थात्मक द्वैत निर्माण होते. पण डॉ. आंबेडकरांचा उदारमतवादी विचार 'समाज ही समग्र व्यवस्था आहे आणि राज्यव्यवस्था हा तिचा एक विशेष स्वरूपाचा भाग आहे' असे मानतो. त्यांच्या दृष्टीने समाज व राज्य यामधील संबंध स्वतंत्र, स्वायत्त व विभक्त नाहीत. व्यापक समाजव्यवस्थेचा राज्यसंस्था हा एक अविभक्तपणे निगडित भाग असल्याने, सामाजिकता व सामाजिक गोष्टी यांना राजकीयतेपेक्षा व राजकीय बाबींपेक्षा अग्रक्रम व अधिक श्रेष्ठत्व असणे आवश्यक आहे.

## (६) सामाजिक क्रांतीशिवाय राज्यक्रांती अर्थहीन :

डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक-राजकीय क्षेत्रातील उदयाच्या आधीपासूनच भारतीय सार्वजनिक जीवनात 'सामाजिक की राजकीय' असा वाद निर्माण झाला होता. या वादाला वस्तुतः कोणताही सैद्धांतिक पाया नव्हता. तो केवळ सोयीचा, तपशीलाचा भाग आहे असे मानून, त्याच्या व्यावहारिक पातळीवरच विचार होत होता. डॉ. आंबेडकरांनी या वादाला उदारमतवादाचे नवे परिमाण देऊन सैद्धांतिक पातळीवर तो वाद नेला. राज्य हे व्यापक समाजाचे एक अविभाज्य अंग आहे. समाज-व्यवस्थांतराने राजकीय क्रांती गतिमान व आशयपूर्ण होते असा विचार त्यांनी मांडला. तत्कालीन काँग्रेसनेही पाश्चिमात्य उदारमतवादी दृष्टिकोण स्वीकारून प्रथम राजकीय स्वातंत्र्य, प्रथम राजकीय सुधारणा आणि नंतर सामाजिक सुधारणा. राजकीय स्वातंत्र्यानंतर

सामाजिक परिवर्तन आपोआप घडून येईल असे गृहीत धरून चालले होते. डॉ. आंबेडकरांनी या गृहीताला विरोध केला. त्यांच्या मते भारतीय समाजात जातिव्यवस्थेचे निर्मूलन यासारख्या पायभूत सामाजिक सुधारणांना अग्रक्रम दिल्याखेरीज राजकीय वा आर्थिक सुधारणाही प्रभावी व अर्थपूर्ण ठरणार नाहीत. काँग्रेसमधील उदारमतवादांच्या सामाजिक सुधारणा वरपांगी स्वरूपाच्या होत्या. सामाजिक क्रांतीच्या गाभ्याला म्हणजेच जातीसारख्या समाजव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असणाऱ्या संस्थांच्या व प्रवृत्तींच्या निर्मूलनाला ते स्पर्शही करीत नव्हते. भारतातील तत्कालीन राजकीय जहाल व नंतर मार्क्सवादी यांनी, डॉ. आंबेडकरांच्या 'सामाजिक क्रांतीला प्राधान्य दिल्याखेरीज आर्थिक वा राजकीय क्रांती अर्थहीन व अपुरी राहील' या इशाऱ्याकडे दुर्लक्षच केले होते.

## (७) उदारमतवादाला नवा आशय व दिशा :

पाश्चिमात्य उदारमतवादाने मुक्त व्यक्ती-स्वातंत्र्याचे खूपचं समर्थन केले. परंतु डॉ. आंबेडकरांच्या मते मुक्त व्यक्तीवाद हा एक मोठा आभास आहे. तसेच भारतातील समाजव्यवस्थेच्या संदर्भात त्यांनी उदारमतवादी विचाराला काहीशी मुरड घातली. भारतीय राजकारणात त्यांनी अस्पृश्यांच्या जातीय राजकारणावर प्रारंभी दिलेला जोर, अस्पृश्यांसाठी केलेली विभक्त मतदार संघाची मागणी, 'घटनात्मक प्रश्न हे प्रामुख्याने गुणवत्तेचे प्रश्न नाहीत, ते बळांचे प्रश्न आहेत.' अशा स्वरूपाची त्यांनी केलेली विधाने यावरून डॉ. आंबेडकर पूर्णतः उदारमतवादी आहेत असे दिसत नाही. डॉ. आंबेडकरांचे काही राजकीय विचार व कृती यात उदारमतवादाला कलाटणी देणारे काही अंतर्गत प्रवाह आहेत. परंतु भारतीय समाजव्यवस्थेच्या ऐतिहासिक वास्तवाच्या प्रत्यक्ष अनुभवाने त्यांना तशा स्वरूपाची भूमिका घेणे भाग पडले. तरी ते अंतिमतः उदारमतवादाच्या राजकीय प्रणालीचे पुरस्कर्तेच राहिले. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राज्यघटनेत त्यांच्या उदारमतवादी विचारांचा स्त्रोत ठळकपणे दर्शित होतो. यावरून असे म्हणता येईल की, डॉ. आंबेडकरांनी भारतातील सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात उदारमतवादी विचाराला त्याच्या सामर्थ्याचे व मर्यादांचे भान ठेवून नवा आशय व दिशा दिली. त्यांच्या राजकीय विचाराची मध्यवर्ती प्रेरणा उदारमतवादाचीच होती. स्वातंत्र्य-समता-बंधुता या उदारमतवादाच्या पायाभूत मूल्यविचारांचा विकास डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारातच नव्हे, तर एकूण विचारविश्वातच दिसून येतो.

डॉ. आंबेडकरांनी उदारमतवादी विचारात केलेला बदल, उदारमतवादाशी सुसंगत नाही असे म्हणून त्याचे आकलन होत नाही. व्यक्तीचे हक्क वा स्वातंत्र्य, हे व्यक्तीविकासाचे व व्यक्तीप्रतिष्ठेचे महत्त्वाचे साधन आहे. हे त्यांना पूर्णतः मान्य आहे, परंतु या हक्कांना व स्वातंत्र्याला घटनात्मक संरक्षण देण्यानेच व्यक्तीला विकासाचा व प्रतिष्ठेचा अनुभव येईल असे नाही. व्यक्ती ज्या सामाजिक वातावरणात व व्यवस्थेच्या चौकटीत राहते, त्यातील सामाजिक शक्तीकडून, संस्थांकडून अन्याय, शोषण वा दडपणूक होऊ शकते आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्य, हक्क, विकास व प्रतिष्ठा यांना

बाधा येऊ शकते. म्हणून केवळ राजकीय स्वातंत्र्य, हक्क मिळाले की व्यक्तीच्या विकासाला व प्रतिष्ठेला आवश्यक असणाऱ्या सामाजिक न्यायाच्या, समतेच्या व बंधुभावाच्या शक्तीप्रवृत्ती कार्यप्रवण व प्रवाहित होतात असे नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुता या दिशेने होणारे सामाजिक परिवर्तन हेच व्यक्ती-स्वातंत्र्य, विकास व प्रतिष्ठा यांना संरक्षण देते. परिवर्तनाच्या या सामाजिक प्रेरणांना डॉ. आंबेडकरांनी आपल्या विचारात प्राधान्य दिले. यामुळेच हे परिवर्तन पुरोगामी, विवेकनिष्ठ व सुव्यवस्थित-रीत्या उत्क्रांत होत असते. डॉ. आंबेडकरांची उदारमतवादाची अशी धारणा होती. म्हणून ते उदारमतवादी होते की नव्हते असा प्रश्न अनाठायी आहे. एकूण समाजाच्या आमूलाग्र, परिवर्तन प्रक्रियेच्या संदर्भात त्यांना उदारमतवादाच्या मूल्यप्रेरणांनी विचारप्रेरित व कार्यप्रेरित केले हे निश्चित.

## (८) व्यक्ती हित व समाज हित :

डॉ. आंबेडकरांच्या उदारमतवादी विचारांची चिकित्सा करताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती ही की, त्यांना उदारमतवादातील अनिर्बंध व्यक्तिवाद मान्य नाही. त्यांच्या मते व्यक्ती ही कोणत्या तरी वर्गाची व समूहांची सदस्य असते. तेव्हा व्यक्ती-हित व समूह-हित यांच्यामध्ये विरोध निर्माण झाल्यास, त्यामध्ये समन्वय घालणे आवश्यक ठरते. तरच परिवर्तनाची क्रिया सुकर होईल. अन्यथा व्यक्ती व समाज यामधील परस्परसंबंध तणावपूर्ण व प्रक्षोभक बनतील. व्यक्ती-हक्काची व स्वातंत्र्याची प्रेरणा आणि सामाजिक-आर्थिक क्षेत्रातील समूहहिताच्या, समानतेच्या व न्यायाच्या प्रेरणा यात निर्माणक्षण समन्वय घातला गेला पाहिजे. नाहीतर प्रक्षुब्ध उद्रेकाच्या भोवऱ्यात समाजजीवन अडकून राहील याचे भान डॉ. आंबेडकरांना होते. उदारमतवादी विचाराबरोबर समाजाच्या पुनर्रचनेच्या अन्य तत्त्वज्ञानांचा अभ्यास व चिंतन त्यांनी केले होते. १९१७च्या रशियन क्रांतीनंतर जागतिक व भारतीय पातळीवर समाजवादी विचारसरणी व चळवळ प्रसृत होत होती. याची दखल डॉ. आंबेडकर आपल्या लेखनात, भाषणात व चिंतनात घेत होते. उदारमतवादी लोकशाही व समाजवाद या दोन प्रणालींच्या तात्त्विक प्रेरणा परस्परविरोधी आहेत. पहिली मुक्त व्यक्तीवादी तर दुसरी समूहवादी. व्यक्ती-हित व समूह-हित यात मेळ घालावयाचा तर उदारमतवादातील राजकीय विचार व समाजवादातील आर्थिक समतेचा, सामाजिक न्यायाचा विचार यांचा समन्वय घडवून आणला पाहिजे. लोकशाहीच्या मार्गाने समाजवाद प्रत्यक्षात आणता येतील ही लोकशाही समाजवादाची संकल्पना त्यांना मान्य होती. स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा, स्टेट्स अँड मायनॉरिटीज, त्यांनी परिश्रम घेऊन केलेली भारतीय राज्यघटना आणि शेवटी बौद्ध धर्माचा अंगिकार अशा वेगवेगळ्या लिखाणात आणि घटनात लोकशाहीचा व समाजवादाचा विचार समन्वित करण्याचा प्रयत्न स्पष्टपणे दिसून येतो.

## (९) मूल्य समन्वयाचे अधिष्ठान :

डॉ. आंबेडकरांनी आपले सामाजिक तत्त्वज्ञान स्वातंत्र्य-समता-बंधुत्व या तीन मूल्यात प्रतिबिंबित होते असे स्वतःच म्हटले आहे. नव्या समाजव्यवस्थेच्या उभारणीत या तीनही मूल्यात अंगभूत असणारा विरोध कमी करून, त्यामध्ये विकसनशील स्वरूपाचा समतोल साधणे आवश्यक आहे. उदारमतवादी लोकशाही वा साम्यवादी समाज किंवा धर्मनिष्ठ समाज अशा एकेका स्वतंत्र समाजरचनेत हे मूल्यसंतुलन होत नाही. कारण एकाच मूल्यावर त्यांचा एकांगी भर असतो. विविध मूल्यांची समग्रता त्यामध्ये प्रतीत व प्रतिबिंबित होत नाही. या मूल्यसमग्रतेच्यां अभावी त्या समाजरचनेत अन्य मूल्यांचा वा मूल्याचा बळी जातो. त्यामुळे समाजरचना विषम, विकृत व विघटित होते. डॉ. आंबेडकरांना जी समाजव्यवस्था अभिप्रेत आहे, ती या पायाभूत मूल्यांच्या संयोगावर वा समन्वयावर अधिष्ठित असणारी आहे. पाश्चिमात्य उदारमतवाद व्यक्तीस्वातंत्र्याच्या तत्त्वावर मुक्त व्यक्ती-वादावर अतिरिक्त भर देतो. तर सोवियत साम्यवाद केवळ आर्थिक समतेवर सारे लक्ष केंद्रित करतो आणि धर्मनिष्ठ समाज तर मानवी हक्कांचा व समाजांच्या भौतिक अधिष्ठानाचा विचार न करता, समाजाला धार्मिक संप्रदायाच्या सापळ्यात गुलाम म्हणून अडकवितो. त्यामुळे अशा समाजपद्धती न्याय्य व नैतिक असू शकत नाहीत. स्वातंत्र-समता-बंधुता यांचा समुच्चय म्हणजे न्याय आणि ही न्यायसंकल्पना मानवी नीतीमत्तेचे उगमस्थान आहे, पारलौकिकतेशी नाते जोडणारा सांप्रदायिक धर्म नाही असे डॉ. आंबेडकर मानत असत. त्यांच्या लोकशाही समाजव्यवस्थेचा विचार केवळ उदारमतवाद, समाजवाद यांच्या वैचारिक प्रेरणावर आधारित नाही, तर मानवी विवेक व करुणाप्रेरित पारिवारिक भावबंधावर आधारित आहे. स्वातंत्र्य व समता या मूल्यातील अंगभूत विरोधाची धार बंधुत्वाच्या, ममत्वाच्या भावनेने कमी होऊन एक प्रकारचा प्रागतिक, विकसनशील मूल्यसमन्वय डॉ. आंबेडकरांच्या समग्र लोकशाहीच्या संकल्पनेत होऊ शकतो. डॉ. आंबेडकरांनी या मूल्यांना आणि आदर्शांना दिलेला नवा अर्थ आजच्या जागतिक बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात मार्गदर्शक ठरू शकतो.

□ □ □

# ३.

# डॉ. आंबेडकर आणि लोकशाही

## डॉ. आंबेडकर - समग्र लोकशाही व संकल्पना :

### (१) समग्र परिवर्तन विचार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीची संकल्पना ही त्यांनी भारतीय राजकीय विचाराला दिलेली वैशिष्ट्यपूर्ण अशी देणगी आहे. डॉ. आंबेडकर लोकशाहीचा विचार समाज, जीवनाच्या वास्तवतेच्या समग्र संदर्भात करतात. लोकशाही विचाराचा राजकीय क्षेत्रात जेवढ्या उत्कटतेने आग्रह धरला जातो, तितका उत्कट आग्रह आर्थिक व सामाजिक क्षेत्रात धरला जात नाही. आर्थिक वा सामाजिक वास्तवाच्या संदर्भात राजकीय लोकशाहीच्या विचारांची व कार्यपद्धतीची चिकित्सा व मूल्यमापन केले पाहिजे, अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती. फ्रेंच राज्यक्रांतीच्या व पाश्चिमात्य उदारमतवादी लोकाशाहीच्या स्वातंत्र्य-समता-बंधुता या प्रेरणांचा आविष्कार केवळ राजकीय जीवनातच न होता, सामाजिक-आर्थिक जीवनात तो होण्यानेच लोकशाहीचा समग्र व समृद्ध अनुभव समाजातील सर्व लोकांना येतो. पाश्चिमात्य उदारमतवादी लोकशाही समाज जीवनातील विविध सामाजिक-आर्थिक गटांच्या व वर्गांच्या हितसंबंधात व्यक्त व सुप्त विरोध व विषमता असते. याचा अपरिहार्य परिणाम राजकीय सत्तारचनेवर होत असतो. सामाजिक-आर्थिकदृष्ट्या उच्च व बलिष्ठ असणाऱ्या वर्ग-गटांमधूनच सत्ताधारी वर्ग निर्माण होतो. पाश्चिमात्य लोकशाही, समाजातील या अंतर्गत विषमतेचे वा विरोधी हितसंबंधांचे हे वास्तव लक्षात घेत नाही. त्यामुळे बुहसंख्य शोषित व शासित लोकांच्या दृष्टीने उदारमतवादी राजकीय लोकशाही एक औपचारिक प्रक्रिया ठरते. अनेक पाश्चिमात्य-उदारमतवादी विचारवंतांनी लोकशाहीकडे केवळ एक औपचारिक शासनप्रकार व राज्यपद्धती म्हणून पाहिले. 'लोकांनी लोकांच्यासाठी लोकांचे शासन' (अब्राहम लिंकन); 'चर्चेतून शासन' (बेगहॉट) आदि लोकशाहीच्या व्याख्यातून हीच दृष्टी व्यक्त होते. लास्की, मॅक आयव्हर, लिंडसे आदि राज्यशास्त्रज्ञांनी थोड्याफार प्रमाणात लोकशाहीचा विचार लोकांच्या सामाजिक-आर्थिक वर्गगटांच्या संदर्भात केला.

डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाही हा समाजाच्या समग्र परिवर्तनाचा विचार आहे. केवळ राजकीय लोकशाहीने समाजाचे आमूलाग्र परिवर्तन होणार नाही. त्यासाठी

सामाजिक-आर्थिक लोकशाहीची जोड दिली तरच राजकीय लोकशाही टिकणार आहे. सामाजिक-आर्थिकदृष्ट्या शोषित, दलित आणि सत्तावंचित असलेल्या वर्गाला, समूहाला सत्ताप्राप्तीची व्यापक संधी व समान सामर्थ्य असणे ही लोकशाहीची महत्त्वाची आवश्यकता आहे, अशी डॉ. आंबेडकरांची दृढ धारणा होती. सर्वच दृष्टीने उपेक्षित असणाऱ्या वर्गांना वा समूहांना लोकशाहीतील प्रौढ मतदानाच्या राजकीय हक्काने सत्तारचनेत प्रवेश मिळण्याच्या संधीचा संभव असला, तरी या वर्गांना सामाजिक-आर्थिक समानता व सामर्थ्य नसल्याने राजकीय हक्क केवळ आभास ठरतात. अशी लोकशाही बलिष्ठ अल्पसंख्य वर्गासाठी मक्तेदारी आणि पददलित बहुसंख्य वर्गासाठी मृगजल ठरते. म्हणून राजकीय लोकशाहीला सामाजिक-आर्थिक न्यायाचा पाया देऊन समग्र लोकशाही समाजजीवनाचे आमूलाग्र परिवर्तन घडविता येईल असा डॉ. आंबेडकरांचा विश्वास होता.

डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही विचारात राजकीय-आर्थिक-सामाजिक लोकशाहीचा एकत्रित विचार अंतर्भूत आहे. त्यांच्या मते लोकशाहीची स्वातंत्र्य-समता-बंधुता ही जी पायाभूत तत्त्वे आहेत, त्यावर समाजजीवनाच्या या क्षेत्रांची उभारणी झाली पाहिजे. हा विचार मांडताना डॉ. आंबेडकर लोकशाहीच्या पायाभूत तत्त्वांचा भावात्मक आशयाच्या दृष्टीतून विचार करतात. ही तत्त्वे म्हणजे केवळ पोकळ घोषणा नाहीत, तर समाजाच्या सर्वच घटकांच्या, विशेषतः शोषित-दलित घटकांच्या प्रत्यक्षातील अनुभूतीची ती बाब आहे, असे ते मानतात.

## (२) स्वातंत्र्य मूल्यविचार :

स्वातंत्र्य म्हणजे नियंत्रणाचा अभाव अशी अभावात्मक संकल्पना डॉ. आंबेडकरांना मान्य नाही. स्वातंत्र्याचा नकारात्मक विचार आत्यंतिक व्यक्तीवादाला व बलिष्ठांच्या सर्व प्रकारच्या मक्तेदारी सत्तेला आणि वर्चस्ववादाला जन्म देतो. डॉ. आंबेडकर स्वातंत्र्याचा भावात्मक आशयाच्या दृष्टीतून अर्थ लावतात. त्यांच्या मते स्वातंत्र्य म्हणजे व्यक्ती वा समूहविकासाची प्रत्यक्ष संधी, सुविधा व समर्थता होय.

सामाजिक, आर्थिक, भौतिक व बौद्धिक अनुकूलतेच्या परिस्थितीतच मूलभूत व्यक्ती-हक्कांचा उपभोग घेता येतो. अशा अनुकूल परिस्थितीचा भावात्मक संदर्भ स्वातंत्र्य संकल्पनेला आहे असे ते मानत. व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचा व स्वातंत्र्याचा राज्यघटनेत केवळ उल्लेख करणे आणि प्रौढ मतदानाचा अधिकार देणे, एवढ्यानेच स्वातंत्र्य उपभोगता येते असे नाही. घटनात्मक लोकशाहीत राज्याच्या वा शासनसंस्थेच्या सत्तेवर, अधिकारक्षेत्रावर व्यक्तीच्या नैसर्गिक, मानवी वा मूलभूत हक्कांच्या स्वरूपात मर्यादा व निर्बंध निश्चितच असतात. पण याचा अर्थ असा नव्हे की, शासनसत्तेवर घटनात्मक बंधने टाकली किंवा व्यक्ती-हक्कांना घटनात्मक संरक्षण दिले की, स्वातंत्र्याच्या भावात्मक आशयाची प्रत्यक्ष अनुभूती व्यक्ती वा समूहाला घेता येते.

कारण समाजात व्यक्तीचे वा वर्गाचे स्वातंत्र्य हिरावून घेणारी, ते मर्यादित करणारी राज्यसत्ता ही एकच शक्ती नाही, तर सामाजिक-आर्थिक क्षेत्रातील विषमता, अन्याय, शोषण व अमानुषता यांचे पोषण करणाऱ्या विविध शक्ती ह्या स्वातंत्र्यावर घाला घालू शकतात आणि विकासाच्या संधी, सुविधा व क्षमता यापासून व्यक्तीला-समूहाला वंचित ठेवू शकतात. व्यक्ती व समूह यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रस्थापित सामाजिक व आर्थिक शक्तींचे स्वरूप व संदर्भ बदलून, समतेच्या तत्त्वांवर त्यांची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्याला अशा प्रकारच्या आर्थिक-सामाजिक समानतेचा संदर्भ मिळाला नाही, तर त्या स्वातंत्र्याचा, हक्कांचा गरीबाला, बेकाराला, शेतमजुराला, कामगाराला काहीच उपयोग होणार नाही. उच्चवर्णीय व उच्चवर्गीय बलिष्ठांच्याच विलासाचे असले स्वातंत्र्य साधन बनेल. शोषित व पददलित वर्गाच्या दृष्टीने स्वातंत्र्य संकल्पनेत विकासाच्या समान संधींचा, सुविधांचा व क्षमतांचा समावेश होतो. असे डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत होते.

## (३) समता-मूल्य संकल्पना :

डॉ. आंबेडकरांनी 'स्वातंत्र्य' या लोकशाहीच्या तत्त्वाचा अर्थ व आशय समतेच्या विचाराशी जोडला. स्वातंत्र्याचा विचार समतेच्या विचाराखेरीज पूर्ण होऊ शकत नाही. 'प्रस्थापित समाजव्यवस्थेतील सामाजिक-आर्थिक समतेच्या संदर्भाखेरीज असलेले राज्यसत्तेपासूनचे स्वातंत्र्य हे खाजगी मालकाच्या हुकुमशाहीचे दुसरे नाव आहे' असे ते म्हणत. स्वातंत्र्य व समता या संकल्पनांना केवळ व्यक्ती वा राज्य यांच्या संबंधांचाच संदर्भ नाही. या संकल्पनांचा विचार मागासवर्ग व गट यांच्या सामाजिक, आर्थिक अशा एकत्रित उन्नतीच्या संधी व समतेच्या विकासाच्या संदर्भात केला तर या दोन्ही संकल्पना परस्पर पूरक व प्रेरक ठरतात. याच व्यापक संदर्भात त्यांना स्वातंत्र्य व समता या संकल्पनांचा निर्माणक्षम समन्वय अभिप्रेत होता. पाश्चिमात्य भांडवलशाहीने तेथील संरजामी समाजव्यवस्थेचा अंत केला. भांडवलशाही विकासात पाश्चिमात्य समाज आर्थिकदृष्ट्या विभागला गेला तरी सामाजिकदृष्ट्या एकजिनसी बनत राहिला. म्हणून पाश्चिमात्य लोकशाही विचारवंतांच्या समतेच्या विचारात, सामाजिक समतेवर जोर दिलेला दिसत नाही. भारतीय समाजरचनाच वर्णीय-जातीय व तज्जन्य आर्थिक, सांस्कृतिक विषमतेवंर व दास्यावर आधारलेली असल्याने तीमध्ये सामाजिक-आर्थिक विषमता, अन्याय व गुलामगिरी अंगभूत होती. भारतातील अस्पृश्य समाजाला शतकानुशतके आणि खुद्द डॉ. आंबेडकरांना त्यांच्या काळात या सामाजिक-आर्थिक विषमतेचे चटके सहन करावे लागले होते. भारतीय समाजाचा हा सामाजिक विषमतेचा पाया उखडल्याखेरीज राजकीय-आर्थिक स्वातंत्र्य-समस्येच्या हक्कांना अर्थ राहणार नाही याची त्यांना तीव्र जाणीव होती. भारतातील वर्ण-जातीव्यवस्थेतून निर्माण होणारी सामाजिक विषमता व तिचे निर्मूलन हा त्यांच्या चिंतनाचा, चिकित्सेचा व चळवळींचा मूळ पाया होता.

समता एक तत्त्व म्हणून विवेचन करताना डॉ. आंबेडकरांनी राजकीय लोकशाहीतील समान मताधिकाराचे, सार्वत्रिक, प्रौढ मतदानाचे समर्थन केले. त्यांच्या दृष्टीने 'एक व्यक्ती, एक मत' या राजकीय समानतेच्या हक्कामुळे कनिष्ठ, मागास, शोषित जनसमूहांना सत्ताप्रवेशाची दालने खुली होतात. परंतु सत्तादालनात दलित, दुर्बलांना प्रवेश मिळाला, तरी त्यांचा प्रभाव पडेलच असे नाही. सत्तेवरच नव्हे तर, समाजजीवनावर या वर्गांचा, गटांचा प्रभाव पडावयाचा असेल, तर समतेसंबंधी लवचिक, वास्तव व विवेकी दृष्टिकोण स्वीकारला पाहिजे. समता म्हणजे सर्वांना एकाच प्रकारची साचेबंद स्वरूपाची वागणूक नव्हे. डॉ. आंबेडकरांच्या मते व्यक्ती वा समाज-जीवनाच्या प्रत्येक बाबतीत शंभर टक्के समानता ही अवास्तव गोष्ट आहे. समतेचा आशय यांत्रिक, औपचारिक सारखेपणाशी निगडित नाही, तर व्यक्तीच्या व समूहांच्या जीवनातील अनेकविध क्षेत्रांतील व्यक्त वा सुप्त शक्तींच्या गुणात्मक व दर्जात्मक विकासाच्या संधींशी समतेचा आशय संबंधित आहे. समतेचा अर्थ संधी व परिस्थिती यातील समानता असा घेतला पाहिजे असे त्यांना वाटत होते. लास्की या ब्रिटिश राज्यशास्त्रज्ञाने समतेसंबंधी संधीची समानता असेच मत व्यक्त केले आहे. समान संधीच्या उपलब्धतेमुळे व्यक्ती वा समूह यांच्या विकास-शक्ती कार्यान्वित होतात आणि समाजजीवन समृद्ध होते. औपचारिक सारखेपणावरील अतिरिक्त व अविवेकी भर समाजजीवनातील विविधता व प्रवाहितता नष्ट करेल. एक बंदिस्त साचेबंद आणि समूहवादी समाज अस्तित्वात येईल. स्वातंत्र्य म्हणजे अतिरेकी व्यक्तिवाद नव्हे. तसेच समता म्हणजे समूहवाद नव्हे अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती. उदारमतवादी भांडवलशाहीत समतेचा लोप होतो व साम्यवादी समाजात व्यक्ती-स्वातंत्र्याचा संकोच होतो. त्या दोन्ही समाजात स्वातंत्र्य व समता, व्यक्ती व समष्टी व्यक्ती-हीत व समूह-हीत यात योग्य समतोल व समन्वय साध्य होत नाही असे त्यांचे मत होते. म्हणून ते लोकशाही समाजवादाचा पुरस्कार करीत होते.

## (४) विशेष संधीचे तत्त्व :

डॉ. आंबेडकर समतेच्या ध्येयाचा पुरस्कार करताना समतेचा अर्थ संधीची समानता एवढाच करीत नाहीत, तर आणखी एक पाऊल पुढे टाकून विशेष संधीचे तत्त्व समतेत अंतर्भूत आहे असेही सांगतात. सामाजिक-आर्थिक दृष्ट्या शोषित, मागास-समूहातील व्यक्तींच्या विकासाला चालना द्यावयाची असेल, तर त्यांच्यासाठी खास संधी, सवलती व सरंक्षण यांची घटनात्मक तरतूद करणे आवश्यक आहे. तरच काही काळाने, समाजातील पुढारलेल्या वर्गांशी स्पर्धा करण्याची त्यांची क्षमता वाढेल. विशेष संधीचे हे तत्त्व समतेच्या तत्त्वाशी वरकरणी विसंगत वाटले, विषमतादर्शक वाटले, तरी खऱ्या समतावाद्यांना तसे वाटत नाही. डॉ. आंबेडकरांनी विशेष संधी तत्त्वाचे पुढीलप्रमाणे समर्थन केले आहे. "समतावाद्यांचे ध्येय सर्वांना समतेने वागविणे हे नसून, समता प्रस्थापित करणे हे आहे. हे ध्येय साधताना सर्वांना समतेने वागवून

चालणे शक्य नाही. जेथे सर्व व्यक्ती समान आहेत, तेथे काही लोकांना असमानतेने वागविल्यास विषमता निर्माण होईल. पण जेथे व्यक्ती असमान आहेत, तेथे त्यांना सारख्या लेखून चालणे म्हणजे समता प्रस्थापनाच्या ध्येयाला विरोध करणे होय. याबाबतीत रोगी माणसाचे उदाहरण बरोबर लागू पडते. सुदृढ माणसाला जाडेभरडे अन्न चालते. पण सुदृढ व रोगी माणूस सारखे मानून जर एखादा वेडगळ 'समतावादी' तें जाडेभरडे अन्न रोग्याला देईल, तर तो रोग्याचा प्राणदाता होण्याऐवजी प्राणहर्ता होईल ......... सुदृढ माणसाला पचण्याजोगे अन्न पचविण्याची ज्यांच्यात ताकद आहे, त्यांना रोग्याचे अन्न दिले तर मात्र विषमता निर्माण होईल. या उदाहरणावरून तात्पर्य घ्यावयाचे ते ही की, समानाना असमानतेने व असमानाना समानतेने न वागविणे हा समतावाद्यांचा दस्तूर आहे." डॉ. आंबेडकर समतेच्या विचारात विशेष संधीचे तत्त्व अंतर्भूत करून न्याय्यतेला, सामाजिक न्यायाला महत्त्व देतात. भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जाती-जमाती, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय आदि समूहांना विकासासाठी ज्या सवलती व सरंक्षण दिले आहे, त्याची प्रेरणा त्यांच्या या प्रकारच्या समतेच्या संकल्पेनत आहे.

## (५) बंधुभावाची संकल्पना :

स्वातंत्र्य व समता या संकल्पनांबरोबरच डॉ. आंबेडकर यांनी बंधुभावाच्या संकल्पनेलाही अतिशय महत्त्व दिले आहे. त्यांच्या मते स्वातंत्र्य व समता या मूल्यांच्या आधारे लोकशाही समाज निर्माण झाला, तरी त्याच्या विकसनशील अस्तित्वासाठी तो एकात्म होण्याची गरज आहे. त्यासाठी आंतरिक भावबंधाची आवश्यकता असते. स्वातंत्र्य व समता यांचा संबंध व्यक्ती व समूह यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या भौतिक परिस्थितीशी आहे. विकासासाठी आवश्यक असणाऱ्या भौतिक संधींचा, सुविधांचा, साधनांचा व सेवांचा प्रत्यक्ष अनुभव घेणाऱ्या व्यक्तीत वा समूहात आपण अंतिमतः एका मोठ्या समाजाचे घटक आहोत, सामाजिक एकतेच्या भावबंधांनी जोडलेले आहोत, अशी जिव्हाळ्याची भावना नसेल, तर तो खऱ्या अर्थाने मानवी समाज होऊ शणार नाही. समाज हा काही अलग घटकांचा केवळ एकगठ्ठा कळप नाही; तर कौटुंबिक, पारिवारिक आपुलकीच्या, प्रेमाच्या भावनेने परस्परांच्या जीवनात सहभागी होऊन सहजीवनाची निर्मिती करणारा एकात्म समूह होय. ही एकात्मतेची, आत्मीयतेची संवेदना व सहभावना म्हणजेच बंधुभाव असे डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे.

त्यांच्या दृष्टीने बंधुभावाचा विचार केवळ भावानात्मक पातळीवर करता येणार नाही. सहभावना किंवा समरसतेची भावना एवढीच भावनिक कक्षा बंधुभावाची नाही. बंधुभावाच्या वैचारिक आशयकक्षेत दुसऱ्या व्यक्तीची वा समूहाची स्वतंत्र व समान प्रतिष्ठा, समान दर्जा व न्याय्य हक्क यांना मान्यता व तत्संबंधीचा आदर यांचा समावेश होतो. यातून सहजीवन निर्माण होते, समरसतेच्या वरवरच्या संकल्पनेतून

नव्हे. अशा प्रकारच्या सहजीवनाच्या विचार-कृतीतून समाज विकसीत होतो. या आशयाच्या बंधुभावातून समाजाचे एकात्मिक एकत्रीकरण व सुदृढीकरण होत असते. बंधुभावामुळेच समाजात डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणाऱ्या स्वातंत्र्य व समता या तत्त्वांचे संवर्धन, समन्वय व संरक्षण होते. महणून त्यांच्या दृष्टीने करुणा वा बंधुभाव लोकशाही समाज-निर्मितीच्या प्रक्रियेचे पायाभूत तत्त्व आहे.

## (६) राजकीय लोकशाही :

फ्रेंच राज्यक्रांतीच्या वैचारिक प्रेरणांचा मोठा प्रभाव डॉ. आंबेडकरांच्या विचार-विश्वावर आहे हे आपण पाहिले. फ्रेंच राज्यक्रांती ही केवळ सत्ताक्रांती नव्हती, तर ती विचारक्रांतीही होती. या क्रांतीच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यविचाराने उदारमतवादाचे नवे तत्त्वज्ञान पुढे आले. औद्योगिक भांडवलशाहीतून या तत्त्वज्ञानाचा विकास होऊ लागला. भांडवलशाही समाजात राजकीय लोकशाहीच्या स्वरूपात उदारमतवादी राज्यपद्धती अस्तित्वात आली. राजकीय लोकशाहीने सरंजामशाहीतील राजाकडे व जमीनदारवर्गाकडे असणारी राज्यसत्ता मुक्त करून, तो सत्ताप्रवाह सर्व थरातील सामान्य लोकांकडे वळविला. राजकीय सत्ता लोकांतून निर्माण होते. लोक हेच अंतिमतः राज्यसत्तेचे जनक, मालक व चालक आहेत. हा नवा विचार व विश्वास लोकशाहीने दिला. उपेक्षित, शोषित व सत्तावंचित समान्य माणसाला सत्ता प्राप्त करता येते, सत्तारचनेत सहभागी होता येते या शक्यतेला राजकीय लोकशाहीने जन्म दिला. राजकीय हक्क व अधिकार यामुळे सामान्य माणसाची प्रतिष्ठा व सामर्थ्य वाढते आणि शासनसंस्थेवर, शासननिर्णयावर आपला प्रभाव पाडता येतो, अशी संधी राजकीय लोकशाही उपलब्ध करून देते. डॉ. आंबेडकरांना राजकीय लोकशाहीसंबंधी जबरदस्त आकर्षण निर्माण होणे स्वाभाविकच होते. भारतीय समाजात ज्या पददलित वर्गातून ते जन्माला आले, तो वर्ग शतकानुशतके सत्ता, संपत्ती, ज्ञान, प्रतिष्ठा व प्रगती यापासून वंचितच होता. डॉ. आंबेडकर या वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी व प्रतिष्ठेसाठी संघर्ष करीत होते. अस्पृश्य समाजाच्या प्रगतीची गुरुकिल्ली राजकीय सत्ता असते, राजकीय सत्ताप्राप्तीनेच दलितांची मुक्ती होईल असे ते म्हणत. म्हणून तर त्यांनी अस्पृश्य समाजाचे राजकीयीकरण करण्यासाठी, त्याला सत्तासन्मुख करण्यासाठी राजकीय चळवळीचे नेतृत्त्व केले. राजकीय लोकशाहीच्या सार्वत्रिक मतदानाच्या व अन्य राजकीय अधिकारातून सत्तेचे दालन अस्पृश्यांना खुले होते म्हणून राजकीय लोकशाहीसंबंधी त्यांना विशेष आत्मीयता होती.

राजकीय लोकशाहीची उभारणी उदारमतवादाच्या तत्त्वावर झाली आहे. व्यक्ती-व्यक्तींनीच समाज बनत असल्याने, व्यक्तीच्या हितसंबंधांचे संवर्धन हेच अंतिम साध्य आहे. या साध्याच्या पूर्ततेसाठी व्यक्तीला काही मानवी हक्क असतात; अशा स्वरूपाचे हक्क असणाऱ्या समाजात राज्याचा किमान हस्तक्षेप असेल. म्हणजेच शांतता व सुव्यवस्था, कायदापालन एवढेच शासनाचे कार्यक्षेत्र असेल. उदारमतवादातील

राजकीय, लोकशाहीची ही प्रस्थापित संकल्पना डॉ. आंबेडकरांना पूर्णत्वाने मान्य होती असे नाही. त्यांच्या मते व्यक्तीचा विचार वर्गाचा, समूहाचा सभासद या दृष्टीनेही झाला पाहिजे. कारण समाजात विविध समूह वा वर्गांची निर्मिती व अस्तित्व ही व्यक्तीसारखीच वस्तुस्थिती आहे. समाजाच्या त्यांच्या संकल्पनेत विविध समूहांच्या समूह-अंतर्गत व आंतरसामूहिक संबंधांच्या व नात्यांच्या एकत्रित संदर्भाचे महत्त्व आहे. दलित समाजाच्या राजकीय व सामाजिक चळवळीत हा विचार दिसून येतो.

## (७) राजकीय लोकशाहीचे आधार :

त्याचप्रमाणे राजकीय हक्कांना महत्त्व असले तरी ते केवळ निर्देशात्मक, प्रदर्शनात्मक असता कामा नये, तर त्या हक्कांची प्रत्यक्ष प्रचिती सर्व लोकांना आली पाहिजे. त्यासाठी डॉ. आंबेडकर या हक्कांच्या घटनात्मक व सरंक्षणात्मक व अनुकूल, परिस्थितीची उपलब्धी यावर भर देतात. सामाजिक व आर्थिक संदर्भात आवश्यक अनुकूल परिस्थितीचे त्यांनी केलेले विवेचन आपण पुढे पाहाणार आहोतच. हक्कांच्या घटनात्मक हमीखेरीज हक्कांचा योग्य उपयोग घेता येणार नाही. घटनात्मकतेखेरीज लोकशाही समाज सुरक्षित व विकसीत होऊ शकणार नाही. एखादा विशेषाधिकार प्राप्त होतो, म्हणून व्यक्तीला राज्यघटनेने दिलेल्या हक्कांचा त्याग करावा लागेल आणि दुसऱ्यावर अनधिकृतपणे शासन करण्याची सत्ता खाजगी व्यक्तीकडे सोपविणे या दोन्ही बावी राजकीय लोकशाहीला मारक आहेत. व्यक्तीचे हक्क, त्यांचा प्रत्यक्ष अनुभव सर्वांना येणे, व्यक्ती-हक्कांच्या सामाजिक व आर्थिक आशयाचे संवर्धन व संरक्षण राज्यघटनेने करणे, त्यासाठी सर्वांना समान संधी प्राप्त होणे, सर्वांच्या हितसंबंधाला एक व्यापक समतोल निर्माण होणे, अल्पसंख्यांक व बहुसंख्यांक यांना एकमेकाबद्दल विश्वास वाटणे हे राजकीय लोकशाहीचे वैचारिक आधार व निकष डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले. या विचारांना नकार देणारी कोणतीही राज्यपद्धती त्यांना अमान्य होती.

## (८) सामाजिक लोकशाही :

डॉ. आंबेडकर यांनी लोकशाहीचा विचार राजकीय अंगाने केवळ एक शासन-प्रकार म्हणून केला नाही, तर लोकशाही एक समाजसंघटन, एक जीवनपद्धती आहे, अशा व्यापक व समावेशक दृष्टीतून केला. कोणत्याही समाजातील राजकीय व्यवस्था ही त्या समाज-व्यवस्थेचा उपविभाग असते. राजकीय लोकशाही यशस्वी व्हावयाची तर समाजाच्या अन्य क्षेत्रांसाठी लोकशाही प्रस्थपित होणे आवश्यक असते. आधुनिक काळातील राष्ट्र-राज्य हा एकात्म घटक आहे असे मानले तरी, ते विविध वर्ग, समूह यांनी बनलेले असते. राष्ट्र-राज्याचे स्वातंत्र्य हे त्यातील सर्व लोकविभागांचे, सर्व वर्ग-समूहांचे स्वातंत्र्य असेलच असे नाही. समाजातील विविध जनसमूहांच्या हितसंबंधात विषमता व अंतर्विरोध असल्याने मागास व कमजोर वर्गांचा सत्तेमध्ये प्रवेश व प्रभाव

असणे असंभवनीय ठरते. सामाजिक-आर्थिकदृष्ट्या बलिष्ठ वर्गातच सत्ता केंद्रित होते. भारताच्या पारंपरिक समाजव्यवस्थेत व्यक्तीचे स्थान व प्रतिष्ठा अंगभूत क्षमतेवर अवलंबून नव्हतीच, तर ती जन्मसिद्ध होती. धर्मनिष्ठ चातुर्वर्ण्य व तद्जन्य जातीव्यवस्था यातील जन्मजात स्तरीकृत विषमतेमुळे भारतीय समाज स्वतंत्र, समान व समर्थ होऊ शकला नाही. अशा विषम व्यवस्थेत कनिष्ठ वर्गांना, शूद्र-अतिशूद्रांना सत्ता, हक्क, प्रतिष्ठा यापासून वंचित ठेवण्यात आले.

## (९) समाजाचे समतापूर्ण सहजीवन :

भारतीय समाजाचा हा पारंपरिक सामाजिक संदर्भ बदलल्याखेरीज राजकीय हक्कांना फारसा अर्थ नाही असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. हा संदर्भ ब्रिटिश सरकारनेही बदलला नाही. राजकीय लोकशाहीकरणाची सुरुवात ब्रिटिशांनी केली असली तरी, समाजाच्या लोकशाहीकरणाशिवाय ती प्रगत होणे अशक्य होते. म्हणून तर सामाजिक दास्यातून व विषमतेतून दलितवर्ग मुक्त करण्याच्या सामाजिक चळवळींना त्यांनी अग्रक्रम दिला. सामाजिक चळवळीतून मानवी हक्कांच्या, सामाजिक समतेच्या, एकतेच्या जाणीवा जागृत होतात. या सामाजिक जाणीवांची निर्मिती व जागृती ही हक्कांची खरी संरक्षक शक्ती आहे. मानवी हक्कांचे राजकीय सत्ता किंवा कायदा हे एकमेव संरक्षक कवच नाही, तर समाजाची अनुकूल मानसिकता, समाजमान्यता आहे. राजकीय सत्तेची वा कायद्याची प्रतिष्ठा व प्रभाव व संरक्षण अंतिमतः समाजाची सहमती व संमती यावर अवलंबून असते. राजकीय स्वातंत्र्य व सत्ता मिळण्यापूर्वी समाजामध्ये मानवी हक्क व तत्संबंधी सहमती प्रस्थापित झाली पाहिजे. समाजातील विविध जनसमूहांच्या सामाजिक समतेच्या वातावरणातील सहजीवनातून अशी सहमती व सामंजस्य निर्माण होते, असा ठाम विश्वास डॉ. आंबेडकर व्यक्त करतात. समतापूर्ण सहजीवनाला अटकाव करणाऱ्या सर्व गोष्टींचे निर्मूलन करणे व समाजाचे संघटन सामाजिक लोकशाहीशी सुसंगत करणे हा राजकीय लोकशाहीचा पाया व पूर्वअट असली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. केवळ राजकीय स्वातंत्र्याने समाजात अपेक्षित परिवर्तन घडवून येईल असे नाही, तर स्वातंत्र्य संपादन करीत असतानाच सामाजिक समतेच्या व एकतेच्या विचारांना समाज-मन सन्मुख व स्वीकारशील केले पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी हयातभर जे राजकारण व समाजकारण केले, त्यामागे सामाजिक लोकशाहीची पायाभूत धारणा होती.

## (१०) एक व्यक्ती - एक मूल्य :

जन्माधिष्ठित जातीव्यवस्था ही भारतीय समाजरचनेची मध्यवर्ती कोनशिला आहे. यातून वाढत गेलेल्या विषमतेने समाज विघटित व विकृत होत गेला. यामुळे विविध जाती व जातीसमूह एकमेकांपासून सर्व बाजूंनी अलग होऊ लागले. त्या सर्वांना एकत्र बांधणारे, जोडणारे समान हितसंबंध व भावबंध निर्माणच होऊ शकले

नाहीत. आंतरजातीय व आंतरसमूह सहजीवनाची, समान हितसंबंधांची क्षेत्रे प्रगत झालीच नाहीत. सामाजिक-सांस्कृतिक अभिसरणाच्या अभावी सहजीवनाची, एकात्म समान जीवनाची अनुभूती व दृष्टी विकसीत न झाल्याने सर्व लोकांचे समावेशक प्रतिनिधित्व करणारी लोकशक्ती प्रभावी होऊ शकली नाही. राजकीय प्रातिनिधिक लोकशाहीतील एक व्यक्ती-एक मत या तत्त्वाने जे बहुमत निर्माण होते, ते प्रत्यक्षात जातीय बहुमत असते. बहुसंख्य असणाऱ्या जातीगटांचे ते बहुमत असते. अल्पसंख्य जाती गटांच्यावरील वर्चस्वाचे ते निदर्शक असते. म्हणून व्यक्ती एक समान, सामाजिक मूल्य आहे या तत्त्वावर लोकशाहीची उभारणी झाली पाहिजे. 'एक व्यक्ती-एक मतच नव्हे, तर एक मूल्य' या मूल्यात्मक विचारावर आधारित असलेल्या सामाजिक लोकशाहीतच राजकीय लोकशाही यशस्वी होते. अन्यथा भारतीय लोकशाही ही लोकशाहीची केवळ क्रूर थट्टा ठरेल. आजही भारताच्या लोकशाही संस्थांतील व निवडणुकीच्या राजकारणातील जातीयवादाचा विकृत प्रभाव पाहता डॉ. आंबेडकरांचे लोकशाहीविषयक इशारे किती योग्य होते हे समजून येते. जन्मजात व विषम जातीव्यवस्थेचा राजकीय सत्तारचनेवर लोकशाहीच्या दृष्टीने अनिष्ट व विपरित दबाव येत असतो. त्यामुळे जातीय बहुमताचे वर्चस्ववादी राजकारण अल्पसंख्यांकांना सर्वच क्षेत्रात निष्प्रभ व नगण्य करते. गौण, दुय्यम स्वरूपाचे नागरिक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. उमेदवारी, मतदान, प्रचार या सर्व गोष्टी जातीय भूमिकेतून केल्याने सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक अंतर्विरोध तसेच कायम राहतात. डॉ. आंबेडकरांना याची जाणीव होती. म्हणून "२६ जानेवारी १९५० रोजी हा देश अंतर्विरोधपूर्ण जीवनात प्रवेश करीत आहे. आपल्याला राजकीय क्षेत्रात समानता लाभणार आहे, पण सामाजिक-आर्थिक जीवनात विषमताच राहणार आहे. राजकारणात 'एक व्यक्ती-एक मत' आणि एका मताचे एकच मूल्य या तत्त्वाला मान्यता देणार आहोत. मात्र आपल्या सामाजिक व आर्थिक संरचनाच अशा आहेत की, या क्षेत्रात 'एक व्यक्ती, एक मूल्य' हे तत्त्व आपणासाठी एक पोकळ वल्गनाच राहील", अशी व्यथा त्यांनी व्यक्त केली.

डॉ. आंबेडकरांनी एक समाजपद्धती म्हणून लोकशाहीचा विचार केला. समाजाच्या विविध क्षेत्रांतील समानता, घटनात्मक नैतिकता, सनदशीर मार्गांचा स्वीकार, समाजातील अन्य घटकांसंबंधी आत्मीयतेचे भावबंध व कर्तव्यबुद्धी, व्यक्तिनिष्ठेऐवजी विवेकनिष्ठा, साधारणतः द्विपक्षपद्धती आणि मानवी हक्कांचा आदर करणारी मनोवृत्ती, त्यांचे संवर्धन करणारी समाजरचना अशा व्यापक संदर्भातच लोकशाही समाजाचा विकास होतो असे मत ते सातत्याने स्पष्टपणे व्यक्त करीत.

## (११) आर्थिक लोकशाही - आर्थिक क्षमतेची हमी :

12431

केवळ राजकीय वा संसदीय लोकशाहीच्या स्वीकाराने लोकशाही समाज अस्तित्वात येत नाही. उलट त्यामुळे समाजातील अंतर्विरोध वाढत जातील याची

डॉ. आंबेडकरांना पक्की जाणीव होती. हे अंतर्विरोध नाहीसे करण्यासाठी त्यांनी सामाजिक-आर्थिक लोकशाहीचा पुरस्कार केला. समाजात व्यक्तीला वा समूहाला आर्थिक सामर्थ्य व समता नसेल तर त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाला व अस्तित्वाला अर्थ राहत नाही. ते शोषणाचे, अन्यायाचे व गुलामीचे बळी ठरतात. म्हणून समाजाने सर्वांना किमान आर्थिक सामर्थ्याची हमी दिली पाहिजे; तरच स्वातंत्र्य-समता व बंधुता या मूल्यत्रयीवर लोकशाही समाजाची निर्मिती होऊ शकेल.

डॉ. आंबेडकर मूलतः उदारमतवादी होते तरी भारतीय समाजात जन्मापासूनच ते आणि अस्पृश्य समाज दैन्याचे, दारिद्र्याचे जे शोषित जीवन जगले, त्या दारुण अनुभूतीने ते पाश्चिमात्य देशातील समाजवादी विचारांकडे झेपावले. मार्क्स-लेनिनप्रणीत समाजवादी क्रांतीचे संपूर्ण तत्त्वज्ञान डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते. तरी पण त्यांनी समाजवादी आर्थिक कार्यक्रमाचा स्वीकार केला. राज्य समाजवादाची संकल्पना संसदीय लोकशाहीच्या मार्गाने प्रत्यक्षात आणता येईल व त्यायोगे समाजात आर्थिक सामर्थ्याचा, समतेचा व न्यायाचा अनुभव घेता येईल अशी त्यांची धारणा होती. सर्व प्रकारच्या शोषणातून व्यक्ती वा समूह यांची मुक्तता लोकशाही समाजवादाने करता येईल असे त्यांना वाटत होते. संसदीय लोकशाही राज्यपद्धतीतून व मिश्र अर्थव्यवस्थेतून समाजधारणेच्या त्रिविध मूल्यात विकासक्षम समन्वय घालता येईल व समाजरचनेत अपेक्षित बदल घडविता येईल असे त्यांचे मत होते.

## (१२) राज्य-समाजवादी कार्यक्रम :

डॉ. आंबेडकरांनी राज्-समाजवादाची संकल्पना आपल्या 'स्टेटस् अँड मायनॉरिटीज' या पुस्तकात स्पष्ट केली आहे. स्वातंत्र्यापूर्वी घटना समितीला त्यांनी जो घटना-मसुदा सादर केला होता, त्यात व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे आर्थिक शोषणापासून संरक्षण व्हावे यासाठी त्यांनी राज्य-समाजवादाची आर्थिक उपाययोजना सुचविली होती. भारतासारख्या मागास देशांना आर्थिक विकासासाठी व सामाजिक न्यायासाठी अशा प्रकारच्या समाजवादी आर्थिक कार्यक्रमाखेरीज अन्य पर्याय नाही असा त्यांचा दृष्टिकोण होता. "देशाचा नियोजनबद्ध आर्थिक विकास करणे, सरकारी व खाजगी क्षेत्रातून उत्पादनक्षमता वाढविणे, संपत्तीचे न्याय्य वाटप करणे ही राज्याची जबाबदारी आहे. मूलभूत व कळीचे उद्योग राज्याच्या मालकीचे असून, त्यांचे संचलन राज्याने व राज्यनिर्मित महामंडळांनी करणे; शेती हा राज्य-उद्योग मानून व शेतजमिनीची विभागणी प्रमाणित आकारमानाच्या शेतात करून स्थानिक लोकांना कूळ म्हणून ती वितरित करणे; सामुदायिक शेतीच्या तत्त्वावर शेतीची मशागत करणे; मशागत, उत्पन्न वाटणी, खर्च आकारणी इत्यादी गोष्टी सरकारी नियम व मार्गदर्शन यानुसार करणे; तसेच जात-पंथ आधारावर भेदभाव न करता कोणी जमीनदार नाही, कोणी कूळ वा भूमीहीन शेतमजूर नाही या पद्धतीने जमिनीचे वितरण करणे; शेतीसाठी आवश्यक ते भांडवल, पाणी-अवजारे, बी-बियाणे यांचा पुरवठा करणे; ही राज्याची

जबाबदारी असणे अशा तत्त्वावर शेतीची पुनर्रचना करणे. त्याचप्रमाणे शेती-उद्योग व विमा या क्षेत्रातील विविध प्रकारचे खाजगी हक्क रद्द करताना नुकसानभरपायी कर्जरोख्यांच्या स्वरूपात देणे. भांडवल-निर्मिती व व्यक्तीला अधिक सुरक्षा यासाठी विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करणे अशा स्वरूपाचा राज्यसमाजवादाचा आर्थिक कार्यक्रम डॉ. आंबेडकरांनी घटना समितीला सादर केला होता. हा कार्यक्रम राज्यघटनेचा अंगभूत भाग असला पाहिजे, बदलत्या संसदेला व कार्यकारिणीला त्यात बदल करता येऊ नये असा त्यांचा आग्रह होता. हा आर्थिक कार्यक्रम घटनेत समाविष्ट केल्याने व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे, स्वातंत्र्याचे संरक्षणच होईल असे नव्हे, तर त्यांचा उपभोग सामान्य जनतेला घेता येईल. भांडवलशाहीतील लोकशाही हक्क गरीब व शोषित व्यक्तीच्या दृष्टीतून पोकळ ठरतात. म्हणून या वर्गांना आर्थिक शाश्वती व सामर्थ्य देण्यासाठी हा समाजवादी आर्थिक कार्यक्रम राज्यघटनेत समाविष्ट केला पाहिजे असे त्यांचे प्रतिपादन होते.

सरंजामी व भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनाचा मार्ग म्हणून डॉ. आंबेडकरांनी राज्य-समाजवादाचा पुरस्कार केला. हा आर्थिक कार्यक्रम संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून प्रत्यक्षात आणता येईल असे त्यांचे मत होत. परंतु त्यांना याची जाणीव होती की, संसदीय लोकशाहीत सत्तांतरामुळे राज्य-समाजवादाला विरोध करणारा बहुमतवाला पक्ष सत्तेवर आला, तर तो साध्या कायद्यानेही हा कार्यक्रम रद्द करू शकेल. बदलत्या संसदेकडून बाधा येऊ नये या समाजवादी आर्थिक कार्यक्रमाला घटनात्मक पाया देऊन, सातत्य व शाश्वती देणे गरजेचे आहे. नाही तर यासाठी हुकुमशाहीखेरीज दुसरा पर्याय नाही. हुकुमशाही सातत्य देऊ शकेल, पण स्वातंत्र्य व लोकशाही हक्क हिरावले जातील. तेव्हा या आर्थिक कार्यक्रमाला घटनात्मक हमी देऊन राज्यघटनेतच त्याचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे. राज्यघटनेने राज्यपद्धतीच्या स्वरूपाबरोबरच आर्थिक संघटनेचेही स्वरूप स्पष्ट केले पाहिजे. तसे झाले नाही तर अर्थपद्धतीतून निर्माण होणाऱ्या विरोधी शक्ती राजकीय स्वरूपालाही विघटित करतील. आर्थिक संघटनेचे स्वरूप राज्यघटनेत शब्दांकित करणे या विचाराची भर डॉ. आंबेडकरांनी घटनात्मक लोकशाहीप्रणालीत टाकली हे यावरून स्पष्ट व्हावे.

स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय राज्यघटनेत डॉ. आंबेडकरांचा राज्य-समाजवादी आर्थिक कार्यक्रम प्रस्थापित हितसंबंधी शक्तींच्या विरोधामुळे जरी समाविष्ट झाला नाही; तरी दुर्बल, दलित व शोषित जनतेच्या राजकीय व आर्थिक उन्नतीसाठी मूलभूत हक्क व त्यांना पूरक असणारी राज्यधारणेची मार्गदर्शक तत्त्वे; तसेच अनुसूचित जाती, जमाती व अन्य मागासवर्ग यांना विशेष संधी व सवलती या तरतुदीमधून अंगभूत आर्थिक लोकशाहीच्या उद्दिष्टांचे प्रतिबिंब पडले आहे हा डॉ. आंबेडकरांच्या विचारांचाच प्रभाव आहे.

राज्य-समाजवादाच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी लोकशाही व समाजवाद यांच्या

परस्परसंबंधांचे विवेचन केले. या संबंधांतील विविध अंतर्विरोधांची त्यांनी फारशी चिकित्सा केली नसली, तरी या विचारसरणींची समर्थता व दुर्बलता यांची जाण त्यांना खासच होती. या एकेका विचारसरणीत व कार्यप्रणालीत व्यक्तिगत व सामाजिकदृष्ट्या काही प्रवृत्ती व अपप्रवृत्ती आहेत. मागे स्वातंत्र्य-समता-बंधुता या मूल्यांची चर्चा करताना याचा उल्लेख केला आहे. व्यक्ती-हित व समाज-हित साधण्यासाठी व्यक्ती-स्वातंत्र्य, लोकशाही हक्क यांच्याबरोबरच राज्यसंस्थेला आर्थिक क्षेत्रातील तिच्या सहभागाने व मार्गदर्शनाने सर्व क्षेत्रात समन्वय साधला जातो. राज्यसंस्थेच्या या परिवर्तनवादी व समन्वयवादी भूमिकेवर डॉ. आंबेडकरांचा भर आहे. यामुळे संपूर्ण राष्ट्रीयीकरण नाही, तर मूलभूत महत्त्वाच्या उद्योगांचे, शेतीचे राष्ट्रीयीकरण, खाजगी क्षेत्र, खाजगी मालमत्ता यांना वाव - अशा स्वरूपाच्या मिश्र अर्थव्यवस्थेला ते पाठिंबा देतात. सामाजिक सुरक्षा योजनांनाही ते मान्यता देतात. तरी पण जलद व प्रचंड औद्योगिकरण व आधुनिकीकरण यासाठी सार्वजनिक क्षेत्राची आवश्यकता ते मानतात. यासाठी सामाजिक-सांपत्तिक व सांस्कृतिक विषमता कमी होईल असा त्यांचा दृष्टिकोण आहे. भांडवलशाहीतील व्यक्तिगत प्रेरणा व न्याय आणि समाजवादातील सामाजिक प्रेरणा व न्याय, संसदीय लोकशाही राज्यसंस्थेकडून राज्य-समाजवादाच्या योगाने प्रत्यक्षात कार्यान्वित करता येईल असा त्यांचा विश्वास होता.

## (१३) मार्क्स व डॉ. आंबेडकर - विचारातील साम्यस्थळे :

डॉ. आंबेडकरांच्या राज्य-समाजवादाच्या संकल्पना-स्वीकाराला मार्क्सवादाचा संदर्भ आहे. तेव्हा मार्क्सवाद वा साम्यवाद यासंबंधी ह्यांच्या विचारांचा थोडक्यात मागोवा घेणे अनुचित होणार नाही. डॉ. आंबेडकरांच्या विचारातील प्रमुख स्त्रोत जरी बुद्धाचा विचार असला तरी मार्क्सच्या काही विचारांचा प्रभाव त्यांच्यावर स्पष्टपणे जाणवतो. बुद्धाप्रमाणेच मार्क्स मानवी जग बदलण्याचा विचार देतो. पारलौकिकता, ईश्वरवाद, आत्मा व त्याची अमरता, व्यक्तिगत मोक्ष इत्यादी अध्यात्मवादी जंजाळाला छेद देऊन इहवादी भौतिक विकसनशील जीवनाचा विचार दोघेही प्रामुख्याने करतात. भौतिक वास्तवतेतून तत्त्वविचार जन्म घेतो. ही ऐतिहासिक भौतिकवादी मांडणी दोन्ही विचारात अंतर्भूत आहे. दोन्हीही दर्शनात मानवाला दुःख-शोषणमुक्त करण्याची, त्याला स्वातंत्र्य व समता, सामर्थ्य व प्रतिष्ठा यांच्या संधींची ग्वाही आहे असे डॉ. आंबेडकर मानतात. बुद्ध ज्याला दुःख म्हणतो त्याचा अर्थ डॉ. आंबेडकर दारिद्र्य असा घेतात आणि मार्क्सप्रमाणेच असे प्रतिपादन करतात की, मालमत्तेच्या खाजगी हक्कातून एक वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करतो. या शोषणाचे व दुःखाचे निर्मूलन करणे आवश्यक आहे. जगाचा इतिहास हा वर्ग-संघर्षाचा इतिहास आहे, या मार्क्सच्या विधानाला डॉ. आंबेडकर मान्यता देतात. तसेच भारतातील जाती हे बंदिस्त वर्ग आहेत, त्या कोणा एका मनुच्या तत्त्वज्ञानातून निर्माण झाल्या नाहीत. जातीसंघर्ष हा एक प्रकारे वर्गसंघर्षच आहे असे ते म्हणत. याशिवाय नियोजित अर्थव्यवस्था, राज्य-

मालकीची क्षेत्रे, सामुदायिक शेती अशा स्वरूपाच्या मार्क्सवादी संकल्पनांचा प्रभाव त्यांच्या विचारात व लिखाणात प्रत्ययास येतो.

## (१४) मूलभूत विचारभिन्नता :

डॉ. आंबेडकर आणि मार्क्स यांच्या विचारदर्शनातील ही ढोबळ साम्यस्थळे जरी असली, तरी त्यांचे दृष्टिकोण मूलतः भिन्न आहेत. मार्क्सवाद मानवी जीवनाची एकमेव मूलभूत प्रेरणा म्हणून आर्थिक प्रेरणांचा, उत्पादन-संबंधांचा निर्देश करतो. मार्क्सचे समाजजीवनाचे सर्व विश्लेषण मूलतः या आर्थिक दृष्टिकोणातून आहे. समाजजीवन विविधांगी, व्यामिश्र असल्याने एकाच दृष्टिकोणातून ते पाहाता येणार नाही. त्यामुळे एखादी गोष्ट स्पष्ट होईल, पण संपूर्ण जीवन उलगडले जाणार नाही. जीवनाच्या पुनर्रचनेसाठीच्या संघर्षातून आर्थिक पाया व संबंध बदलले, तरी वरची इमारत बदलतेच असे नाही, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. वरच्या इमल्यात म्हणजे सामाजिक-राजकीय चौकट, राज्यघटना, धर्म-नीती-संस्कृती-कायदे विषयक सिद्धांत व व्यवहार, इत्यादींमध्ये जाणीवपूर्वक प्रयत्न व बदल प्रथम केल्याखेरीज समाजव्यवस्थेची पुनर्रचना होणार नाही. कारण स्थितीशील विरोधी शक्ती व संस्था वरच्या चौकटीतही दबा धरून बसलेल्या असतात. त्या नष्ट होणे आवश्यक आहे. भारताच्या सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील विषमता व गुलामगिरीच्या प्रवृत्ती यांचे उच्चाटन करणे गरजेचे आहे. केवळ आर्थिकदृष्ट्या वर्गजाणीवेने सर्व भेदभाव नष्ट होतील असे नाही. डॉ. आंबेडकरांची वर्गाची कल्पना मार्क्सपेक्षा वेगळी आहे. त्यांच्या दृष्टीतून वर्गाचा आधार केवळ आर्थिक नाही. ते आर्थिक, सामाजिक, बौद्धिक स्वरूपाचे असू शकतात. म्हणून भारतीय समाजात सामाजिकदृष्ट्या कनिष्ठ असणारा वर्ग आर्थिकदृष्ट्या शोषित वर्ग असतो, पण आर्थिकदृष्ट्या शोषितवर्ग सामाजिकदृष्ट्या शोषित, गुलामी असेलच असे नाही. डॉ. आंबेडकरांच्या मते आर्थिक प्रश्नासाठी स्पृश्यास्पृश्य कामगारांची एकजूट आवश्यक आहे, पण स्पृश्य कामगाराची सामाजिक उच्चतेची भावना या ऐक्याच्या आड येते. एवढेच नव्हे तर, आर्थिक-शैक्षणिकदृष्ट्या समान पातळीवर असलेल्या अस्पृश्य श्रमिकाला सामाजिक-धार्मिक अशा क्षेत्रात स्पृश्य श्रमिक समान लेखेलच असे नाही.

डॉ. आंबेडकरांचा जातीव्यवस्थेविरुद्धचा लढा आर्थिक शोषणाविरुद्धचाही लढा होता. जातीय दास्यामुळे त्यांचे आर्थिक शोषण अधिक तीव्र होते. तेव्हा अस्पृश्यतेचे, सामाजिक विषमतेचे समूळ उच्चाटन होण्याने सर्व श्रमिकांचे, शेतकरी-कामगारांचे एकवर्गीय संघटन होणे शक्य आहे. केवळ वर्गलढ्याने जातीव्यवस्थेवर मात करता येणार नाही. कारण जातीजातींचे सामाजिक हितसंबंध एकमेकांना विरोधी आहेत. परंतु आर्थिक लढ्यासाठी सर्व स्पृश्यअस्पृश्य श्रमिक एकत्रित यावेत आणि त्याचे नेतृत्व करण्यास अस्पृश्यवर्ग सर्वार्थाने योग्य आहे असे त्यांना वाटत होते. सर्व श्रमिकांच्या हितासाठी १९३६ साली त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. तत्कालीन

राजकारणाच्या संदर्भात अस्पृश्य वर्गाचा शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन हा पक्ष नंतर निर्माण केला, तरी स्वातंत्र्यानंतर आपल्या आयुष्याच्या अखेरीस पुन्हा सर्वसमावेशक व राष्ट्रीय स्वरूपाचा रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचा ते गंभीरतने विचार करीत होते. या संकल्पित पक्षाच्या कार्यक्रमात समाजवादी आशय स्पष्ट दिसून येतो. या पक्षामागची प्रेरणा केवळ सत्तासहभागाची नव्हती, तर ब्राह्मणशाही व भांडवलशाही-विरुद्धच्या समाजवादी समाजपरिवर्तनाची होती.

डॉ. आंबेडकर यांनी मार्क्सवादाच्या कामगारवर्गाची हुकुमशाही या आधारभूत तत्त्वावरही टीका केली. त्यांच्या मते खाजगी मालकीला मुक्त स्वातंत्र्य असणाऱ्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदारी हुकुमशाहीचा तर समाजवादी अर्थव्यवस्थेत कामगाराच्या नावाखाली शासकीय हुकुमशाहीचा धोका असतो राज्य-समाजवादाच्या आर्थिक कार्यक्रमाच्या संदर्भात यासंबंधी मागे विवेचन केले आहे. हा कार्यक्रम राज्य-घटनेत समाविष्ट करून अनिश्चिततेचा, जातीय वर्चस्वाचा व हुकुमशाहीचा धोका टाळता येईल असेही ते सांगतात. परंतु भारताच्या घटनात्मक कायद्यात त्यांच्या समाजवादी, आर्थिक कार्यक्रमाचा समावेश होऊ शकला नाही.

साम्यवादी व्यवस्था कामगारवर्गाच्या अधिसत्तेतून साकार होते. कामगारवर्गाच्या हुकुमशाहीवर, म्हणजे बळावर ती उभी आहे. समाजवादी परिवर्तनाचे बळ व हिंसा एक साधन आहे या मार्क्सच्या विचारांशी डॉ. आंबेडकर सहमत नाहीत. बुद्धाच्या अहिंसेचा पाश्चिमात्य उदारमतवादी विचार प्रभावी असल्याने अहिंसक, शांततामय, सनदशीर मार्गाने परिवर्तन घडविता येईल अशी त्यांची धारणा होती. कामगारवर्गाच्या अधिसत्तेच्या जोरावर सत्ताधारी साम्यवादी पक्ष विरोधकांना व विरोधाला नष्ट करतो असा आक्षेपही डॉ. आंबेडकर घेतात. वस्तुतः हिंसा-अहिंसा, कामगारवर्गाची हुकुमशाही या मार्क्सच्या संकल्पनांचे वेगवेगळे अर्थ मार्क्सवाद्यांनी लावले आहेत. त्यासाठी मार्क्सची भिन्न अवतरणेही ते देतात. डॉ. आंबेडकर मार्क्सप्रमाणेच हिंसा-अहिंसा विचार, परिस्थितीजन्य आहे व समाजवादी परिवर्तन लोकशाही मार्गानेही घडविता येईल असे मानतात.

वर्गस्वरूप, वर्गसंघर्ष, हिंसा व बळ, कामगारवर्गाची हुकुमशाही, समाजवादाच्या प्रस्थापनेचे लोकशाही मार्ग, पक्षपद्धती, कामगार चळवळींचा भारतीय, आर्थिक व सामाजिक संदर्भ, भारतीय इतिहासाचे मूल्यमापन आदि संबंधांत मार्क्सचे विचार आणि भारतातील साम्यवादी पक्षाचे धोरण यांच्याशी डॉ. आंबेडकरांचे मतभेद खासच होते. सर्व प्रकारच्या शोषणमुक्तीच्या आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीच्या क्रांतीप्रेरणांचे योगदान मार्क्सने दिले. त्यातील काही प्रेरणांचा व विचारांचा डॉ. आंबेडकरांनी विकसनशील संदर्भात स्वीकारही केला. भारतातील साम्यवादी चळवळीने आरंभीच्या काळात डॉ. आंबेडकरांच्या विचारातील वास्तव क्रांतितत्त्व लक्षात घेतले नाही. आपल्या वैचारिक चौकटीत ते बसत नाही म्हणून परिवर्तनाच्या लढ्यात त्यांच्याशी

जवळीक साधली नाही. तीच गोष्ट डॉ. आंबेडकरांच्यानंतर त्यांच्या दलित चळवळीत दिसून येते. या दोन्ही चळवळी पुरोगामी असूनही क्रांतीविचाराच्या एकांगी अभिनिवेशाने त्या पूर्णतः समांतरच राहिल्याने, परिवर्तनाच्या शक्ती दुभंगल्या गेल्या. आजच्या काळात या अनुभवाची दखल घेतली पाहिजे. वर्ग व वर्ण या दोन्ही आघाड्यांवर परिवर्तनाची लढाई समंजसपणे लढली पाहिजे.

## (१५) बौद्ध धम्माचा पर्याय :

डॉ. आंबेडकर यांच्या मते बौद्ध धम्म हा मार्क्सवादाला, साम्यवादाला पर्याय आहे. बुद्धकालातील बौद्धभिक्खूंचे संघजीवन हे साम्यवादी जीवनापेक्षा श्रेष्ठ व आदर्श समाजजीवन आहे. डॉ. आंबेडकरांच्या धम्म या संकल्पनेत प्राचीन काळातील आदिम साम्यवादी जीवनाचा, टोळी अथवा गण यांच्या सामूहिक लोकशाहीच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. खाजगी मालमत्ता नाही, कुटुंबसंस्था नाही, परमेश्वर संकल्पना नाही, दंडसत्ता नाही, समाजाची धारणा लोकशाही जीवनाच्या नियमाने होत होती. अशा प्रकारचे जीवन बुद्धाच्या कालखंडात नष्ट होत होते. राजेशाही, गुलामगिरी, खाजगी मालमत्ता, शोषण, आत्मनिष्ठा, वर्गीय रचना आदि प्रवृत्ती व संस्था अस्तित्वात येत होत्या. बुद्धाला हे बौद्धभिक्खु संघामार्फत बदलावयाचे होते. त्यासाठी त्याग, अपरिग्रह, प्रबोधन, प्रज्ञा, विवेक, स्वयंनियमन व स्वयंशासन आदि प्रेरणांचे प्रतिबिंब बौद्ध संघात दिसते. डॉ. आंबेडकर त्यांच्या सभोवतालचे जीवन बदलण्यासाठी बुद्ध व मार्क्स यांच्या प्रेरणांवर अधिष्ठित अशा समाजाचे चित्र रंगवितात. हे खरे असले तरी, साम्यवादाला पर्याय केवळ एका धर्मात आहे असे म्हणणे हे डॉ. आंबेडकरांच्या बुद्धिवादाशी, विज्ञाननिष्ठेशी विसंगत वाटते. शिवाय बुद्धाच्या काळात आजच्याइतका जीवनाचा व विचारांचा व्यापक व व्यामिश्र विकासही झाला नव्हता. समाजाचे नियोजनपूर्वक सर्वांगीण परिवर्तन घडविता येते ही कल्पनाही अस्तित्वात नव्हती. तत्कालीन अन्य धर्मापेक्षा बौद्धधर्म हा अधिक बुद्धिवादी, प्रगल्भ, इहवादी व समतावादी होता. त्यात आदर्श समाजरचनेचे व समाजविकासाचे स्वरूप व मार्ग यांचे शास्त्रशुद्ध व समावेशक असे विवेचन नाही अशी काही अभ्यासकांनी केलेली टीका यासंबंधात लक्षात घेतली पाहिजे.

□ □ □

# ४.

# डॉ. आंबेडकर आणि लोकशाही राज्याचे संघटन

## लोकशाही राज्य-शासन संघटन :

आधुनिक काळात लोकाशाही विचारांच्या विकासाबरोबरच राज्यपद्धती व शासनसंस्थेचे संघटन या संबंधातही विविध प्रकार व प्रवाह अस्तित्वात येऊ लागले. घटनात्मक राज्यसंस्था ही संकल्पना आज सर्वमान्य झाली आहे. डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही विचारात घटनावाद, घटनात्मक साधने व मार्ग यांचा अवलंब यांना अतिशय महत्त्व आहे. घटनात्मक राज्याचे संघराज्य व एकात्म राज्य आणि शासनाचे संसदीय शासन व अध्यक्षीय शासन असे जे दोन स्थूल संघटना-प्रकार अस्तित्वात आले, त्यासंबंधी भारताच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी वेळोवेळी विचार व्यक्त केले आहेत. परंतु राज्य व शासन संघटना-प्रकारासंबंधी त्यांच्या विचारात सातत्य दिसून येत नाही. याचे कारण राज्य व शासन संघटन हा संघटन वा व्यावहारिक स्वरूपाचा भाग असल्याने त्या प्रकाराचे समर्थन व स्वीकार बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात करणे त्यांना आवश्यक वाटले असावे.

### (१) एकात्म व संघराज्यपद्धती :

१९१९च्या भारत शासन कायद्याच्या तरतुदी, साउथबरो कमिशन, सायमन कमिशन, गोलमेज परिषद व तिची संघराज्य-रचनानिर्मिती, १९३५चा संघराज्य कायदा आणि १९५०ची भारतीय राज्यघटना या संबंधातील लेख, निवेदने, भाषणे, चर्चा याद्वारे केलेल्या विवेचनात डॉ. आंबेडकरांच्या राज्यपद्धती विषयक विचारांचा मागोवा घेता येतो.

### (२) १९३५च्या कायद्यान्वये संघराज्य :

राज्य-स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटना कार्यान्वित होईपर्यंतच्या काळात भारतीय राज्यपद्धतीत मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारे व एतद्देशीय संस्थाने यांचे परस्पर संबंध कसे असावेत हा घटनात्मक विकासक्रमाचा एक प्रमुख विषय होता. या संबंधात व्यक्त केलेल्या मतावरून असे दिसते की, डॉ. आंबेडकरांना भारतासारख्या देशात लोकशाही राज्यसंघटन हे मूलतः एकात्म असणे आवश्यक वाटते. एककेंद्री राज्य सर्व जनतेच्या लोकशाही हक्कांच्या संरक्षणासाठी व सर्वांगीण उन्नतीसाठी

संघराज्यापेक्षा अधिक समर्थ आहे असे त्यांना वाटे. १९३५च्या कायद्याने भारतात जी संघराज्यपद्धती अस्तित्वात येणार होती, त्या संघराज्य योजनेत मध्यवर्ती सरकारची मर्यादित जबाबदारी व सत्ताक्षेत्र, प्रांत व संस्थाने यांना दिलेला असमान दर्जा व अधिकार, मध्यवर्ती कायदेमंडळातील त्यांचे अनुक्रमे निर्वाचित व नियुक्त असे वेगळे व असमान प्रतिनिधित्व, नागरिकत्वाचे असमान अधिकार अंतर्भूत होते. हे संघराज्य स्वतःच्या घटकातच पक्षपाती भेदभाव करते. वस्तुतः स्वायत्त घटकातूनच संघराज्य निर्माण होते. त्यासाठी भारताच्या संस्थानांचा राजकीय घटक न मानता ती खालसा करून अन्य प्रांताप्रमाणेच संघराज्यात सहभागी करून घेणे हा संस्थानांचा प्रश्न सोडविण्याचा मार्ग होता असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. संघराज्याची ही योजना भारतीय राष्ट्रवादास, व एकीकरणास पोषक नाही, फुटीरतेला पूरक आहे. संस्थानिकांच्या सत्तावर्चस्वामुळे अन्य घटक प्रांतांतील सामान्य जनतेचे स्वातंत्र्य धोक्यात येईल, मानवी हक्क नाकारले जातील आणि पारंपरिक मूल्यांचेच पुनर्जीवन होईल. यामुळे जबाबदार राज्यपद्धती अस्तित्वात येणार नाही. अशी मते त्यांनी 'संघराज्य विरुद्ध स्वातंत्र्य' यावर पुणे येथे १९३६ साली दिलेल्या भाषणात व्यक्त केली. म्हणून तर त्यांचा १९३५च्या संघराज्य योजनेला विरोध होता.

१९३५च्या कायद्याने भारतात संघराज्यपद्धतीचे प्रस्थान ठेवले. ही वास्तवता लक्षात घेऊन स्वातंत्र्योत्तर भारतीय संघराज्य लोकशाही मूल्यांना व राष्ट्रीय एकात्मतेला अधिक पोषक कसे होईल याचा विचार डॉ. आंबेडकर करू लागले. त्याचबरोबर ते संघराज्यातील केंद्र व घटक राज्ये यातील सत्तावाटपाला अतिशय महत्त्व देतात. या सत्तावाटपाच्या स्वरूपावर संघराज्य केंद्र सन्मुख आहे की घटकराज्य सन्मुख आहे हे ठरते. केंद्र व घटकराज्य स्तरावरील सत्ताविभाजन संघराज्यनिर्मितीच्या प्रक्रियेवर अवलंबून असते. अमेरिकन संघराज्य प्रथमतः स्वतंत्र असणाऱ्या राज्यांनी एकत्रित येऊन काही समान प्रश्न व परिस्थिती यासंबंधात केंद्राची सत्ता निर्धारित केली व शेषसत्ता घटक-राज्याकडे राहिली. आपापल्या सत्ता-कार्यक्षेत्रात दोन्ही सरकारांचा दर्जा समान राहिला. भारतात एकात्म राज्यातून संघराज्यनिर्मिती झाल्याने प्रथमपासूनच भारतीय संघराज्य केंद्र-सन्मुख राहिले. स्वातंत्र्योत्तर राज्यघटनेतील सत्तावाटप तत्कालीन परिस्थितीच्या, समस्यांच्या व सामाजिक उद्दिष्टांच्या अनुरोधाने झाले. शिवाय प्रभावी परिवर्तनासाठी केंद्रसत्ता प्रबळ असली पाहिजे असा डॉ. आंबेडकरांच्यासह सर्व राजकीय नेत्यांचा विचार असल्याने, भारतात केंद्र-राज्य संबंधांचा आकृतिबंध केंद्रानुवर्ती झाला. राष्ट्रीय एकात्मतेची ग्वाही देणाऱ्या संघराज्याचे भवितव्य केंद्र-राज्य संबंधांच्या गतिमानतेवर अवलंबून असते. ज्या संघराज्यात केंद्रसत्तेची पकड काही कारणास्तव अधिक प्रबळ असते, तेथे कालांतराने विकासातून निर्माण होणाऱ्या घटक राज्यांच्या, जनसमूहांच्या नव्या आशा-आकांक्षांबरोबरच ती सत्तापकड काहीशी सैल होऊन त्यांची स्वायत्तत्ता वाढली पाहिजे. अधिक स्वायत्तत्ता देणे किंवा सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक ठरते. नाहीतर राष्ट्राच्या, संघराज्याच्या विघटनाचा धोका निर्माण होण्याची

शक्यता वाढते. भारतीय संघराज्यातच नव्हे, तर सोव्हिएट संघामध्येही आज हा अनुभव आला आहे. भारतीय राज्यघटनेचे वर्णन 'रचनेच्या दृष्टीने संघराज्यात्मक पण सत्ताआशयाच्या दृष्टीने एकात्म वा एककेंद्री' असे केले जाते. आजच्या बदलत्या संदर्भात भारतातील सत्तावाटप अधिक विकेंद्रित स्वरूपाचे होणे राष्ट्रीयतेच्या, लोकशाहीच्या दृष्टीने आवश्यक आहे. डॉ. आंबेडकर प्रबल केंद्रसत्तेचे जरी समर्थक होते, तरी ते राष्ट्रीयता व लोकशाही मूल्यांना अधिक महत्त्व देत होते.

## (३) संसदीय शासन :

डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचाराचा लोकशाही हा मूलस्रोत आहे. आधुनिक लोकशाही शासनाच्या अध्यक्षीय शासन व संसदीय शासन या दोन्ही शासनपद्धतीसंबंधींचे संघटनात्मक तौलनिक विचार त्यांनी व्यक्त केले आहेत. काही वेळेस अध्यक्षीय शासनाचा तर काही वेळा संसदीय शासनाचा भारताच्या संदर्भात पुरस्कार केलेला आढळतो. १९४६ साली उद्याच्या स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी त्रि-मंत्री योजनेनुसार निर्माण केलेल्या घटना-समितीला सादर केलेल्या निवेदनात (स्टेटस अँड मायनॉरिटीज) डॉ. आंबेडकरांनी संसदीय शासन भारतास उपयुक्त नाही, अध्यक्षीय शासन अधिक अनुकूल होईल असे मत व्यक्त केले. परंतु नंतर प्रत्यक्ष घटना-समितीत आणि 'संसदीय लोकशाही' पुस्तिकेत त्यांनी संसदीय शासनाचे समर्थन केल्याचे आढळते.

लोकशाही समाजरचनेची साध्ये व मूल्ये लोकशाही शासनाच्या साधनातूनच कार्यान्वित व पूर्ण होतात. म्हणून "लोकशाही हा शासनाचा असा एक प्रकार व पद्धती आहे की, ज्या माध्यमातून लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात हिंसेशिवाय क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणता येते." डॉ. आंबेडकर अशी लोकशाहीची व्याख्या करतात. हिंसेशिवाय वा बळाखेरीज मत व मन-परिवर्तनाचा दुसरा पर्याय म्हणजे चर्चा व विचारविनिमय प्रक्रिया. या प्रक्रियेतून लोकशाही समाज व शासन गतिमान होत राहते. लोकशाही सत्तारचनेत निर्वाचित संसदेत चर्चेतून, वादविवादातून निर्णय घेतला जातो. त्या निर्णयाची म्हणजेच कायद्याची अंमलबजावणी कार्यकारिणी करते. संसद व कार्यकारिणी या शासनसत्ताविभागांच्या परस्पर संबंधांतून संसदीय वा अध्यक्षीय शासनप्रणाली आकारित होतात. भारताच्या घटनात्मक विकासक्रमात १९१९ व १९३५ च्या भारत शासन कायद्यान्वये मंत्रिमंडळात्मक (संसदीय) शासनपद्धतीचा स्वीकार केला होता. स्वतंत्र भारताने संसदीय पद्धतीचा त्याग करून अध्यक्षीय शासनप्रणालीचा स्वीकार करावा असे आग्रही निवेदन डॉ. आंबेडकरांनी घटना-समितीला सादर केले होते. या निवेदनात या दोन्ही शासन-प्रकारांच्या वैशिष्ट्यांची तुलना करून भारतीय समाजाच्या संदर्भात अध्यक्षीय शासन योग्य आहे हे विशद केले होते:

## (४) वैशिष्ट्ये व आक्षेप :

संसदेतील बहुमतवाल्या पक्षाने सरकार बनविणे, अन्यपक्षीय सदस्यांना सरकारात न घेणे आणि बहुमताचा विश्वास असेपर्यंत सरकार टिकणे ही संसदीय शासनाची वैशिष्ट्ये आहेत. डॉ. आंबेडकरांच्या मते, भारतात ही पद्धत स्वीकारली, तर अल्पसंख्यांकांच्या विशेषतः अस्पृश्य वर्गाच्या जीवित, स्वातंत्र्य व सुखप्राप्ती यावर विपरित परिणाम होतील. कारण भारतातील बहुमत हे इंग्लंडप्रमाणे राजकीय बहुमत नाही तर ते मूलतः जातीय बहुमत आहे. त्यामुळे बहुसंख्या असणाऱ्या जातीतच कार्यकारी सत्ता सातत्याने केंद्रित होणार. बहुसंख्या असणारी जमात कायमपणे सत्ताधारी वर्ग राहणार. अल्पसंख्य जाती-जमातींना शोषित व शासित वर्ग म्हणून दुय्यम दर्जा राहणार. अल्पसंख्य जमातींचे भवितव्य बहुसंख्यांक जात आपल्या हितसंबंधांनुसार वा इच्छेनुसार ठरविणार. कारण या पद्धतीत अल्पसंख्यांकांचा कार्यकारी सत्तेत समावेश व सहभाग नाही. ही लोकशाही नसून हिंदू साम्राज्यवाद म्हणावा लागेल. हिंदूंची बहुसंख्या व सत्ता या दोन पात्यात भारतातील अल्पसंख्य अस्पृश्य समाज सापडल्याने स्वातंत्र्य व स्वराज्य यांचा चैतन्यस्पर्श व अनुभूती यापासून हा समाज वंचितच राहील. याशिवाय भारतीय समाजात विविध जाती-जमाती असल्याने, अनेक लहान मोठे राजकीय पक्ष वा गट निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे सत्ता मिळविण्यासाठी या पक्षांच्या व गटांच्या वारंवार युती व फुटी होत गेल्या तर स्थिर सरकारच्या अभावी अराजकता निर्माण होईल. या सर्व कारणांमुळे संसदीय शासनाचा स्वीकार न करता, अमेरिकेप्रमाणे अध्यक्षीय शासनपद्धतीचा अवलंब करावा अशी शिफारस डॉ. आंबेडकरांनी वरील निवेदनात केली.

## (५) अध्यक्षीय शासन आवश्यक :

भारताच्या संदर्भात अल्पसंख्य जातींच्या व वर्गांच्या हिताच्या दृष्टीने अध्यक्षीय शासन हे लोकशाही शासनाचे आदर्श प्रतिमान आहे, अशी डॉ. आंबेडकरांची कल्पना होती. या पद्धतीत अल्पसंख्यांकांचा बहुसंख्यांकांच्या बरोबरच सरकारमध्ये व प्रशासनामध्ये सहभाग होऊ शकतो. त्यामुळे बहुसंख्यांकांच्या नियंत्रणाला आळा बसतो. तसेच अल्पसंख्यांक वर्गाचा ज्यांच्यावर विश्वास आहे, अशाच प्रतिनिधींचा समावेश होऊ शकतो आणि दक्ष व कार्यक्षम प्रशासनासाठी आवश्यक असणाऱ्या सरकारच्या स्थिरतेची हमी मिळू शकते. डॉ. आंबेडकरांनी वरील घटना-मसुद्यात प्रस्तावित अध्यक्षीय पद्धतीत कार्यकारिणीच्या सभासदाला कायदेमंडळात बसण्याचा, चर्चेत बोलण्याचा व उत्तरे देण्याचा अधिकार द्यावा व त्याचबरोबर अनुसूचित जाती-जमातींना कायदेमंडळात, कार्यकारिणीत व प्रशासनात भारांकित प्रतिनिधित्वाचा हक्क असावा असेही सुचविले होते. त्यामुळे ही पद्धती संसदीय शासनप्रणालीइतकीच लोकशाही व जबाबदार होईल अशी त्यांची धारणा होती.

## (६) संसदीय शासन समर्थन :

परंतु स्वातंत्र्यानंतर भारताच्या घटना-समितीच्या कामकाजाला ज्या वेळी प्रत्यक्ष सुरुवात झाली, त्या वेळी डॉ. आंबेडकरांच्या संसदीय शासनप्रणालीसंबंधींच्या भूमिकेत बदल झाल्याचे दिसून येते. भारतीय घटना-समितीने संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केला. या प्रकाराचे समर्थन करताना व्यक्ती व समाज या दोघांच्या हिताच्या दृष्टीने ही पद्धती सर्वोत्तम आहे असे त्यांनी म्हटले. एवढेच नव्हे तर त्यांनी 'संसदीय लोकशाही'या पुस्तिकेत, संसदीय पद्धतीमुळे व्यक्तीच्या विविध स्वरूपाच्या विधायक वृत्ती व जाणीवा यांना चालना मिळते, व्यक्ती-जीवनाचा विकास व समाजाचे सर्व क्षेत्रातील परिवर्तन विवेकाने व शांततामय मार्गाने होऊ शकते असे मत व्यक्त केले. संसदीय शासनपद्धतीचा प्रभाव व यश लोकांच्या जागृत जाणीवा, जबाबदार विरोध, निर्भय व मुक्त वातावरणातील निवडणुका आदि गोष्टींवर अवलंबून असते. याकडे त्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांचे हे विचार आजही महत्त्वाचे व मार्गदर्शक आहेत.

डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय राज्यपद्धती व शासनपद्धती यांची जी चिकित्सा केली, ती जातीय स्वरूपाच्या वास्तवाच्या संदर्भात केली. सत्तारचनेत स्वतंत्र मतदारसंघ, जातीय प्रतिनिधित्व, अल्पसंख्यांकांना भारांकित प्रतिनिधित्व असले पाहिजे – अशा मागण्या ते सातत्याने करीत होते. पण स्वातंत्र्यानंतर जातीयता नष्ट होऊन राष्ट्रीयता वाढावी व सर्व भारतीय समाज एकात्म व्हावा, धर्मनिरपेक्ष व जातनिरपेक्ष राज्यपद्धती विकसीत व्हावी या व्यापक राष्ट्रीय ध्येयवादाने त्यांनी पूर्वीच्या तत्संबंधीच्या भूमिकेचा त्याग केला. भारतीय राज्यघटनेत धर्म-जातनिरपेक्ष राष्ट्रवादाचा व राज्य शासनपद्धतीचा जाणीवपूर्वक पुरस्कार केला हे लक्षात घेणे आज जरुरीचे आहे.

□ □ □

# ५.

# डॉ. आंबेडकर आणि राष्ट्रवाद

## राष्ट्रविषयक संकल्पना

डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारात राष्ट्र या संकल्पनेचे त्यांनी केलेले विवेचन महत्त्वाचे आहे. राष्ट्र व राष्ट्रवाद यांचे डॉ. आंबेडकरकृत संकल्पन त्यांच्या राजकारणाचा वैचारिक पाया आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांच्या राजकारणाचे आकलन होण्यासाठी त्यांचे राष्ट्र व राष्ट्रविषयक विचार प्रथमतः समजून घेतले पाहिजेत. डॉ. आंबेडकर प्रथमपासूनच स्वातंत्र्यलढ्यातील प्रमुख राष्ट्रीय प्रवाह असणाऱ्या काँग्रेसला व म. गांधींच्या नेतृत्वाला उघड विरोध करीत होते. ब्रिटिश सत्तेवर आपल्या राजकीय शक्तीचा संसदीय, सनदशीर मार्गाने दबाव आणण्याचा डॉ. आंबेडकर प्रयत्न करीत होते. परंतु सरकारशी उघड, तीव्र राजकीय संघर्ष त्यांनी सातत्याने उभा केला नाही. यामुळे त्यांच्यावर व त्यांच्या अस्पृश्य चळवळीवर राष्ट्रद्रोहीपणाचा, ब्रिटिश व मुसलमानधार्जिणे असल्याचा असमंजस आरोपही करण्यात आला होता. त्यांची राष्ट्र व राष्ट्रवादविषयक मते समजावून घेतली तर त्यामुळे त्यांच्या भूमिकेबद्दलचे अनेक गैरसमज सहजच दूर होण्यास ते उपयुक्त ठरेल. त्यांचे राजकीय स्वातंत्र्यासंबंधीचे विचार, राजकीय सत्ताविषयक दृष्टिकोण, काँग्रेस व म. गांधी यांच्यासंबंधातील त्यांची भूमिका, पाकिस्ताननिर्मिती व भाषावार प्रांतरचना यांच्या संदर्भातील त्यांचे विचार यांच्या मुळाशी त्यांची राष्ट्र-राष्ट्रवादाविषयीची मते आहेत.

### (१) एकात्म समाजातच एकात्म राष्ट्र :

मानवी समाजाच्या विकासकामात समाजाचे संघटन करणारी राष्ट्र संकल्पना ही एक भावप्रेरक शक्ती आहे. विविध कारणांमुळे आपण एक आहोत आणि दुसऱ्या लोकसमूहापासून निराळे आहोत ही समाजांतर्गत एकत्वाची आणि बहिर्गत अलगत्वाची अशी दुहेरी भावना राष्ट्र या संज्ञेत अंतर्भूत आहे. राष्ट्रीय भावनेच्या या दुहेरी स्वरूपात तिचे विधायक व विध्वंसक सामर्थ्य दडलेले आहे. अनेक साम्राज्यांची आणि राष्ट्र-राज्यांची निर्मिती, विकास व विनाश, राष्ट्रभावनेने आजपर्यंतच्या मानवी इतिहासात घडवून आणला आहे. राष्ट्रवादाची ही ऐतिहासिक भूमिका आणि समाजांतर्गत ऐक्य वाढविण्याची त्यांची प्रचंड शक्ती डॉ. आंबेडकरांना मान्य असली तरी त्यांनी राष्ट्रवादाच्या विचाराला एक नवे परिमाण दिले आहे. त्यांच्या दृष्टीतून राष्ट्रवादाच्या व राष्ट्रीय एकात्मतेच्या धर्म, भाषा, वाङ्मय, संस्कृती व जीवनपद्धती अशासारख्या ज्या घटक-

शक्ती आहेत, त्यांच्या संकलित प्रभावातून राष्ट्रनिर्मितीच्या प्रेरणा निर्माण होत असल्या तरी, केवळ याच घटक शक्तींच्या भावनिक आधारावर राष्ट्रीय एकात्मता सुदृढ होते असे नाही. समाजांतर्गत सामाजिक-आर्थिक स्तरांचे व संबंधांचे वास्तव स्वरूप काय आहे यावरही राष्ट्रीय समाजाची उभारणी होते. सामाजिक-आर्थिक विषमता, शोषण व दास्य, जन्मजात-उच्चनीचता अशासारख्या प्रवृत्तींच्या योगाने शतकानुशतके विद्ध व विदीर्ण झालेल्या भारतीय समाजात ऐक्याची भावना मूळ धरू शकत नाही. सामाजिक-आर्थिक समानता व न्यायाखेरीज सामाजिक एकात्मता नाही, आणि त्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता बळकट होऊ शकत नाही. एकात्म समाजच एकात्म राष्ट्र निर्माण करू शकतो. समान संधी देणारा व स्वतंत्र समाज ही राष्ट्रबांधणीची वा राजकीय स्वातंत्र्याची पूर्व अट आहे. आर्थिक-सामाजिक एकसंधपणा आणि अभिसरणशीलता हा राष्ट्रवादाचा प्रमुख घटक आहे, ह्याकडे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे दुर्लक्ष होत होते. त्यातील ही महत्त्वाची उणीव डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केली. स्वतंत्र राष्ट्रातील लोक समाजांतर्गत सामाजिक-आर्थिक संधींच्या अभावी मानवी हक्कांना वंचित राहतात, ते परतंत्र राहतात ही गोष्ट भारतातील अस्पृश्य, दलित समाजाच्या व अमेरिकेतील निग्रो लोकांच्या बाबतीत दिसून येते असेही ते स्पष्ट करतात. यामुळे देश स्वतंत्र पण जनता परतंत्र अशी परिस्थिती निर्माण होते. देशाचे स्वातंत्र्य व लोकांचे स्वातंत्र्य असा फरक करून, समाज-व्यवस्थेचे परिवर्तन सत्ता-बदलाला वा राष्ट्रीय स्वातंत्र्याला आवश्यक ठरते. या विचारानुसार काँग्रेस पक्षात वरिष्ठ जातींचे बहुमत व वर्चस्व असल्याने राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ ही वरिष्ठ वर्ग-जातींच्या वर्चस्वासाठीची चळवळ आहे असे डॉ. आंबेडकरांनी मानल्यामुळे, त्यापासून त्यांनी आपली चळवळ दूर ठेवली. त्यांचा विरोध राजकीय स्वातंत्र्याला नव्हता, तर स्वातंत्र्योत्तर संभाव्य सत्ता-रचनेतील वरिष्ठ जाती-वर्गांच्या वर्चस्ववादाला होता. याविरुद्ध डॉ. आंबेडकरांना अस्पृश्य समाजाच्या, अस्मितेच्या व उन्नतीच्या कक्षा आणि आत्मशक्तीच्या जाणीवा वाढवावयाच्या होत्या. त्यासाठी त्यांच्या संघटित राजकीय शक्तीचे स्वतंत्र अस्तित्व त्यांना आवश्यक वाटत होते. स्वातंत्र्यपूर्व काळांत त्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ, भारांकित प्रतिनिधित्व, स्वतंत्र वसाहती अशा काही एकांगी मागण्या केल्या. राष्ट्रीय नेत्यांवर टीका केली. परंतु व्यापक वास्तवाचा विचार करून तुटेपर्यंत त्यांनी आपली भूमिका ताणली नाही. जातीय निवाड्या-संदर्भात म. गांधींशी तडजोड केली, घटना-मसुदा समितीचे अध्यक्षपद स्वीकारले. केंद्रीय मंत्रिमंडळात सहभागी झाले आणि नंतर व्यापक सामाजिक पायावर रिपब्लिकन पक्ष स्थापनेची घोषणा केली. अलग अस्तित्वाने नाही, तर व्यापक राष्ट्रीय प्रवाहात सामील होऊन भारतीय राष्ट्रवादाला जाती-धर्मनिरपेक्षतेचे परिमाण देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

## (२) धर्मनिष्ठ राष्ट्रवाद लोकशाहीविरोधी :

डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणाऱ्या भारतीय राष्ट्रवादाचे स्वरूप त्यांनी तयार केलेल्या भारतीय राज्यघटनेत प्रतिबिंबित झालेले आहे. त्यांच्या मते भारतीय

राष्ट्रवाद हा धर्मनिरपेक्ष असला पाहिजे. कारण भारतात भिन्न धर्माचे लोकसमूह आहेत. भारताचा स्वातंत्र्य-लढा हा धर्मनिरपेक्ष राजकीय लढा होता. हा लढा बहुसंख्य हिंदुधर्मीयांच्या धर्मसत्तेसाठी नव्हता, तर लोकसत्तेसाठी होता. दुर्दैवाने धार्मिक पायावर भारताची फाळणी होऊन भारत खंडित झाला; तरी उर्वरित भारतातही अनेक धर्म असल्याने भारतीय राज्य हे धर्मनिष्ठ न राहता, धर्मनिरपेक्ष राहील अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती. धर्मनिष्ठ राष्ट्रवाद हा मूलतः लोकशाहीविरोधी असतो. कारण भिन्नधर्मीय अल्पसंख्यांकांना त्यात दुय्यम, गौण नागरिकत्व असते. शिवाय अंतर्गत व बहिर्गतदृष्ट्या तो समाज आक्रमक व वर्चस्ववादी असतो. तसेच त्यांच्या मते जातीयवादी ही राष्ट्रविरोधी शक्ती आहे. मानवी गुणवत्ता व नैतिकता वस्तुतः जातीनिरपेक्ष असते; पण भारतीय समाज जातीबद्ध असल्याने मानवी गुण व नीतिमत्ताही जातीबद्ध बनतात आणि वरिष्ठ जाती कनिष्ठ जातीवर हुकमत गाजवितात. त्यामुळे सामाजिकदृष्ट्या तुटलेपणा व वैरभाव निर्माण होतो. सामाजिक भ्रातृभाव हाच राष्ट्रीय एकतेला प्रेरक ठरतो. स्वातंत्र्यानंतरच्या चार दशकांच्या काळात राष्ट्रीय एकात्मतेला पायाभूत असणारा सामाजिक, धार्मिक भातृभाव आपण निर्माण करू शकलो नाही. उलट आज धर्म-जाती-जमातवादी शक्तींचे फुटीर वा स्वार्थी राजकारण वाढत आहे हे मंदिर-मस्जिद, मंडल व महाल (प्रवेश) यांच्या संदर्भात स्पष्ट दिसून येत आहे. तेव्हा डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवादाचा विचार आजही मार्गदर्शक आहे. सामाजिक ऐक्यावर आधारित राष्ट्रवाद हा जहरी, दहशतवादी असू शकत नाही. समाज सत्तासंक्रमण हे दोन्ही शांततेने, विवेकाने आणि संसदीय मार्गाने झाले पाहिजे, असा डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या राष्ट्रवादाच्या संकल्पनेवरही पडला आहे. राष्ट्रवादावरील त्यांचे विवेचन साक्षेपी व सखोल असेच आहे.

## (३) मुस्लिम समाज, हिंदू समाज व राष्ट्र :

डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवाद विषयक संकल्पनात मुस्लिम समाजाच्या संदर्भात मात्र एक स्पष्ट विसंगती जाणवते. सायमन कमिशनला सादर केलेल्या निवेदनात त्यांनी मुस्लिमांच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीस विरोध केला होता. परंतु १९४० साली 'पाकिस्तान विषयक विचार' या ग्रंथात त्यांनी पाकिस्तान निर्मितीचा तात्त्विकदृष्ट्या पुरस्कार केला. मुसलमान समाज हे स्वतंत्र राष्ट्र आहे. कारण त्याच्या ठिकाणी राष्ट्रीयता व राष्ट्रवाद आहे. भारतापासून ते वेगळे होण्यातच भारताचे हित आहे. पाकिस्तानपासून भारतास कोणताही धोका नाही. मुस्लिम अन्य धर्मीयांना शत्रू मानतात. भारताबद्दल त्यांना प्रेम नाही. बहुसंख्य हिंदूंच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी ते धर्मनिष्ठ राजकारण करतात व राष्ट्रीय प्रवाहापासून अलिप्त राहतात. मुस्लिम समाज हा धर्मचिकित्सा व सुधारणा करीत नाही. त्यामुळे तो प्रतिगामी व लोकशाहीविरोधी विचारांचाच राहतो. इस्लाम हा जागतिक धर्म आहे; सार्वत्रिक व सार्वकालिक धर्म आहे अशी मुस्लिमांची श्रद्धा आहे. इस्लाम धर्मातील समानता व बंधुत्व हे मुस्लिमांपुरतेच

मर्यादित आहे. केवळ मुसलमानी राज्यालाच त्यांची निष्ठा असते. या सर्व वैशिष्ट्यांमुळे मुस्लिम समाज हा व्यावर्तक स्वरूपाचा व पूर्णतः अलग राहतो. भारतातील मुस्लिमांना पाकिस्तानच्या स्वरूपात स्वतंत्र राष्ट्र स्थापावयाचे आहे. त्यांना आपल्या स्वतंत्र भवितव्याचा शोध लागला आहे. त्यामुळे भारताची फाळणी करून पाकिस्ताननिर्मिती करणे योग्य होईल. अखंड भारत जागता ज्वालामुखी ठरेल. याप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी वरील ग्रंथात पाकिस्तानचे समर्थन केले.

हिंदू समाजाची मुस्लिम समाजाशी तुलना करताना डॉ. आंबेडकर असे मत व्यक्त करतात की, हिंदू हे राष्ट्रही नाही आणि समाजही नाही. हिंदूधर्मात जातीय जीवन हेच सार्वजनिक जीवनाचे खरे स्वरूप आहे. त्यामुळे व्यापक सामाजिक-आर्थिक व सांस्कृतिक जीवनात संधी-संपर्क व संवाद या क्षमतांचा अभाव असतो. परस्पर जिव्हाळा व जवळीक या जाणीवा निर्माण होत नाहीत. सामाजिक-आर्थिक पुनर्रचनेत समाजाच्या या क्षमता वाढविण्याने राष्ट्राचा पाया निर्माण होतो. समाजातील सामाजिक-आर्थिक-शैक्षणिक स्वरूपाच्या अंतर्विरोधाच्या अस्तित्वामुळे जर हिंदू समाज राष्ट्र होत नसेल, तर मुस्लिम समाजही राष्ट्र होऊ शकणार नाही. कारण मुस्लिम समाजातही असेच विविध अंतर्विरोध अस्तित्वात आहेत. याकडे डॉ. आंबेडकर यांचे दुर्लक्ष झालेले दिसते. मुस्लिम समाजातही हिंदूंच्याप्रमाणे सामाजिक-आर्थिक स्तरांमध्ये विरोधी हितसंबंध आहेत. त्या समाजातही जातीयता, स्त्री-पुरुष असमानता, गरीब-श्रीमंत भेद असे विरोध वाढत आहेत. सामाजिक-आर्थिक वास्तवाच्या पातळीवर हिंदू-मुस्लिम दोन्ही समाज एकसारखेच आहेत. दोघांनाही समान भौतिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. दोन्हीही सांप्रदायिक धर्मांपुढे सामाजिक-आर्थिक पुनर्रचनेचे आव्हान उभे आहे. मुस्लिम समाजाचे सामाजिक वास्तव डॉ. आंबेडकरांनी लक्षात न घेता धार्मिक व भावनिक वैशिष्ट्यावर अधिक भर देऊन मुस्लिम राष्ट्रवादाचे पाकिस्तान-निर्मितीचे समर्थन केले असे वाटते. हिंदू धर्माबद्दल व तत्कालीन राजकीय नेतृत्वाबद्दल असणाऱ्या पूर्वग्रहामुळे हा समाज राष्ट्र वा समाज होऊ शकत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले असावे. त्याचबरोबर हिंदू-मुस्लिम संघर्ष जागता ठेवण्याचे कार्य जातीयवाद्यांबरोबरच ब्रिटिश सत्ताही जाणीवपूर्वक करीत होती, याकडेही त्यांचे दुर्लक्ष झालेले दिसते. तेव्हा मुस्लिम राष्ट्रवादासंबंधींचा त्यांचा विचार त्यांच्याच विचारधारेशी विसंगत वाटतो.

## (४) भाषावार प्रांतरचना :

डॉ. आंबेडकरांच्या निखळ राष्ट्रनिष्ठेचे दर्शन स्वातंत्र्योत्तर काळातील घटकराज्य पुनर्रचनेच्या संदर्भात त्यांनी केलेल्या विवेचनात दिसून येते. भारताचे राष्ट्रीय ऐक्य व लोकशाही शासन दृढतर होण्यासाठी, भाषावार प्रांतरचना आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. स्वातंत्र्य-लढ्यातील राष्ट्रीय नेतृत्वाचीही अशीच मागणी होती. काँग्रेसनेही आपल्या पक्ष-घटनेत या तत्त्वाचा स्वीकार केला होता. यामुळे स्वातंत्र्यानंतर भाषिक तत्त्वावर राज्यनिर्मिती व्हावी यासाठी जनतेच्या चळवळी सुरू होणे क्रमप्राप्त होते.

राज्यघटनेने राज्यनिर्मितीचा अधिकार संसदेला दिला होता. जनतेचा दबाव वाढू लागला, तसा राज्यपुनर्रचना आयोग स्थापन करण्यात आला. या आयोगाला व त्यापूर्वीच्या धार आयोगाला सादर केलेल्या निवेदनात डॉ. आंबेडकरांचे भाषिक तत्त्वावर राज्यपुनर्रचना झाली पाहिजे, त्यामुळे लोकशाही शासन सुलभ व कार्यक्षम होईल, सामाजिक, एकसंधता वाढेल आणि एकभाषिक राज्य प्रभावी असते असे समर्थन त्यांनी केले. परंतु भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाचा पुरस्कार करताना त्यातील काही धोक्यांचा इशाराही त्यांनी दिला. यासंबंधांतील त्यांचे काही विचार आजच्या भारताच्या व लोकशाहीच्या विघटनाच्या वाढत्या प्रवृत्तींच्या संदर्भात तर अतिशय मौलिक आहेत.

राजकीय स्वातंत्र्य एकराष्ट्रीयत्वाची भावना लगेच दृढ करते असे नाही. ती एक दीर्घ प्रक्रिया असते. राजकीयदृष्ट्या एक राष्ट्र ही भावना प्रगल्भ व स्थिर होईपर्यंत भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक व वांशिक प्रश्न व प्रादेशिक अस्मिता आणि हितसंबंध यांचा मोठा प्रभाव त्या त्या जनसमूहावर असतो. या प्रश्नांना राजकीय स्वरूप प्राप्त होते व संघर्ष निर्माण होतो. जणू दोन स्वतंत्र राष्ट्रेच एकमेकांशी विरोध करीत आहेत असे दृश्य दिसते. या फुटीर, संकुचित व राष्ट्रविरोधी प्रवृत्ती-संदर्भात डॉ. आंबेडकर बजावतात की, 'भारतातील कोणताही माणूस हा प्रथमतः व अंतिमतः भारतीय असला पाहिजे. ही एकात्म नागरिकत्वाची जाणीव ऐक्य निर्माण करते.' यासाठी काही पथ्ये पाळली पाहिजेत असेही ते सांगतात. लोकशाही घटकराज्यातील बहुसंख्य जातीकडे, भाषिक-धार्मिक-वांशिक समूहाकडे सत्ता असणे स्वाभाविक आहे. परंतु त्यांनी अल्पसंख्यांकांना न्यायाची, समतेची, बंधुतेची वागणूक देणे आवश्यक आहे. तसेच अल्पसंख्यांकांनीही आपल्या योग्य व न्याय्य मागण्यांसाठी संघर्ष करताना लोकशाही मार्ग, साधने व संकेत यांचे उल्लंघन करता कामा नये हेही स्पष्टपणे सांगतात. नाही तर देशाचे भवितव्य व एकता विघटनाच्या आवर्तात सापडेल व राष्ट्राचे अस्तित्वच धोक्यात येईल. भारत आकाराच्या दृष्टीने संघराज्यात्मक असला, तरी सत्ता-आशयाच्या दृष्टीने केंद्र प्रबळ आहे हे स्पष्ट आहे. आज केंद्र व राज्य यातील तणाव तीव्र होत आहेत. स्वातंत्र्यानंतर संलग्नीकरण, विभाजन, विलगीकरण व विलीनीकरण या मार्गांनी राज्य-दर्जा प्रदान करून अनेक असमान घटक राज्ये निर्माण झाली. १९५६च्या राज्यपुनर्रचना आयोगाचे विचारच या राज्यनिर्मितीच्या प्रक्रियेत प्रभावी झालेले दिसत आहेत. राज्यपुनर्रचना आयोगाच्या शिफारसींच्या आधारे आलेल्या राज्यनिर्मितीतून भारताच्या राजकीय जीवनातील तणाव कमी होणार नाहीत असे इशारे डॉ. आंबेडकरांनी दिले होते. त्यांच्या मृत्यूनंतरच्या तीन तपांच्या कालावधीत त्यांचे इशारे योग्य होते हे अनुभवास आले आहे. आजही या राज्यपुनर्रचनेच्या संदर्भात त्यांचे विचार उपयुक्त ठरतील.

## (५) लहान भाषिक राज्यांचे समर्थन :

भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वाचा अर्थ राज्यपुनर्रचना आयोगाने एका भाषेचे

एकच राज्य असा केल्याने क्षेत्राच्या, लोकसंख्येच्या व प्रतिनिधित्वाच्या बाबतीत असमान राज्ये अस्तित्वात आली. या असमान राज्यांच्यामुळे भारतीय राजकारणात उत्तर भारत - दक्षिण भारत, केंद्र-राज्य असे संघर्ष बदलत्या राजकीय परिस्थितीबरोबर निर्माण होऊ लागले. यामुळे राजकारणात एक अनिष्ट असमतोल व द्वैत निर्माण झाले. याचा विचार या आयोगाने केला नाही. या असमतोलाच्या प्रवृत्तींचे निर्मूलन व्हावे यासाठी डॉ. आंबेडकरांना घटक-राज्यांना स्वायत्तता असावी पण त्याची परिणती संघराज्यातून फुटून जाण्यात होऊ नये असे वाटत होते. तसेच एकूण भाषेचे एक मोठे राज्य याऐवजी एका मोठ्या भाषिक राज्याची दोन-तीन राज्ये असावीत असे त्यांचे मत होते. उत्तरेचे राजकीय वर्चस्व असू नये म्हणून श्री. राजाजींनी उत्तर-दक्षिण भारत अशा दोन संघराज्यांचे भारत हे संयुक्त संघराज्य असावे अशी योजना मांडली होती. ती डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हती. वित्तीयदृष्ट्या सक्षम असणारी एका भाषेची एकापेक्षा अधिक राज्ये निर्माण केल्यास राजकीय समतोल साधला जाईल, लोकशाही प्रशासन अधिक कार्यक्षम होऊ शकेल. अशा प्रकारची भाषावार प्रांतरचना आत्मीयतेची भावना विकसीत करेल आणि त्यातून राष्ट्रजीवनाला सहजीवनाचा पाया मिळू शकेल. भाषावार प्रांतरचनेने जातीय वा सांस्कृतिक संघर्ष टाळण्यास सोयीचे होईल. परंतु डॉ. आंबेडकर हेही स्पष्ट करतात की, भाषिक राज्याची प्रशासन-विषयक भाषा स्वाभाविकपणे राज्यीय वा मातृभाषा राहील. त्यामुळे काही काळानंतर भाषिक आत्मियतेचा अभिनिवेश वाढू लागेल व स्वतंत्र राष्ट्रीयतेची भावनाही वाढू लागेल. भारतीय राष्ट्रवादाला हा मोठा धोका निर्माण होईल. हा धोका टाळावा व भारतीय राष्ट्रीयतेचे संवर्धन व्हावे म्हणून भाषिक राज्याची प्रशासनभाषा हिंदी ठेवावी असा विचार डॉ. आंबेडकरांनी मांडला होता. भारतीय संघराज्यातील घटक-राज्यनिर्मितीच्या संदर्भात त्यांनी भारताच्या भवितव्याचा व सामाजिक एकसंधतेचा प्रामुख्याने विचार केला. भाषिक परंतु लहान घटक-राज्यांच्या योगाने सामाजिक-आर्थिक पुनर्रचना अधिक सुलभ व सत्वर होऊ शकेल, त्यावर आधारित राष्ट्रीयता टिकाऊ स्वरूपाची असेल अशी त्यांची मूलतः धारणा होती. तसेच लहान आकाराच्या भाषिक राज्यातील सत्तारचनेत अल्पसंख्यांकांचा सहभागही सुलभ तऱ्हेने व अधिक प्रमाणात होईल. मोठ्या भाषिक राज्यात त्या राज्यातील जातीय बहुसंख्यांकांचे वर्चस्व राहील. महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यात ही राजकीय वस्तुस्थिती अनुभवास येत आहे. मोठ्या आकाराची भाषिक राज्ये विकासाच्या व अल्पसंख्यांकांच्या दृष्टीने फारशी उपयुक्त नाहीत असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. म्हणून तर त्यांनी उत्तरप्रदेश, बिहार, महाराष्ट्र आदि मोठ्या घटक राज्यांचे विभाजन करून लहान घटक राज्ये निर्माण करावीत असे आग्रहाने सांगितले. त्यांच्या या मतांचा स्वीकार करणे हे तत्कालीन प्रस्थापित सत्ताधारी वर्गाला, पक्षाला अवघडच होते. परंतु भाषिक तत्त्वावरील घटक-राज्य निर्मितीचा विचार त्यांनी राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही शासन, राजकीय वास्तव व समाज-परिवर्तन या व्यापक संदर्भात केला. आजही यासंबंधीच्या डॉ. आंबेडकरांच्या विचारांची समर्पकता प्रकर्षत्वाने जाणवते.

□ □ □

# ६.

# डॉ. आंबेडकर - राजकीय सत्ता व राजकीय प्रतिकार

## राजकीय सत्ता-संघटन-संघर्ष विषयक विचार :

राजकीय सत्ता, संघटना व संघर्ष यासंबंधीचे डॉ. आंबेडकरांचे विचार, त्यांच्या सामाजिक चळवळींचे व राजकारणाचे स्वरूप समजावून घेण्यास अतिशय महत्त्वाचे आहेत. भारतीय जीवनाच्या आमूलाग्र परिवर्तनात त्यांना विचार, धर्म व व्यवस्था अशी त्रिविध परिवर्तने अभिप्रेत होती. प्रस्थापित हिंदू समाजव्यवस्थेने अत्यंत निर्घृणतेने दडपलेल्या अस्पृश्य समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी ते आयुष्याच्या अखेरीपर्यंत अविश्रांत झगडले. तरी त्यांच्या अस्पृश्यताविरोधी लढ्याची अंतिम परिणती मानवी स्वातंत्र्य, समता व प्रतिष्ठा यांच्या प्रस्थापनेत होत होती. त्यांचा अस्पृश्यताविरोधी विचार धर्म, वर्ण-जाती, वर्ग, सत्ता, मालमत्ता आदि संकल्पना व संस्था यांच्या चिकित्सा विचारात विकसीत होतो. प्रस्थापित समाज-व्यवस्थेच्या या आधारभूत प्रवृत्तींच्या अनिष्ट व अन्याय्य स्वरूपाचे निर्मूलन करून, नव्या मूल्यत्रयीवर समाजव्यवस्था निर्मितीचे दिग्दर्शन डॉ. आंबेडकर करीत होते.

### (१) राजकीय सत्ता :

'राजकीय सत्ता हे व्यवस्था-परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे' असे डॉ. आंबेडकर मानीत. भारतीय समाजाच्या सत्ता-परिघात अस्पृश्य समाजाला शतकानुशतके स्थान नसल्याने तो समाजाचा अराजकीय भाग म्हणून सत्तावंचितच राहिला. अस्पृश्य समाजाची उद्याची समस्या ही सत्तेची, सत्ता-संपादनाची समस्या आहे हे त्यांनी प्रथम ओळखले. आणि अस्पृश्यांच्या प्रश्नाला राजकीय परिमाण दिले. अस्पृश्य समाजाच्या राजकीयीकरणाची प्रक्रिया त्यांनी सुरू केली. त्यामुळे तो समाज एका नव्या राजकीय आकांक्षेने भारला गेला. गुलामीच्या शृंखला तोडून सत्ता व संपत्तीच्या प्रवाहात आपण सहभागी होऊ शकतो हा विश्वास डॉ. आंबेडकरांनी आपल्या समाजाला दिला. मालमत्ता-संबंधाने वा उत्पादन-संबंधाने सत्तासंबंध निश्चित होतात हे मार्क्सवादी मत खरे असले, तरी भारताच्या सामाजिक विषमतेच्या संदर्भात घटनात्मक लोकशाहीच्या आधारे सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा यांच्या प्रवाहात आपल्या समाजाला उतरता येईल असे त्यांना वाटत होते. समाजव्यवस्था सत्ता व संपत्तीच्या सामाजिक संबंधाकडून प्रामुख्याने आकारित होते. हा समाजजीवनविषयक भौतिक दृष्टिकोण त्यांच्या विचारात

दिसून येतो.

डॉ. आंबेडकरांच्या मते राजकीय सत्ता ही सर्वांगीण सामाजिक प्रगतीची गुरु -किल्ली आहे. अस्पृश्य समाजाला ही सत्ता संपादन करण्याखेरीज गत्यंतर नाही. सत्ता-संपादन हे राजकारणाचे उद्दिष्ट असते. अस्पृश्य समाजाच्या राजकीय जाणीवा राजकीय कृतीसाठी कार्यप्रवण करणे व स्वतःच्या संघटित शक्तीतून सत्ता-निर्मितीत सहभागी होणे हे त्यांना अत्यंत निकडीचे वाटत होते. डॉ. आंबेडकरांनी सत्तेचा स्वतंत्र सिद्धांत मांडला नसला, तरी त्यांच्या मते अपेक्षित व्यवस्था-परिवर्तनाचे समाजाचे सामर्थ्य किंवा क्षमता म्हणजे सत्ता होय. शोषितांनी जागृत व संघटित होऊन सत्ता प्राप्त केली पाहिजे. मानवमुक्तीचे क्रियाशील, व्यापक व उघड राजकारण केले पाहिजे. डॉ. आंबेडकरांच्या राजकारण संकल्पनेला नैतिकतेचे व निर्मलतेचे अधिष्ठान आहे. राजकारण व्यक्तिनिष्ठ नसावे, ते मूल्यनिष्ठ असावे. राजकारण हे व्यक्तिगत स्वार्थ, भोग व उत्कर्ष यासाठी न करता, समाजासाठी केले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. त्यांना कट-कारस्थानाचे, दहशतीचे व बदमाषी राजकारण पूर्णतः अमान्य होते. प्रबुद्ध व प्रगल्भ आणि जबाबदार राजकारणाचे तितकेच सक्षम नेतृत्व अस्पृश्य समाजातून आले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती. तरच तो समाज मुक्ती व विकास यांचे सततचे आव्हान, राजकारण पेलू शकेल. आणि अपेक्षित व्यवस्था-परिवर्तन सत्तेच्या सहाय्याने होऊ शकेल.

## (२) शिक्षण-संघटन-संघर्ष : शिक्षण :

डॉ. आंबेडकरांनी सत्तेची संकल्पना अशी स्पष्ट केल्यानंतर सत्ता संपादनासाठी अस्पृश्य समाजाने शिक्षण, संघटन व संघर्ष या मार्गांचा अवलंब केला पाहिजे यावरही भर दिला. शिक्षणाने, प्रबोधनाने व्यक्तीच्या जीवनविषयक सामाजिक जाणीवा, व्यक्तिगत सुप्त गुण, क्षमता व कौशल्ये वाढू शकतात. ज्ञानाच्या, विचारांच्या व भावनाच्या कक्षा रुंदावतात. दलित समाजात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे, म्हणून ते हयातभर प्रयत्नशील राहिले. शिक्षणप्रसार हे दलित चळवळीचे एक सातत्याचे अंग व सामर्थ्यस्थान राहिले आहे.

## (३) संघटन-संकल्पना :

शोषितांच्या संघटित सामर्थ्यातून सत्तानिर्मिती केली पाहिजे या विचारातून अस्पृश्यांचे राजकीय संघटन कसे असावे यासंबंधी डॉ. आंबेडकरांनी मार्गदर्शन केले. अस्पृश्यांचे राजकारण हे त्यांच्या तसेच सर्व शोषितांच्या मुक्तीचे राजकारण असते. यासाठी अस्पृश्यांनी स्वतःचाच पक्ष स्थापन करून संघटित होणे आवश्यक आहे. भारताच्या जातीबद्ध, श्रेणीबद्ध समाजात पक्षीय राजकारणाचा सामाजिक पाया जात हा असणार हा वास्तव संदर्भ लक्षात घेऊन, अल्पसंख्यांक असणाऱ्या अनुसूचित जातींनी आपला स्वतंत्र पक्ष स्थापला पाहिजे. डॉ. आंबेडकरांची अस्पृश्यासाठी स्वतंत्र

मतदारसंघाची मागणी होती. पण ती प्रत्यक्षात पूर्ण न झाल्याने निवडणुकीत अधिक सत्ता-जागा मिळाव्यात म्हणून दुसऱ्या समविचारी पक्षांशी युती, सहकार्य, संधी करणे आवश्यक ठरेल, परंतु काँग्रेस पक्षात जाऊन अस्पृश्य समाजाला सत्ता मिळणार नाही असेही ते म्हणत. अस्पृश्य समाजाचा स्वतंत्र पक्ष असेल, तर अन्य पक्षांना बहुमत न मिळाल्यास, सत्ताप्राप्तीसाठी आपल्या पक्षाचा पाठिंबा त्यांना मागावा लागेलच. यासाठी अस्पृश्यांचा स्वतंत्र पक्ष संघटित करून राजकीय प्रभाव व सत्ताशक्ती वाढविता येईल असे ते म्हणत.

## (४) स्वतंत्र मजूर पक्ष :

परंतु १९३६ साली ज्या वेळी डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली, त्या वेळी त्यांनी वरील विचार बदलला. ब्राह्मण्यग्रस्त नसलेल्या सवर्णांचा सहभाग घेऊन अस्पृश्यतेविरुद्धचा सामाजिक लढा जसा व्यापक केला, तसा राजकीय लढ्यासाठी सर्व जाती-धर्म-वर्गाच्या लोकांच्या व्यापक सामाजिक पायावरील पक्ष उभारावयाचा असे त्यांनी ठरविले. सर्व स्पृश्य-अस्पृश्य कष्टकरी जनतेचे आर्थिक आघाडीवरचे प्रश्न व हितसंबंध सारखेच असल्याने, आर्थिक लढे सहकार्याने लढले पाहिजेत. जातीय पातळीवरील राजकारण वर्गीय पातळीवर नेण्याचा विचार स्वतंत्र मजूर पक्षाच्या स्थापनेत, उद्दिष्टात व कार्यक्रमात दिसून येतो.

## (५) शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन :

दुसऱ्या महायुद्धाच्या बदलत्या परिस्थितीत भारताच्या संकल्पित राज्य-घटनाविषयक बदलांच्या चर्चेत अस्पृश्य समाजाच्या सहभागाची व संमतीची गरज नाही, असे क्रिप्सने जाहीर केल्यानंतर अस्पृश्यांच्या प्रश्नासाठी, राजकीय अस्तित्वासाठी डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाचे विसर्जन करून शे. का. फे. हा पक्ष १९४२ साली स्थापन केला. १९४६च्या निवडणुकीत हा पक्ष आपला प्रभाव पाडू शकला नाही. यामुळे अस्पृश्यांच्या आंदोलनात्मक राजकारणाचा व स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीचा ते पुन्हा विचार करू लागले. याच काळात त्यानी शे. का. फे. पक्षाच्या वतीने घटना समितीपुढे भावी घटनेसंबंधी निवेदन दिले होते. पण स्वातंत्र्यानंतर घटना मसुदा समितीचे ते अध्यक्ष झाल्यानंतर जी राज्यघटना तयार झाली, ती त्यांच्या पूर्वीच्या मसुद्यापेक्षा खूपच निराळी होती. पण या राज्यघटनेने भारतीय समाजजीवनात संधीची व सामर्थ्याची नवी दालने उघडली आहेत. समाजाच्या कर्तृत्वाच्या व विकासाच्या नव्या शक्ती उदयाला येतील या विचाराने त्यानी अस्पृश्य वर्गाला आत्ममग्न, संकुचित भूमिका सोडून समाजाच्या व्यापक हितासाठी काँग्रेससह अन्य राजकीय पक्षांशी असलेला विरोध विसरला पाहिजे, विविध संघटनांतर्फे सहकार्य केले पाहिजे असा सल्ला दिला. १९५१-५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत समाजवादी पक्ष व शे.का. पक्ष यांच्याशी समझोता करूनही शे.का.फे. पक्षाला मोठा पराभव पत्करावा लागला. पक्षाच्या

या पराभवाच्या चिकित्सेतून डॉ. आंबेडकरांना एक गोष्ट जाणवली की, अन्य वर्गापासून, समाजापासून अलग राजकीय अस्तित्वामुळे अस्पृश्यांच्या राजकीय शक्तीचा प्रभाव वाढत नाही. तेव्हा ज्यांना अस्पृश्यांविषयी, समता व एकात्मता याविषयी आस्था आहे, अशा समविचारी लोकांचा, दुसऱ्या पक्षांशी सहकार्य करणारा असा राजकीय पक्ष पुन्हा नव्याने निर्माण करावा. स्पृश्य व अस्पृश्येतरांच्या एका राजकीय पक्षाने राजकीय शक्ती वाढवावी असा विचार त्यांनी मांडला.

## (६) रिपब्लिकन पक्ष :

१९५६ साली असा व्यापक सामाजिक पाया असणाऱ्या रिपब्लिकन पक्षाची घोषणा डॉ. आंबेडकरांनी केली. या पक्षाची निर्मिती व कार्यक्रम एका अर्थाने त्यांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक विचारांचा स्वातंत्र्योत्तर काळातील प्रगल्भ विकासच होता. त्यांच्या मृत्यूनंतर १९५७ साली हा पक्ष औपचारिकरीत्या स्थापन झाला. परंतु डॉ. आंबेडकरांच्या विचारपूर्तीचे प्रभावी साधन म्हणून तो पक्ष कार्य करू शकला नाही. काँग्रेसला पर्यायी पक्ष म्हणून व्यापक सामाजिक पाया असलेला पक्ष अशी त्याची प्रतिमाच निर्माण होऊ शकली नाही. उलट १९५८ साली तो पक्ष फुटला. त्याचे विघटन सुरू झाले आणि डॉ. आंबेडकरांचे लोकशाही समाजवादी परिवर्तनाचा दलित चळवळ हा प्रभावी शक्तीस्त्रोत असावा हे स्वप्न दुभंगले.

## (७) पक्षपद्धती :

डॉ. आंबेडकरांच्या पक्षपद्धतीविषयक विचारात प्रथमतः बहुपक्ष-पद्धतीचा विचार दर्शित होत असला तरी अखेरीस त्यांना भारतीय लोकशाहीत द्विपक्ष-पद्धती दृढ व्हावी असे तीव्रतेने वाटू लागले होते. काँग्रेस पक्षाला पर्यायी पक्ष म्हणूनच सर्वसमावेशक आणि समाजवादी व लोकशाही विचारांचा रिपब्लिकन पक्ष असे दोन पक्ष असावेत असे ते प्रतिपादन करीत. त्यासाठी त्यांनी काही विरोधी पक्षांना रिपब्लिकन पक्षात यावे अशी विनंतीही केली होती. साम्यवादातील एकपक्षीय पद्धती मात्र त्यांना पूर्णतः अमान्य होती.

## (८) संघर्षाचे मार्ग :

दडपलेल्या अस्पृश्य समाजाला मानवी हक्क व प्रतिष्ठा व सत्तासामर्थ्य मिळवावयाचे असेल तर समाजाशी व सरकारशी संघर्ष अटळ आहे ही डॉ. आंबेडकरांची धारणा होती. त्यांनी हयातभर अशा प्रकारचा सामाजिक, राजकीय संघर्ष केला. वरिष्ठ जातींच्या जुलमी वर्चस्वामुळे सामाजिक-राजकीय निर्णयसत्तेत अस्पृश्यवर्ग सहभागी होऊ शकत नव्हता. ब्रिटिश साम्राज्यशाही सरकार अस्पृश्यांचे शत्रू असले तरी त्यांच्या काही उदारमतवादी राजकीय-सामाजिक सुधारणांनी दलितांच्या उन्नतीचा मार्ग सुकर होत होता. ब्रिटिशांच्या विरोधी लढ्यात वरिष्ठ जातींची राजकीय हक्कांची व

स्वातंत्र्याची मागणी त्यांच्या सामाजिक-राजकीय वर्चस्वाच्या हितसंबंधाला आवश्यक होती. त्यांच्याकडून अस्पृश्यांना सत्ताप्राप्तीची संधी मिळणार नाही म्हणून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य चळवळ ब्रिटिशविरोधी राष्ट्रीय लढ्यापासून दूर ठेवली. ते ब्रिटिशधार्जिणे आहेत, राष्ट्रवादी नाहीत असे आरोप त्यांच्यावर करण्यात आले. परंतु समाज-परिवर्तनाच्या एकूण संदर्भात ते आरोप निरर्थक आहेत याची ग्वाही म. गांधींनाही द्यावी लागली.

## (९) सत्याग्रहविषयक मते :

समाज व शासन यांच्याविरोधी संघर्ष लोकशाही, सनदशीर शांततामय मार्गांनी केला पाहिजे, हिंसाचारी किंवा घटनाबाह्य मार्गाने नव्हे, असा डॉ. आंबेडकरांचा कटाक्ष होता. लो. टिळकांच्या राजकीय संघर्षाच्या प्रतिकार व बहिष्कार या मार्गांचा स्वीकार डॉ. आंबेडकरांनी सामाजिक संघर्षासाठी केला असला, तरी त्यामागील त्यांच्या विचारावर तत्संबंधीच्या गांधींच्या विचारांचा प्रभाव अधिक ठळकपणे दिसून येतो. याचा अर्थ असा नव्हे की, या संघर्षमार्ग-संदर्भातील गांधींचा दृष्टिकोण त्यांना पूर्णतः मान्य होता. प्रतिकार-मार्गाला गांधींनी सत्याग्रह असे नाव दिले. डॉ. आंबेडकरांनी गांधींचा सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला, परंतु गांधींच्या सत्याग्रहाच्या संपूर्ण सिद्धान्ताशी ते सहमत नव्हते. संघर्षाची उद्दिष्टे संघर्षाला नैतिक पाया देतात. सत्यासाठीचा संघर्ष हा नैतिकच असतो. सत्याग्रहाचे यश सत्याग्रहीचे सत्य वा साध्याचे आकलन, तत्संबंधी निर्धार, निष्ठा व इच्छाशक्ती यावर अवलंबून असते. आपला संघर्ष हा सत्याधिष्ठित आहे या नैतिक निष्ठेतूनच प्रतिकारशक्ती निर्माण होते. डॉ. आंबेडकरांच्या मते सत्याचे मूलस्थान लोकसंग्रह किंवा लोककल्याण हे आहे. तेव्हा अस्पृश्यांनी मानवी हक्क नाकारणाऱ्याविरुद्ध संघर्ष करणे यात काही चूक वा अनैतिक नाही. अस्पृश्यांची चळवळ अस्पृश्यांच्या मानवी हक्कासाठी जशी आहे, तशीच स्पृश्यांना नैतिक अधःपतनातून मुक्त करण्यासाठीही आहे.

म. गांधींप्रमाणेच डॉ. आंबेडकरांनी सत्याग्रहाचा नैतिक आशय स्पष्ट केला व मान्यही केला. परंतु गांधींची साध्य-साधनविवेक वा हिंसा-अहिंसा यासंबंधीची ताठर-तात्त्विक भूमिका त्यांना मान्य नव्हती. ते म्हणत की, सत्याग्रहाची अंतिम नैतिकता साधनावरून ठरत नाही, तर त्या साध्यावरून ठरते. तेव्हा साध्य जर नैतिकदृष्ट्या समर्थनीय असेल, तर साधनांच्या बाबतीत लवचिक भूमिका योग्य ठरेल. उलट असत्य व अन्याय यावर अधिष्ठित असलेल्या साध्यासाठीचा सत्याग्रह अगदी उदात्त साधनांनी केला, तरी तो सत्याग्रह न ठरता दुराग्रह ठरतो. डॉ. आंबेडकरांनी सत्याग्रहाच्या मार्गाचा स्वीकार केला, तरी तत्त्वतः व पूर्णतः म. गांधींचा विचार त्यांना मान्य नव्हता. संघर्षाच्या मार्गासंबंधात शठं प्रतिशाठ्यम् ह्या लो. टिळकांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर अधिक होता. म. गांधींचा विचार बुद्धाला अधिक जवळचा आहे. साध्य कोणत्याही साधनाचे समर्थन करते किंवा प्रत्येक प्रसंग व प्रत्येक प्रश्न हिंसेनेच सोडविला

पाहिजे असे डॉ. आंबेडकरांना म्हणावयाचे नाही, तर साधनाचा हिंसा-अहिंसेचा स्वीकार परिस्थितीजन्य संदर्भात केला पाहिजे. अटळ किंवा अपरिहार्य असेल, तरच हिंसेचा वा जहाल साधनाचा स्वीकार करावा. सर्वसाधारण परिस्थितीत अशा साधनांचा सातत्याने स्वीकार करू नये असे त्यांचे मत होते.

अन्यायी व अमानुष सामाजिक रुढीविरुद्ध विचार-जागृती करून, लोकांचे संघटित सामर्थ्य सनदशीर मार्गाने, तडजोडीने, स्वपक्षाची फारशी हानी न होता, प्रतिपक्षाशी संघर्ष करावा. परंतु या मार्गाला प्रतिपक्ष अनुकूल प्रतिसाद देतच नसेल, तर आपले नैतिक सामर्थ्य पणाला लावून सत्याग्रहाच्या शांततापूर्ण मार्गानेही प्रतिकार केला पाहिजे. या मार्गाने प्रतिपक्षाच्या न्यायबुद्धीला आवाहन करता येते व स्वपक्षाची संघटित प्रतिकारशक्ती व नीतिधैर्य यांची पातळी उंचावते. म. गांधींनी म्हटले की, सत्याग्रह हा परिवर्तनाचा, हृदयपरिवर्तनाचा मार्ग आहे. डॉ. आंबेडकरांना हा विचार मान्य होता. 'सत्याग्रहाखेरीज आमच्याकडे परिवर्तनाचा दुसरा मार्ग नाही. अस्पृश्यता निवारण म्हणजे स्पृश्य हिंदूंचे मतपरिवर्तन' असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

सत्याग्रहात अनैतिकता, अविवेक व व्यक्तिगत स्वार्थ व प्रतिष्ठा यांना जागा नाही असे म. गांधींच्याप्रमाणेच ते मानत. सत्याग्रहात एखादे वेळी भावनेच्या अतिरेकाने वा अनपेक्षितपणे सबंध चळवळीस प्रचंड विरोध व धोका निर्माण होण्याची परिस्थिती निर्माण झाली, तर तो सत्याग्रह सुजाण नेतृत्वाने मागे घेण्यास हरकत नाही असे दोघांचेही मत होते. चौरीचोरा प्रकरणात व महाडच्या सत्याग्रहाला मनाई आल्यामुळे म. गांधींनी सत्याग्रहाची चळवळ मागे घेतली, तर डॉ. आंबेडकरांनी तो सत्त्याग्रह पुढे ढकलला.

## (१०) सत्त्याग्रह मार्ग-प्रतिकार व बहिष्कार :

अस्पृश्यवर्गावर होणाऱ्या अन्यायाचे निर्मूलन करण्यासाठी त्याच वर्गाने सत्याग्रहाच्या मार्गाने संघर्ष सुरू केला पाहिजे असे डॉ. आंबेडकर निक्षून सांगत. त्यांच्या मते सत्याग्रह प्रतिकार व बहिष्कार या दोन मार्गाने करता येतो. (१) मानवी हक्कांच्या प्राप्तीसाठी सवर्णांच्या सर्व प्रकारच्या अन्यायाला प्रतिकार करणे आवश्यक आहे. अस्पृश्यांनी आतापर्यंत असा प्रतिकार न केल्यामुळेच त्यांना गुलामीचे जिणे जगावे लागले. तेव्हा अन्यायाला, जुलुमाला, अविचाराला आणि अंधश्रद्धांना व्यक्तिगत व सामूहिक वाणीने व करणीने प्रतिकार केला पाहिजे. भारतात निःशस्त्र प्रतिकार हेच त्याचे स्वरूप राहील. (२) याचबरोबर स्पृश्य समाजासाठी जी पारंपरिक कामे व व्यवसाय अस्पृश्यवर्गाला करावे लागतात, त्यावर बहिष्कार घालून ते नाकारणे, सवर्णांच्या आर्थिक अवलंबनातून मुक्त होण्यासाठी नवे व्यवसाय स्वीकारणे, पारंपरिक वतने नाकारणे, त्याऐवजी पगारी शासकीय नोकरीतील नियुक्तीचा पाठपुरावा करणे, सरकारने आपल्या मोकळ्या, पडिक व वन-जमिनी देणे, तेथे स्वतंत्र वसाहती स्थापन

करणे अशा प्रकारच्या दबावाच्या राजकारणाने, अनुनयायने नव्हे, अस्पृश्यवर्गाला आपला प्रभाव व प्रतिष्ठा वाढविता येईल असे डॉ. आंबेडकरांचे प्रतिपादन होते.

## (११) संसदीय व संघर्षात्मक सहभाग :

म. गांधींनी सत्याग्रहाचा मार्ग सामाजिक, राजकीय संघर्षात स्वीकारला. वायकोमचा सत्याग्रह, मंदिर प्रवेश सत्याग्रह ही त्याची ठळक उदाहरणे होत. असहकार, कायदेभंग, बहिष्कार, उपोषण आदि मार्गांनी राजकीय संघर्षाचे, सत्याग्रहाचे नवे साधनच त्यांनी निर्माण केले. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक संघर्षात सत्याग्रहांचा प्रत्यक्ष उपयोग केला. ब्रिटिश सरकारच्या विरोधातील राजकीय संघर्षात त्यांनी अस्पृश्य समाजाच्या जागृत व संघटित राजकीय दबावाने सरकारकडून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ व स्वतंत्र वसाहती याखेरीज अन्य मागण्या मान्य करवून घेतल्या. स्वातंत्र्यानंतरच्या बदलत्या राजकीय परिस्थितीत दलित चळवळीने जातीय, धर्माच्या समतोलाचे राजकारण न करता, समविचारी व्यक्तींशी संसदीय व संघर्षात्मक मार्गाने सहभागाचे राजकारण करावे असा विचार मांडला. त्यानुसार स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र लढा, जमिनींच्या प्रश्नावर आंदोलन अशा राजकीय-आर्थिक लढ्यात रिपब्लिकन पक्ष सामील झाला होता. डॉ. आंबेडकरांच्या राजकीय संघर्षाच्या मार्गांचा अवलंब तो पक्ष करीत होता. त्या वेळी परिवर्तनाच्या शक्तींचा राजकीय प्रभाव वाढत होता. दलित व दलितेतर अन्य पुरोगामी राजकीय स्थितीत या वास्तवाचे भाव ठेवणे आज अत्यंत आवश्यक आहे.

डॉ. आंबेडकरांच्या राजकीय संघर्षाच्या मार्गाच्या स्वीकारात सामाजिक आमूलाग्र परिवर्तनाचा व राजकीय सत्ता-सामर्थ्यप्राप्तीचा विचार व्यक्त होतो. यासाठी सत्याग्रह व संघर्ष आणि सरकारवर दबाव आणून सत्तेमध्ये वाटा प्राप्त करून घेणे या दोन्ही मार्गांचा पुरस्कार त्यांनी केला. स्वातंत्र्यानंतरही हे दोन्ही मार्ग अस्पृश्य व दलित समाजाच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरतील असे त्यांना वाटत होते. डॉ. आंबेडकरांना लोकशाही समाजक्रांती अपेक्षित होती. भारतीय स्वातंत्र्याने लोकशाही क्रांतीचक्र पूर्ण फिरले नाही. ही क्रांती पूर्ण करण्याचे, हे लोकशाही क्रांतीचक्र पूर्ण फिरविण्याचे काम दलितच करतील असा त्यांचा विश्वास होता.

□ □ □

# ७.

# डॉ. आंबेडकर आणि म. गांधी

## म. गांधी आणि डॉ. आंबेडकर :

### (१) व्यापक व गतिमान क्रांती-प्रवाह :

भारतीय समाजक्रांतीच्या विकासप्रवाहात १९२० ते १९४८ पर्यंतचा कालखंड म. गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाच्या व विचारांच्या प्रभावाचा महत्त्वपूर्ण असा कालखंड आहे. या दोन्हीही लोकोत्तर नेत्यांनी सामाजिक चळवळी व राजकीय आंदोलने यांना चालना देऊन सामजपरिवर्तनात नवी परिमाणे व सामर्थ्य दिले. सामाजिक-राजकीय आंदोलनात अंतर्भूत असलेल्या काही पायाभूत प्रश्नांच्या संदर्भात म. गांधी व डॉ. आंबेडकर यांचे तात्त्विक व व्यावहारिक स्वरूपाचे आकलन व दृष्टिकोण भिन्न असल्याने दोघांच्याही भूमिका व राजकारण परस्परविरोधी व संघर्षात्मक राहिले. परंतु आज तीन तपांच्या दीर्घ काळानंतर त्यांच्या राजकारणाकडे पाहता, त्या विरोधामुळे समाजक्रांतीचा प्रवाह अधिक विशुद्ध व वास्तव झाला असे विधान अनैतिहासिक वा अवास्तव ठरणार नाही. या विरोधामुळे वास्तवाचे भान समाजक्रांतीच्या या दोन्हीही सेनापतींना अधिक उत्कटतेने झाले. दोघांच्या विरोधी भूमिका भारतीय समाजपरिवर्तनाला मारक न ठरता पूरक ठरल्या. कारण एकमेकांच्या नेतृत्वातील व विचारातील निष्ठा, निर्धार व नैतिकता यांचा प्रभाव एकमेकांवर पडला आणि क्रांती-प्रवाह गतिमान झाला. विरोधातून स्पष्ट झालेल्या वास्तव परिस्थितीच्या संदर्भात आपापल्या भूमिकांच्या व्यापक पुनर्विचार करण्याची जाणीव व क्षमता या नेतृत्वाच्या ठिकाणी असल्याने तत्कालीन विरोधातूनही त्यांनी विवेकाने मार्ग काढला. आजही समाज-परिवर्तनाची क्रिया चालूच आहे. तत्कालीन विरोधाचे ओझे घेऊन बदलत्या वास्तवाचे दर्शन घेता येणार नाही याची जाणीव त्यांच्या वारसदार राजकीय शक्तींनी व अनुयायांनी ठेवली पाहिजे. कारण गांधी-आंबेडकरांच्या मृत्यूनंतर स्वातंत्र्याच्या ४०-४५ वर्षात परिस्थितीत बराच बदल झाला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय समाजाचे धार्मिक, जातीय व वर्गीय प्रश्न स्वातंत्र्यानंतर सुटले आहेत असे मुळीच नाही. उलट काही प्रश्न तीव्र व उग्र बनून राष्ट्र-उभारणीत विघटनाचे धोके निर्माण झाले आहेत. धर्मवादी व जातीय शक्तींच्या विरोधी गांधी-आंबेडकरांनी सतत संघर्ष केला, त्या शक्तींचा जोर वाढून काही राज्यात त्या सत्तास्थानी आल्या आहेत. तसेच

मुस्लिम-शीख-हिंदू मूलतत्त्ववादाचे पुनरुज्जीवन होत आहे.

आजच्या राष्ट्रीय जीवनात पूर्वीच्या अशा काही प्रश्नांचे निराकरण झाले नसले, तरी स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेने व विकास-प्रक्रियेने त्या समस्यांचे संदर्भ व स्वरूप बदलले आहे. सामाजिक, आर्थिक शोषणाच्या हितसंबंधी शोषकवर्गाचे व शोषितवर्गाचे स्वरूपही बदलले आहे. शासक व शासित यामधील संबंधाची लोकशाहीने पुनर्रचना केली आहे. या बदलत्या शक्ती व समस्या यांच्या संदर्भात गांधी-आंबेडकरांच्या विचारातील व कार्यातील विकसनशील सामाजिक आशयाचा नव्या राष्ट्रबांधणीच्या दृष्टीतून, पूर्वग्रहदूषित व स्वच्छ मनाने अभ्यास करणे आवश्यक व उपयुक्त आहे.

**(२) जात-जमातनिष्ठ प्रतिनिधित्व :**

डॉ. आंबेडकर भारताच्या सार्वजनिक जीवनात येण्यापूर्वीच गांधींचे नेतृत्व देशामध्ये व काँग्रेसमध्ये दृढ झाले होते. काँग्रेस आधुनिक भारतीय राष्ट्रवादाचे प्रतिनिधित्व १८८५पासूनच करीत होती. सर्व धर्माचे, जातीचे व वर्गाचे लोक काँग्रेसमध्ये राजकीयदृष्ट्या संघटित होत होते. १८८८मध्ये लॉर्ड डफरिन यांनी मुसलमानांना प्रस्थापित कायदेमंडळात स्वतंत्र प्रतिनिधित्व असावे असे सुचविले होते. १९०६पासून मुस्लिम लीगच्या रूपात मुस्लिम धर्मवादी प्रवृत्तींनी भारताच्या राजकारणात प्रवेश केला. तसेच हिंदू महासभेच्या रूपाने हिंदू धर्मवादी प्रवृत्तीही राजकीयदृष्ट्या संघटित होऊ लागल्या. १९०९च्या मार्ले-मिंटो घटनात्मक सुधारणांनी मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करून कायदेमंडळात जात-जमातनिष्ठ प्रतिनिधित्वाचा स्वीकार केला आणि धर्मनिष्ठ व जमातवादी राजकारणाला प्रारंभ झाला. १९९०पासून स्वातंत्र्यापर्यंतचे सर्व राजकारण या जातीय प्रतिनिधित्वाभोवती फिरत होते. भारतीय राजकारणाला हे जमातवादी स्वरूप देण्यात ब्रिटिश साम्राज्यशाही सत्तेचा जसा हितसंबंध होता, तसाच भारतीय समाजातील सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वरिष्ठ जाती-वर्गांचाही हितसंबंध होता. ब्रिटिश सत्तेने विरोध नको म्हणून भारतातील विविध धर्म व धार्मिक रूढी व प्रथा यात कसलाच हस्तक्षेप करावयाचा नाही, तटस्थ रहावयाचे असे ठरविले. परंतु अन्य क्षेत्रात विशेषतः राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात काही प्रमाणात सुधारणा केल्या. यामुळे त्या त्या धर्मातील वरिष्ठ जातींचे व धनिक वर्गाचे वर्चस्व वाढले. त्यांना सत्तारचेनत सहभागी होता आले. विविध धर्मांची समाजव्यवस्था तशीच कायम टिकविणे हा ब्रिटिश सत्तेचा व भारतातील सत्ताधारी वर्गाचा हेतू ब्रिटिशांना हिंदू समाजातील अस्पृश्यांबद्दल प्रथम फारसे प्रेम नव्हते. परंतु ब्राह्मणेतर अस्पृश्यांच्या चळवळी जशा जोर धरू लागल्या, तशा हिंदूसमाजातही फोडा-झोडा या राजनीतीने अस्पृश्यांची स्वतंत्र वर्ग म्हणून जनगणनेत विसाव्या शतकाच्या आरंभी नोंद होऊ लागली.

## (३) अस्पृश्यवर्गाचे राजकीयकरण :

१९२३-२४ सुमारास शिक्षण संपवून डॉ. आंबेडकर ज्या वेळी भारताच्या सार्वजनिक जीवनात आले, त्या वेळी हिंदू समाजात अस्पृश्यतेचे जे अन्याय्य अमानुष व पारंपरिक सामाजिक वास्तव होते, तिचे समूळ निर्मूलन करण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले. आपल्या पूर्वास्पृश्य समाजात मानवी हक्क आणि समान प्रतिष्ठा संपादन करण्यासाठी जागृत, संघटित व कार्यप्रेरित करण्याची चळवळ सुरू केली. आपल्या जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्यांनी अस्पृश्य व दलित चळवळीचे नेतृत्व केले. त्यांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्य समाजाच्या राजकीयीकरणातून एक नवी राजकीय व सामाजिक शक्ती म्हणून तो समाज पुढे येऊ लागला. १९२७च्या महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, १९३०चा नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हे धर्मसंगर व सामाजिक संघर्षच होते. तत्पूर्वी १९१९मध्ये साऊथबरो आयोगापुढे त्यांनी जी साक्ष दिली, ती अस्पृश्यांच्या संदर्भातील पहिले राजकीय निवेदन होते. अस्पृश्यता हा सामाजिक एकत्रीकरणातील अनुल्लंघनीय असा अडथळा आहे. तेव्हा मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी यांच्याप्रमाणेच हिंदूसमाजाचे स्पृश्य व अस्पृश्य असे विभागीकरण करावे असे मत त्यांनी मांडले. अस्पृश्य समाजाला स्वतंत्र मतदार संघ असावा तरच सत्ता-रचेनत त्याला स्थान मिळू शकेल. अशी मागणी डॉ. आंबेडकरांनी सायमन कमिशन, गोलमेज परिषद यामध्ये आग्रहाने केली. सायमन कमिशनपुढे दिलेल्या निवेदनात त्यांनी असे म्हटले की स्वतंत्र मतदारसंघ फुटीर शक्ती वाढवतील म्हणून प्रौढ मतदानाच्या अधिकाराची मागणी, त्यांनी प्रथम केली आणि त्याला मान्यता नसेल तर विभक्त मतदार संघ असावेत.

## (४) अस्पृश्यता स्वतंत्र मतदारसंघ :

म. गांधीच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यात ते सहभागी झाले नाहीत. काँग्रेस जोपर्यंत अस्पृश्यांचा प्रश्न अग्रक्रमाने हाती घेत नाही, तोपर्यंत त्यांनी त्यात सामील होऊ नये, असे ते म्हणत. गोलमेज परिषदेत जातीय प्रतिनिधित्वाच्या संदर्भात बोलणी सुरू झाली, तेव्हा गांधी किंवा काँग्रेस अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व करीत नाही अशी भूमिका त्यांनी घेतली. ब्रिटिश सरकारने जातीय निवाडा जाहीर करून अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देऊ केला. याविरुद्ध म. गांधींनी अस्पृश्य हे हिंदू समाजाचाच भाग आहे, त्यांना विभक्त मतदारसंघ दिल्यास हिंदू समाजाचे विघटन होईल. काँग्रेस ही स्पृश्य, अस्पृश्य हिंदूंचे, तसेच मुस्लिम-ख्रिश्चन, शीख, पारशी आदि समाजाचे, म्हणजेच सर्व भारतीयांचे प्रतिनिधित्व करते अशी भूमिका गांधींनी व काँग्रेसने घेतली व आंबेडकरांच्या विभक्त, मतदारसंघाच्या मागणीला विरोध केला. काँग्रेस ही वरिष्ठ जातींची व वर्गांची राजकीय आघाडी आहे, तिच्याकडून अस्पृश्यांना न्याय मिळणार नाही, शिवाय काँग्रेसने सामाजिक प्रश्नांना कधीच फारसे महत्त्व दिले नाही. मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ मान्य करणारी काँग्रेस, अस्पृश्यांना मात्र ते मान्य

करीत नाही. काँग्रेस सामाजिकदृष्ट्या प्रतिगामी (टोरीज्) आहे अशी टीका डॉ. आंबेडकरांनी या संदर्भात केली.

म. गांधींनी अस्पृश्यता-निर्मूलनासारख्या अन्य सामाजिक प्रश्नांना हिंदूधर्म सुधारणेचा आवश्यक भाग म्हणून कार्य करावयास प्रथम सुरुवात केली होती. काँग्रेसच्या कार्यक्रमातही त्याचा समावेश करून सामाजिक की राजकीय हा वाद बोथट केला होता. अस्पृश्यता-निर्मूलनासंबंधी गांधींना प्रामाणिक आस्था असली तरी, त्यांचे त्यासंबंधींचे विचार व मार्ग डॉ. आंबेडकरांच्या विचार व मार्गाशी जुळत नव्हते. या पायाभूत मतभेदांमुळे गांधींना त्यांचा विरोध होता. तसेच काँग्रेसमधील वरिष्ठ जाती-वर्गांना राजकीय स्वातंत्र्यानंतरची सत्ता आवश्यक होती. त्यामुळे ब्रिटिशविरोधी लढ्यात अडथळे येऊ नयेत म्हणून डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेल्या महाड-नाशिक येथील सामाजिक संघर्षातून काँग्रेस दूरच राहिली. यामुळे स्पृश्य-सवर्ण आपणाला आपल्या मुक्ती-संग्रामात साथ देणार नाहीत. म्हणून स्वतंत्र राजकीय अस्मितेसाठी विभक्त मतदारसंघाची मागणी त्यांनी केली.

## (५) 'पुणे-करार' : नव्या शक्यतेचा उदय :

जातीय निवाड्याचा संदर्भात गांधी-आंबेडकर यांच्यातील वैचारिक व राजकीय विरोधी भूमिकांमुळे भारतीय राजकारणात एक गंभीर पेचप्रसंग निर्माण झाला. हा पेचप्रसंग म्हणजे या दोघांच्याही नेतृत्वाची अग्निपरीक्षा होती. भारताच्या राष्ट्रीय भवितव्याशी, सामाजिक एकात्मतेशी हा पेचप्रसंग निगडित होता. परंतु या दोघांनीही आपापल्या भूमिकेतील अभिनिवेशावर, तीव्र विरोधावर विवेकशीलतेने, राष्ट्र व समाजहितबुद्धीने मात केली. राष्ट्रीय ऐक्याचा व सामाजिक एकात्मतेला पूरक ठरणारी संयुक्त मतदारसंघ व राखीव जागा यावर तडजोड झाली. यामुळे गांधींचे प्राण वाचले असे नाही, तर हिंदू समाजाचे संभाव्य राजकीय विघटनही थांबले. गांधी-आंबेडकरांच्यामधील 'पुणे करारा'ने भारतीय राजकारणातील व समाजकारणातील स्पृश्य व अस्पृश्य समाज असे दोन्ही प्रवाह परस्पर पूरक होण्याच्या शक्यता वाढल्या. कारण या पेचप्रसंगाच्या अग्निदिव्यातून बाहेर पडल्यावर या दोघा नेत्यांच्या विचारात व दृष्टिकोणात फरक पडलेला स्पष्टपणे दिसून येतो.

पुणे करारानंतर गांधींनी अस्पृश्यतानिवारणाची मोहिम तीव्र केली. या करारानंतरच्या हिंदू परिषदेत मांडलेल्या गांधीकृत ठरावात गांधींच्या बदलत्या विचाराची चाहूल लागते. अस्पृश्यताविरोधी सप्ताह देशभर पाळण्यात येऊन सहभोजन, मंदिरप्रवेश, विहिरी, शाळा, रस्ते, सार्वजनिक संस्था वगैरे ठिकाणी मुक्तप्रवेश, 'पुणे करारा'च्या सामाजिक व राजकीय आशय-जागृतीसाठी सर्वत्र जाहीर सभांचे आयोजन अशा विविध उपायांना चालना देण्यात आली. भारतीय अस्पृश्यता निवारण संघ स्थापन केला. (पुढे त्याचे नामकरण हरिजन सेवा संघ असे केले. त्याचे अध्यक्ष श्री. ठक्करबाप्पा होते.) गांधींनी या चळवळीची तीव्रता आपल्या १९३३च्या उपोषणाने वाढविली. उपोषणानंतर त्यांनी देशभर दौरा काढून, विशेषतः सवर्ण समाजाच्या मनोवृत्तीत परिवर्तन, मतांतर घडवून आणण्याचा प्रयत्न केला व अस्पृश्यता निर्मूलनाचे राष्ट्रीय-

सामाजिक आंदोलन उभे केले.

**(६) परस्पर नेतृत्वाचा प्रभाव :**

हरिजन सेवा संघमार्फत अस्पृश्यता-निवारणाचे एक अभियान देशात सर्वत्र सुरू झाले. गांधींनी हे कार्य काँग्रेसच्या अधिकृत कार्यक्रमाचा भाग केल्यामुळे हे अभियान व्यापक, राष्ट्रीय पातळीवर नेले गेले. अस्पृश्यता-निवारण म्हणजे केवळ अस्पृश्यांनी, अस्पृश्यांसाठी चालविलेले आंदोलन कार्य नाही, तर ते स्पृश्य व सवर्ण समाजाचेही कार्य आणि कर्तव्य आहे. अस्पृश्यतेचे अधिष्ठान धर्ममान्य चातुर्वर्ण्य व्यवस्थेबरोबरच वरिष्ठ वर्ण-जातीच्या श्रेष्ठत्वाच्या व वर्चस्वाच्या, आणि कनिष्ठ वर्णजातीच्या न्यूनत्वाच्या जाणीवेत व मानसिकेत आहे. डॉ. आंबेडकरांनी आपल्या चळवळीतील अस्पृश्यांनी हा न्यूनगंड नाहीसा करून त्यांना हक्क म्हणून मानवी समानतेच्या, स्वाभिमानाला व सन्मानालाही सन्मुख करण्याचे ऐतिहासिक कार्य केले. गांधींनी सवर्णांना परंपरागत श्रेष्ठत्वाच्या मानसिकतेचा, पापक्षालनाच्या व आत्मशुद्धीच्या कर्तव्यभावनेने त्याग करण्यास प्रवृत्त केले. हिंदूसमाजाला अस्पृश्यतेच्या ग्रहणातून मुक्त करण्याच्या उद्दिष्टपूर्तीला दोन्ही चळवळींचे मार्ग भिन्न असले तरी पूरकच होते.

पुणे करारानंतर अस्पृश्यता-निवारण चळवळ हा हिंदूधर्मसुधारणेची केवळ धार्मिक चळवळ नाही याची जाणीव गांधींना झाली. आंबेडकरांच्या व्यापक मानवतावादी व बुद्धिवादी विचारांचा तो प्रभाव होता असे म्हणणे अतिशयोक्तीचे होईल असे वाटत नाही. अस्पृश्यता निवारण चळवळ ही मानवी समानतेच्या व राष्ट्रीय एकत्वाच्या चळवळीचा भाग असून भारताच्या भवितव्याशी ती अपरिहार्यपणे निगडित आहे असे गांधींना तीव्रपणे जाणवले. याला आंबेडकरांच्या संघर्षवादी चळवळीचा दबाव व प्रभाव कारणीभूत आहे यात वाद नाही. जातीय निवाड्याच्या संदर्भात गांधींशी आंबेडकरांची जी प्रत्यक्ष चर्चा झाली, त्या चर्चेत आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाच्या - 'गांधीजी, मला मायभूमी नाही' अशासारख्या ज्या वास्तव व्यथा व तत्संबंधीच्या वैचारिक धारणा आणि सामाजिक-राजकीय कार्यात्मक भूमिका अतिशय निर्भीडपणे स्पष्ट केल्या, त्यावरून गांधींना अस्पृश्य समाजाच्या सामाजिक-राजकीय वास्तवतेचा विचार धार्मिकतेचे धुके थोडेफार बाजूला सारून करावा लागला. गांधी धार्मिक होते. स्वतःला सनातनी हिंदू म्हणवून घेत होते. तरी पण सांप्रदायिक हिंदूधर्माला त्यांचा विरोध होता. पारंपरिक कर्मकांडाला त्यांची मान्यता नव्हती. हिंदूधर्माबद्दल व दैवतांबद्दल त्यांना अतीव आदर होता, पण त्यांनी वेद वा ग्रंथ यांचे प्रामाण्य मानले नाही.

गांधींनी राजकारणाकडे धर्मसाधनेचा भाग म्हणून पाहिले. परंतु त्यांनी आपल्या वेगळ्या धर्मसाधनेला जुन्या पारंपरिक शब्दात वा परिचित परिभाषेत बद्ध व व्यक्त केल्याने त्यातील विकसनशील आशयाकडे व इहवादी अंतरंगाकडे दुर्लक्ष झाले. आणि त्यांच्याविषयी, त्यांचे विचार व कार्य याविषयी गैरसमज नव्हे, तर विरोधी भावना निर्माण झाल्या. १९३५नंतर गांधींच्या विचारात खूपच परिवर्तन झाले. वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था यांचे त्यांनी प्रथम समर्थन केले होते. आरंभी त्यांचा आंतरजातीय,

वर्णीयधर्मीय विवाहास, सहभोजनाला मान्यता नव्हती. परंतु पुणे करारापासून व आंबेडकरांच्या १९३५ सालच्या धर्मांतराच्या घोषणेने गांधी अंतर्मुख झाले व त्यांची मते बदलली. हिंदू समाजातील जातीसंस्था, अस्पृश्यता हा वर्णव्यवस्थेचाच परिणाम आहे असे मानून या संस्थांचा व रोटी-बेटी व्यवहारावरील निर्बंधांचा त्यांनी निषेध केला. यामुळेच समाजाचा एकूण विकासच खुंटलेला आहे असे ते मानू लागले. अस्पृश्यता-निवारण अभियानाच्या संदर्भात गांधी आपलीच भाषा बोलत आहेत, 'ते आपला माणूस आहे' असे डॉ. आंबेडकर एकदा म्हणालेही.

### (७) काँग्रेसने चूक सुधारली :

परंतु या जवळकीच्या भावनेचा योग्य फायदा काँग्रेसने संधी प्राप्त झाली असतानाही घेतला नाही. १९३७ साली काँग्रेसेने प्रांतिक मंत्रिमंडळ व्यापक बनवून त्यात डॉ. आंबेडकरांच्या राजकीय प्रवाहाला प्रतिनिधित्व देऊन समाविष्ट करून घेतले असते, तर हे दोन्ही राजकीय प्रवाह अधिक जवळ येण्याची प्रक्रिया दृढ झाली असती. तसेच त्या वेळी व स्वातंत्र्यानंतरही बराच काळ डाव्या राजकीय पक्षांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांना फारसे महत्त्व दिले नाही. त्यामुळे अस्पृश्य चळवळ राजकीयदृष्ट्या अलगत पडली.

स्वातंत्र्यानंतर भारताची राज्यघटना अस्पृश्य वा दलित वर्गाच्या सर्वांगीण उन्नतीचे साधन झाले पाहिजे, यासाठी त्यांच्या आशा-आकांक्षा घटनेमध्ये प्रतिबिंबित होण्यासाठी डॉ. आंबेडकरांना घटना मसुदा-समितीचे अध्यक्षपद देण्याचा व पहिल्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश करण्याचा सल्ला गांधींनी दिला होता आणि आंबेडकरांनी त्यांना अनुकूल प्रतिसादही दिला. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर राजकारणाचे स्वरूप बदलू लागले.

### (८) आजची गरज :

आंबेडकर चळवळीचे सामर्थ्य प्रामुख्याने आंबेडकरांच्या वस्तुनिष्ठ, विवेकवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि शास्त्रीय दृष्टिकोणातून, त्यांच्या दबावाच्या राजकारणातून व संघर्षवादी समाजकारणातून आणि अव्यभिचारी नेतृत्वातून व समाजनिष्ठेतून प्राप्त झाले असले, तरी त्याला त्यांच्या पूर्वीच्या म. फुले, क. शिंदे, छ. शाहुमहाराज, यासारख्या पूर्वसुरींच्या कार्यातून व म. गांधींच्या अंत्योदयाच्या सर्वांगीण आंदोलनातून निर्माण झालेल्या पूरकशक्तींचा आधार व पार्श्वभूमी आहे हे विसरून चालणार नाही. गांधी-आंबेडकर यांच्या परस्पर कार्यातील पूरकता व विधायकता यावर जोर देऊन त्यांचे नेतृत्व मानण्यावर अनुयायांनी समंजसपणे अपुऱ्या राहिलेल्या त्यांच्या समाजक्रांतीचे राजकारण केले पाहिजे. आताच्या वर्तमानाची ती गरज आहे. गांधी-आंबेडकर कालखंडातील परिस्थितीजन्य विरोध व विचारभेद विसरून आपापसात केवळ प्रतिवादच न करता, आमूलाग्र समाजक्रांतीचा प्रवाह पुढे नेला पाहिजे. अन्यथा क्रांतीविरोधी धर्मांध, जातीयवाद शक्ती व विषमता-शोषणाधीष्ठित परंपरावादी प्रवृत्ती यांना रान मोकळे राहील.

□ □ □

# ८.

# डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना

## डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना :

### ऐतिहासिक औचित्य :

१५ ऑगस्ट १९४७ साली ब्रिटिश साम्राज्यशाहीचा जोखडातून भारत मुक्त झाला आणि घटना-समितीच्या घटना-निर्मितीच्या प्रक्रियेला चालना मिळाली. स्वातंत्र्य जाहीर होण्यापूर्वीच मर्यादित मताधिकाराने निर्वाचित मध्यवर्ती कायदेमंडळाला घटना-समितीचा दर्जा देण्यात आला होता, याचा उल्लेख एवढ्याचसाठी की भारताची राज्यघटना तयार करणारी घटना समिती ही, प्रौढ मताधिकाराने संपूर्ण जनतेने निवडून दिलेली नव्हती. सर्व भारतीय जनतेची ती प्रतिनिधित्व करीत नव्हती. ही एक मोठी उणीव घटना समितीच्या निर्मितीत होती हे लक्षात यावे. तरी पण या आंशिक प्रतिनिधित्वाच्या विचारात स्वातंत्र्य-लढ्याने जागृत व प्रेरित केलेल्या भावी राष्ट्रबांधणीच्या उसळत्या ऊर्मींचे, आकांक्षांचे व आधुनिक मूल्यांचे पूर्णतः नाही, तरी थोडेफार आश्वासक प्रतिबिंब पडलेले होते. त्या वेळी प्रमुख राष्ट्रीय प्रवाहाचे नेतृत्व काँग्रेस पक्षाकडे होते. सरदार पटेलांच्या सूचनेनुसार व म. गांधींच्या सल्ल्यानुसार काँग्रेस नेतृत्वाने घटना मसुदा समितीचे अध्यक्षपद डॉ. आंबेडकरांना देण्यात एक ऐतिहासिक औचित्य दाखविले.

भारताच्या राजकीय स्वातंत्र्याने ब्रिटिश साम्राज्यशाही सत्तेचाच अंत झाला असे नाही तर, त्यामुळे सर्व प्रकारच्या विषमतेवर अधिष्ठित असलेल्या पुरातन सरंजामी समाजव्यवस्थेतील उच्चवर्णीय, वर्गीय वर्चस्वाचा अंत करण्याच्या संधीची व सामर्थ्याची दालने खुली होण्याच्या शक्यता व क्षमता वाढल्या. मानवी हक्कांचे, मानवी प्रतिष्ठेचे, जनतेच्या सर्वभौम सत्तेचे आणि समता-स्वातंत्र्य-बंधुता व न्याय यावर आधारित असे नवे राष्ट्र उभारण्यासाठी सर्व जीवन-व्यवहारांचे नियमन व दिग्दर्शन करणारी नवी स्मृती, नवी संहिता निर्माण करणे आवश्यक होते. डॉ. आंबेडकरांच्याखेरीज त्यावेळी दुसरी जाणती व अधिकारी व्यक्ती असूच शकत नव्हती. ते घटनातज्ज्ञ, सामाजिक शास्त्रांचे व्यासंगी अभ्यासक तर होतेच, पण त्यापेक्षाही अस्पृश्य समाजासह सर्व बहुसंख्य दलितांच्या दुःखांची, समस्यांची खोल जाणीव व अनुभूती असणारे असे त्यांचे नेते व प्रवक्ते होते. आमूलाग्र समाज-परिवर्तनाच्या या जाणीवा राज्यघटनेत

प्रतिबिंबित व प्रतिध्वनित करण्याचे आवश्यक कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. घटना मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून अन्य नेत्यांच्या व तज्ज्ञांच्या सहाय्याने कालबाह्य झालेल्या मनुस्मृतील आंबेडकर स्मृतीचा पर्याय दिला. पं. नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे भारतीय स्वातंत्र्याने नियतीशी नवा करार केला. एक नवे पर्व व नवे युग निर्माण करण्याच्या प्रक्रियेचे प्रस्थान डॉ. आंबेडकरांच्या या संहितेने केले.

घटना-परिषदेने घटना-मसुदा समितीची २९ ऑगस्ट १९४७ रोजी निवड केली. श्री. बी. बी. नरसिंगराव या घटना सल्लागाराने घटना-मसुदा समितीच्या विचारार्थ २४३ कलमांचा व १३ परिशिष्टांचा एक प्रस्ताव मांडला होता. या समितीने या प्रस्तावावर चर्चा करून ३१५ कलमे व ८ परिशिष्ट असणारा घटना-मसुदा तयार केला व घटना-परिषदेस सादर केला. घटना-परिषदेतील चर्चा व दुरुस्त्या यांच्या अनुषंगाने मसुदा-समितीने सुधारणा करून ३९५ कलमे व आठ परिशिष्टे समाविष्ट असलेल्या प्रस्तावात राज्य-घटना म्हणून अंतिम स्वरूप दिले. घटना-मसुदा समितीच्या कामकाजाचे बहुतांशी सर्व काम डॉ. आंबेडकरांनाच करावे लागले. कारण या समितीतील अन्य सभासद या नाही त्या कारणाने कामकाजात सातत्याने उपलब्ध होऊ शकले नाहीत. डॉ. आंबेडकरांना उद्याच्या राष्ट्रउभारणीच्या राज्यघटना निर्मितीचे पायाभूत आव्हान बहुतांशी एकट्यानेच स्वीकारणे भाग पडले व आपली प्रज्ञा, प्रतिभा, प्रकृती आणि लोकनिष्ठा पणाला लावून त्यांनी अतिशय परिश्रमाने राज्यघटनेचा मसुदा पूर्ण करण्याचे काम केले. घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद, पं. नेहरू, श्री. फ्रँक ॲन्थनी, श्री. टी. टी. कृष्णम्माचारी इत्यादींनी डॉ. आंबेडकरांच्या या घटना-निर्मितीच्या संदर्भातील कार्यांचा मुक्त मनाने गौरव करून भारतीय जनता त्यांची सदैव ऋणी राहील अशा स्वरूपाच्या कृतज्ञतेच्या भावनाही व्यक्त केल्या होत्या.

## (२) नवराष्ट्राचा वैधानिक पाया :

आधुनिक काळात राज्यघटना हा लोकशाही समाजजीवनाचा पायाभूत कायदा आहे. या कायद्यात देशाची राज्यघटना कार्यान्वित करण्याची प्रक्रिया व पद्धती यांचे दिग्दर्शन असते. शासनसंस्थेच्या कार्यकारिणी, कायदेमंडळ व न्यायदानमंडळ या तीनही विभागांचे स्वरूप, परस्परसंबंध, कार्य व अधिकारक्षेत्र, कामकाजपद्धती यांचे पायाभूत स्थूल विवेचन असते. तसेच व्यक्ती व राज्य यांची सत्ताक्षेत्रे, म्हणजेच व्यक्तीचे हक्क, स्वातंत्र्ये व कर्तव्ये आणि नागरिकाने राज्याचे ऐक्य टिकविण्यासाठी व त्याचे संवर्धन करण्यासाठी कोणती पथ्ये व बंधने पाळली पाहिजे या सर्व संबंधात विवेचन असते. त्याचबरोबर राज्यघटनेच्या उद्दिष्टांची पूर्तता होण्यासाठी निर्माण केलेल्या विविध स्वरूपाच्या संस्था व पदे, त्यांची कार्यपद्धती यांच्या संक्षिप्त तपशीलाचा समावेशही रज्यघटनेत असतो. वैधानिकदृष्ट्या राज्यघटनेतून शासनसंस्थेच्या विविध विभागांना आपापली काय करण्याची सत्ता प्राप्त होते. राज्यघटना हे राजकीय व शासकीय सत्तेचे वैधानिक उगमस्थान आहे. एकूण राज्यघटना राष्ट्राच्या संघटित व विकसनशील

जीवनाचे नियमन व मार्गदर्शन करणारे वैधानिक प्रतिमान असते.

डॉ. आंबेडकरप्रणीत राज्यघटनेने भारताच्या नवराष्ट्रनिर्मितीचा वैधानिक पाया घातला. आधुनिक मूल्यावर आधारलेल्या नव्या राजकीय, सामाजिक संकल्पना व संस्था या राज्यघटनेने प्रत्यक्षात कार्यशील करण्यास सुरुवात केली. या नव्या संकल्पनांचा आशय राज्य-घटनेच्या सरनाम्यात अक्षरबद्ध करण्यात आला आहे. अर्नेस्ट बार्कर या ब्रिटिश राज्यशास्त्रज्ञाने आपल्या 'सोशल अँड पोलिटिकल थेअरीज्' या ग्रंथात सुरुवातीलाच हा सरनामा उद्धृत केला आहे. त्यावरून त्याचे जागतिक महत्त्व कळून येते. भारतीय लोक सार्वभौम आहेत, राजकीय सत्तेचे निर्माते लोक आहेत, स्वतंत्र लोकशाही प्रजासत्ताक निर्माण करण्याचा आणि जनतेला स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय इत्यादी मूल्यांची अनुभूती देण्याचा निश्चय या राज्यघटनेत आम्ही करीत आहोत. अशी उद्दिष्टे या सरनाम्यात व्यक्त केली आहेत. ब्रिटिश राजवटीत राज्यपद्धतीशी आपला संपर्क आला असला तरी, तो मर्यादित होता. सर्व जनतेची समग्र जीवनपद्धती म्हणून लोकशाहीच्या व्यापक पायावर ती राज्यपद्धती उभारली नव्हती. या राज्यघटनेने संघराज्यपद्धती, संसदीय शासन पद्धती, प्रौढ मतदानावर आधारित निवडणूक प्रक्रिया अस्तित्वात आणली. भारतीय पारंपरिक समाजव्यवस्थेत या ना त्या आधारावर नाकारलेले नागरी हक्क, मानवी हक्क, देण्यात आले. राज्य व व्यक्ती-नागरिक यांच्यातील परस्पर-संबंधांची लोकशाही, धर्मनिरपेक्षता आदि मूल्यांच्या अनुरोधाने पुनर्रचना करण्यात आली. मूलभूत हक्क व राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्त्वे या घटनात्मक तरतुदींमुळे तर भारतीय समाजाच्या नवनिर्माणाच्या शक्ती मुक्त होण्याची प्रक्रिया गतिमान होऊ लागली. अस्पृश्यतेचा कलंक, अस्पृश्यता बेकायदेशीर ठरवून दूर करण्याचे वैधानिक सामर्थ्य दिले. घटनात्मक तरतुदींचे मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र न्यायमंडळाची योजना करण्यात आली. पारंपारिक समाजव्यवस्थेला छेद देऊन पुरोगामी परिवर्तनाला चालना देण्याच्या आधुनिक संकल्पनांची व संस्थांची निर्मिती या राज्यघटनेने करून लोकशाही, धर्मनिरपेक्ष, समान व न्याय्य समाजाच्या स्वप्नपूर्तीच्या प्रवासाचा व प्रयासांचा शुभारंभ केला.

राज्य-घटनेत अंतर्भूत असलेल्या या सर्व संकल्पना डॉ. आंबेडकरांच्या विचारविश्वाचा महत्त्वाचा भाग होता. त्यांना अभिप्रेत असणाऱ्या मूल्य व व्यवस्था-परिवर्तनाच्या शक्ती काही प्रमाणात का होईना, पण गतिमान झाल्या. सर्व भारतीयांच्यासाठी एक नवे समाजमंदिर निर्माण होऊ लागले. या नव्या समाज-मंदिराचे वैधानिक प्रतिमान राज्यघटनेच्या रूपाने देण्यात डॉ. आंबेडकरांनी अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली हे अगदी खरे आहे. त्यामुळे डॉ. आंबेडकर व भारताची राज्यघटना हे एक अतूट असे समीकरण स्वातंत्र्यानंतर अस्तित्वात आले.

### (३) घटनाविषयक शल्ये व प्रतिक्रिया :

परंतु याचा अर्थ असा नव्हे की, डॉ. आंबेडकरांची घटनाविषयक सर्व मते व

समाजजीवनविषयक सर्व विचार भारतीय राज्यघटनेत समाविष्ट झाले आहेत. किंबहुना त्यांना अभिप्रेत असणारे काही विचार घटना समितीत नाकारले गेले आणि अमान्य असलेले काही विचार व तरतुदी यांचा समावेश राज्य-घटनेत करण्यात आला आहे. यावरून हे स्पष्ट होते की, डॉ. आंबेडकरांना राज्य-घटनेच्या संदर्भात आपल्या विरोधी विचारांशी तडजोड करावी लागली. घटना समितीत काँग्रेस पक्षाचे बहुमत होते. त्यामुळे काँग्रेसमधील सत्ताधारी हितसंबंधी शक्तींचा प्रभाव घटना-समितीच्या अंतिम निर्णयावर पडणे स्वाभाविक होते. डॉ. आंबेडकरांना अशा महत्त्वाच्या मतभेदांसंबंधी नाइलाजाने, काही ठिकाणी आपल्या मतांचा, विचारांचा आग्रह सोडावा लागला. अमान्य असलेल्या विचाराला वा आशयाला शब्दबद्ध करून राज्य-घटनेत अंतर्भूत करण्याची कसरत त्यांना करावी लागली. या कसरतीत त्यांना अभिप्रेत असणारा आशय निसटला, याचे शल्यही त्यांच्या मनात राहिले. राज्यघटनेच्या अंमलबजावणीच्या पहिल्या दोन-तीन वर्षातच स्वतःच्याच प्रज्ञेने व परिश्रमाने निर्माण केलेल्या राज्य-घटनेसंबंधी ते आपली तीव्र नाराजी व प्रतिकूल मते व्यक्त करू लागले.

१९५३ साली आंध्र राज्यनिर्मितींच्या विधेयकावर बोलताना डॉ. आंबेडकर म्हणाले की, 'मी घटनेचा शिल्पकार नाही, मी केवळ भाडोत्री भारवाहक होतो. आता ही घटना मला जाळाविशी वाटते; कारण ती कोणालाच अनुरूप नाही.' १९५५ सालीही राज्यसभेत ते म्हणाले की, 'देवासाठी बांधले त्या मंदिराचा ताबा सैतानी प्रवृत्तींनी घेतला आहे, तेव्हा ते मंदिर नष्ट करणे गरजेचे ठरते.' अशा प्रकारच्या जळजळीत प्रतिक्रिया डॉ. आंबेडकरांनी स्वतःच व्यक्त केल्या.

१९१९ साली साउथबरो आयोगापुढे दिलेल्या साक्षीपासून ते १९५५ पर्यंतच्या दीर्घ काळात त्यांनी आपली घटनाविषयक मते वेळोवेळी प्रकट केली. त्यात भिन्नता विसंगती आणि अंतर्विरोधही आहेत, याची जाणीव त्यांनाही होती. ते राजकारणी नेते असल्याने सुसंगतीपेक्षा शक्यतेचा, व्यवहार्यतेचा विचार प्रथम करीत. असे असले तरी त्यांच्या घटनाविषयक मतांचा संक्षिप्त मागोवा भारतीय राज्यघटेनच्या काही तरतुदींच्या तुलनेत घेतल्यास त्यांच्या वेगळ्या मतांची कल्पना येऊ शकते. आजच्या संदर्भात त्यांची काही मते समर्पक ठरणार नाहीत. कारण चार दशकात बरेच बदल झाले आहेत. पण काही मते आजही विचारार्ह ठरतील यात शंका नाही.

## (४) घटनाविषयक मतभिन्नता :

भारताची राज्यघटना तयार होत असताना, घटना-समितीत डॉ. आंबेडकरांना बहुमताच्या निर्णयांना, आपल्या मतांना मुरड घालून मान्यता देणे भाग पडले. घटनेचा सरनामा, राज्य व शासनपद्धती, धर्मनिरपेक्षता, समाजवादी आर्थिक कार्यक्रम, मालमत्तेचा मूलभूत हक्क, मतदारसंघ निर्मिती, राष्ट्रपती मंत्रिमंडळसंबंध, अल्पसंख्यांकांचे संरक्षण आदि बाबतीत त्यांची मते भिन्न होती. अस्पृश्य वर्गाचे राजकीय नेते म्हणून त्यांनी व्यक्त केलेली मते हा त्यातील राजकारणातील डावपेचांचा भाग होता. ती

तत्कालीन राजकीय प्रवाहांना प्रतिक्रिया होती. राष्ट्रीय व व्यापक राजकारणाच्या संदर्भात ते आपल्या मतात व विचारात सच्चे लोकशाहीवादी असल्याने बदल करीत. या मत-बदलाला आदर्शतेचे व मूल्यतात्मकतेचे परिमाण होते. त्यांच्या घटनाविषयक विचारांचे आकलन तात्कालिकतेच्या व मूल्यात्मकतेच्या दोन्ही संदर्भातच होऊ शकते. नाहीतर त्यांच्या विचारांचा विपर्यास करून त्यांना अराष्ट्रीय वा प्रतिक्रांतिकारक ठरविले जाण्याची चूक घडण्याचा संभव आहे.

## (५) सरनामा-धर्मनिरपेक्ष-समाजावर संकल्पना :

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यातील संकल्पनांच्या आदर्शत्वाचा जगात कितीही उदो उदो झाला असला तरी, डॉ. आंबेडकरांच्या मते हा सरनामा तितका आदर्श नव्हता. घटना-समितीत पं. नेहरूंनी मांडलेल्या घटनेच्या उद्दिष्टाबाबतच्या ठरावावर हा सरनामा आधारित होता. लोकशाहीत पूर्ण न्याय देण्यासाठी आवश्यक असलेल्या कांही उद्दिष्टांचा स्पष्ट उल्लेख या ठरावात नव्हता. लोकशाही म्हणजे केवळ कायद्यापुढील समानता नव्हे, तर त्या संकल्पनेत आर्थिक व सामाजिक न्याय अंतर्भूत आहे आणि हा आर्थिक न्याय समाजवादी आर्थिक कार्यक्रमाखेरीज शक्य नाही असे डॉ. आंबेडकरांचे मत आपण लोकशाही विषयक प्रकरणात अधोरेखित केले आहे. समाजवादी अर्थरचना ही मूलतः नियोजनबद्ध अर्थव्यवस्था असते. या राज्य-समाजवादी आर्थिक कार्यक्रमांचे स्वरूपही मागे स्पष्ट केले आहे. 'हा आर्थिक कार्यक्रम घटनेत अंतर्भूत केल्यास संसदीय शासनपद्धतीतील संसद व सरकार त्यास बदल करू शकणार नाही', असे ते म्हणत. त्यांना घटनेच्या सरनाम्यात 'धर्मनिरपेक्ष समाजवादी संघराज्य' व घटनेत 'आर्थिक नियोजन' असा स्पष्ट उल्लेख पाहिजे होता. पण बहुसंख्य काँग्रेस पक्षाच्या सभासदांचा विरोध असल्याने तसा स्पष्ट उल्लेख त्या वेळी करता आला नाही. तरी पण राज्य-घटनेच्या चौथ्या भागातील राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्त्वासंबंधांतील कलमात विशेषतः ३८ व ३९ या कलमान्वये समाजवादी विचारांचा अंशतः स्वीकाराची सदिच्छा व्यक्त करण्यास, घटना समितीने मान्यता दिली. तसेच घटनेच्या सातव्या परिशिष्टात समवर्ती विषयात आर्थिक-सामाजिक नियोजन एवढाच अल्पसा उल्लेख करून घटना समितीने त्या वेळी डॉ. आंबेडकरांच्या नियोजनविषयक मतांची बोळवण केली. नियोजन प्रक्रियेला घटनात्मक अधिष्ठान दिले गेले नाही, आज तशा स्वरूपाची मागणी पुढे येत आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

तसेच २५ ते २८ या कलमान्वये धर्मस्वातंत्र्याचा हक्क, मूलभूत हक्क म्हणून मान्य करून व्यक्तीला आपल्या धर्माप्रमाणे उपासनेचे स्वातंत्र्य दिले, सद्सद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य दिले: राज्याचा असा कोणताही धर्म असणार नाही. धर्म ही वैयक्तिक बाब आहे. राज्य सर्व धर्मांकडे समभावाने पाहील. या तरतुदीतून घटना समितीने धर्मनिरपेक्षतेचा उद्देश अप्रत्यक्षतीत्या व्यक्त केला होता. श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यावर बेचाळीसाव्या घटना दुरुस्तीने धर्मनिरपेक्ष व समाजवाद या दोन संकल्पनांचा

राज्यघटनेची उद्दिष्टे म्हणून सरनाम्यात अंतर्भाव करण्यात आला. डॉ. आंबेडकरांना वाटत असणारी उणीव भरून काढली.

## (६) आणखी काही मतभिन्नतेच्या तरतुदी :

मालमत्तेचा अधिकार या मूलभूत अधिकारासंबंधी डॉ. आंबेडकरांचे मतभेद होते. 'हा अधिकार देणारे ३१ वे कलम हे अत्यंत विद्रूप आहे. सामाजिक विकृती व आर्थिक अपप्रवृत्तींना पोषक ठरणारे आहे' असे त्यांनी राज्यसभेत बोलताना सांगितले. मूलभूत अधिकारातील समानतेचा हक्क यातील १७ व्या कलमाने अस्पृश्यता निर्मूलनाची घोषणा केली पण अस्पृश्यतापालनाला कडक शिक्षा करणारा कायदा प्रत्यक्षपणे केल्याखेरीज व अंमलात आणल्याखेरीज ही घोषणा कागदावर राहील हा इशाराही त्यांनी त्यावेळी दिला होता. ग्रामपंचायतींना अधिक सत्ता देण्यासंबंधात, एकसदस्य मतदारसंघ निर्मिती संबंधात, त्यांची मते भिन्न होती. त्यांना अनेक-सदस्य मतदारसंघ, एकत्रित मतदानपद्धती अभिप्रेत होती. त्यामुळे अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व मिळण्याची क्रिया शक्य व सुलभ होईल असे त्यांना वाटत होते. १९५५ साली भाषिक राज्यासंबंधी आपले विचार मांडताना त्यांनी हे मत व्यक्त केले. 'राज्य व शासन संघटन' या शीर्षकाखाली त्यांच्या तत्संबंधी मतांचे विवेचन केले आहे. त्यांना प्रबल केंद्र-सत्ता पाहिजे होती. अमेरिकन संघ-राज्यासारखे भारताचे संघराज्य त्यांना अभिप्रेत नव्हते. तत्कालिन परिस्थितीत काँग्रेसेच्या पक्षनेतृत्वालाही प्रबल केंद्र पाहिजे होते. ते डॉ. आंबेडकरांशी सहमत होते म्हणून निमसंघराज्याच्या स्वीकार करण्यात आला. चाळीस वर्षांतील बदलत्या परिस्थितीबरोबर केंद्र-राज्य सत्तासंबंधांची पुनर्रचना करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. राज्यांना आर्थिक स्वायत्तता देण्याचे आज केंद्र-राज्य नवा समतोल निर्माण करता येईल व संघराज्य वा राष्ट्र यांची अखंडता व एकता कायम राहील. प्रबल केंद्रसत्ता हा आवश्यक समतोल टिकवेल असे आज वाटत नाही. संसदीय शासनापेक्षा अध्यक्षीय शासन पद्धती अधिक स्थिर कार्यक्षम आहे असे त्यांचे मत होते. पण त्यांनी संसदीय शासन पद्धती मान्य केली व ती मान्य करताना व तिचे समर्थन करतानाही त्यांनी त्या पद्धतीसंबंधी त्यांनी केलेले इशारे व धोके आज काही प्रमाणात खरे ठरत आहेत. पक्षांतरबंदीचा कायदा करूनही भ्रष्ट मार्गांचा अवलंब करून घाऊक पक्षांतर करण्याची प्रवृत्ती वाढते आहे व अशासारख्या अन्य मार्गाने आधारभूत संसदीय संस्थांचे अवमूल्यन होत आहे. अशा धोक्यापासून संसदीय शासनपद्धतीचे संरक्षण करण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे हा त्यांचा इशारा आजही उपयुक्त आहे. मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतीवर बंधनकारक आहे की नाही याबद्दल घटनेत स्पष्ट उल्लेख असावा असे मत डॉ. राजेंद्रप्रसादांनी व्यक्त केले होते. त्या वेळी डॉ. आंबेडकरांनी सांगितले की, तसा स्पष्ट उल्लेख असावयाचे कारण नाही. कारण 'राष्ट्रपतीची कार्ये पार पाडताना' या शब्दसंहितेत मंत्रिमंडळाचा सल्ला बंधनकारक आहे हे अंतर्भूत आहे; पण यासंबंधात तीव्र मतभेदाच प्रसंग निर्माण होत असल्यास

तसा स्पष्ट उल्लेख करावा लागेलही. कालांतराने ४४व्या राज्यघटना दुरुस्तीने हा उल्लेख करावा लागला.

## (७) अल्पसंख्यांक जाती-जमाती व आरक्षण :

अस्पृश्य वर्गाच्या राजकीय शक्तीचे नेते म्हणून डॉ. आंबेडकर त्यांच्या विविध हितसंबंधांच्या रक्षणासाठी आयुष्यभर कार्यरत राहिले. अनुसूचत जाती-जमातीसह सर्व अल्पसंख्यांकांना सर्वांगीण उत्कर्षासाठी, घटनात्मक सरंक्षण प्राप्त करून घेण्यासाठी ते घटना-परिषदेत आले. अनुसूचित जाती-जमातींना कोणत्या संरक्षक तरतुदी पाहिजेत याचा तपशील त्यांनी शे. का. फेडरेशनतर्फे घटना-परिषदेत सादर केलेल्या दीर्घ निवेदनात (राज्ये आणि अल्पसंख्यांक) आलेला आहे. त्याचा उल्लेख मागे आला आहे. त्यापैकी राज्यघटनेने लोकसंख्येच्या प्रमाणात कायेदमंडळात व सरकारी नोकऱ्यात प्रतिनिधित्व द्यावे, शिक्षणाची जबाबदारी सरकारने घ्यावी या महत्त्वाच्या तरतुदी मान्य केल्या. १९४३ -१९४५ साली हे प्रमाण ८.३३% व १२.५०% निश्चित करण्यात आले होते. राज्य-घटनेत लोकसंख्येचे प्रमाण हा आरक्षणाचा आधार मानण्यात आला. परंतु याच वेळी सामाजिक-शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांच्या निश्चित निकषासंबंधी, अर्थाविषयी घटना-समितीत एकमत न झाल्याने, त्यासंबंधी राष्ट्रपतीने आयोगाची नियुक्ती करून सरकारला शिफारशी कराव्यात असे ठरविण्यात आले. त्यानुसार कालेलकर आयोग (१९५१) व मंडल आयोग (१९७८) नियुक्त करण्यात आले. घटना समितीत आरक्षणाच्या संदर्भात ज्या वेळी चर्चा चालू होती, त्या वेळी डॉ. आंबेडकरांनी हे स्पष्ट केले होते की, ५०% पेक्षा अधिक जागा आरक्षित असू नयेत. कारण त्यामुळे संधीची समानता हे लोकशाहीचे तत्त्व उल्लंघित होते. म्हणून अल्पसंख्य जागांसाठीच, म्हणजे ५०% पेक्षा कमी जागासाठी आरक्षण असावे. पुढे सर्वोच्च न्यायालयानेही असाच निर्णय दिला. डॉ. आंबेडकरांनी सरकारी नोकऱ्यातील आरक्षणाला दहा वर्षांच्याच मुदतीला मान्यता दिली होती. डॉ. आंबेडकर हे जरी अल्पसंख्यांक जाती-जामतीच्या संरक्षणाच्या तरतुद'संबंधी दक्ष होते, तरी या जाती सतत अल्पसंख्यांक रहाव्यात असे त्यांना वाटत नव्हते. तसेच बहुसंख्यांकांचीही जातीय राजवट कायमची राहू नये अशी त्यांची धारणा होती. बहुसंख्यांकांनी सत्तेच्या जोरावर अल्पसंख्यांकाची गळचेपी करू नये, तसेच अल्पसंख्यांकांनीही बहुसंख्यांकांच्या निर्णयसत्तेचा आदर करावा ही गोष्ट लोकशाहीची कसोटी आहे, असे डॉ. आंबेडकर मानत. जातीय बहुसंख्याक-अल्पसंख्यांक हे राजकीय बहुसंख्यांक-अल्पसंख्यांकांमध्ये संक्रमित होणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणाऱ्या लोकशाही समाजवादाच्या विचाराने व मार्गाने होणारे संक्रमण म्हणजेच समग्र व आमूलाग्र समाजक्रांती होय.

☐ ☐ ☐

संदर्भ :

(१) Dr. Babasaheb Ambedkar : Write-up and Speeches, Vol. 1 (1979), Vol. 3 (1987), Vol. 3 (1989), Govt. of Maharashtra Bombay

(२) डॉ. आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूक नायक : महाराष्ट्र शासन प्रकाशन, मुंबई, १९९०

(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : श्री. धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९९०

(४) डॉ. भीमराव आंबेडकर चरित्र-खंड १ ते ७ : श्री. खैरमोडे चां . भ.

(५) समग्र आंबेडकर चरित्र - खंड १ ते ६ : श्री. बी. सी. कांबळे (लेखक व प्रकाशक)

(६) आंबडकर आणि मार्क्स : श्री. रावसाहेब कसबे, सुगावा प्रकाशन, पुणे १९८९.

(७) डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार : श्री. रावसाहेब कसबे, सुगावा, दिवाळी अंक, पुणे, १९९०.

(८) गांधी आणि आंबेडकर : श्री. गं. बा. सरदार, सुगावा प्रकाशन, पुणे.

(९) आंबेडकरी चळवळ : श्री. य. दि. फडके, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९०.

(१०) भारतीय आणि पाश्चिमात्त्य राजकीय विचार : डॉ. भा. ल. भोळे, पिंपळापुरे आणि कं. पब्लिशर्स, १९८९.

(११) Indian Idea of Political Resistance Aurobindo, Tilak, Gandhi & Ambedkar : Shri Ashok Chausalka, (Ajanta Books International, Delhi - 1990.

(१२) Political Ideas and Leadership of Dr. Ambedkar : Dr. Kavalekar and Dr. Chauskar, Shivaji University Kolhapur, Publisher : Viswani Publication Pune - 1989.

(१३) डॉ. आंबेडकर यांचे विचार : प्रा. सुहास पळशीकर, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, १९९१.

(१४) आंबेडकरांचे समाजचिंतन : श्री. फडके भा. दि. (संपादक, मॅजेस्टिक, आणि मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, १९८९.

(१५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि म. गांधी : श्री. वसंत पळशीकर, साधना साप्ताहिक, अंक दि. २२ व २९ जून १९९१, पुणे.

(१६) Journal Maharashtra Political Science : Phule-Ambedkar Number\ Vol. 3 - 1990.

(१७) डॉ. आंबेडकर आणि भारताची राज्यघटना : श्री. य. दि. फडके : महाराष्ट्र टाइम्स, मुंबई, रविवार, १४ एप्रिल १९९१.

□ □ □

124312
31.3.08

## आमची इतर प्रकाशने

- ❑ **जोतीबा फुले आणि** स्त्री-मुक्तीचा विचार
  डॉ. गेल ऑम्व्हेट — २० रु.
- ❑ **महात्मा फुले यांचे शैक्षणिक** कार्य
  प्रा. तानाजी ठोंबरे — २० रु.
- ❑ **महात्मा फुले आणि शेत**करी चळवळ
  डॉ. अशोक चौसाळकर — २० रु.
- ❑ **जोतीरावांची समता-संकल्पना**
  भास्कर लक्ष्मण भोळे — २० रु.
- ❑ **महात्मा फुले आणि** सांस्कृतिक संघर्ष
  भारत पाटणकर — २० रु.
- ❑ **महात्मा फुले आणि धर्म**
  प्रा. आ. ह. साळुंखे — २० रु.
- ❑ **डॉ. आंबेडकर यांचे** राजकीय विचार
  प्रा. म. द. देशपांडे — ३० रु.
- ❑ **डॉ. आंबेडकरांच्या** सामाजिक आणि राजकीय चळवळी
  कृष्णा मेणसे — ३० रु.
- ❑ **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे** यांचे आर्थिक आणि
  **सांस्कृतिक विचार** / पी. डी. दिघे — ३० रु.
- ❑ **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे** यांच्या
  **राजकीय व सामाजिक चळव**
  तानाजी ठोंबरे
- ❑ **विठ्ठल रामजी शिंदे यांचे** बहुज
  भा. ल. भोळे
- ❑ **आगरकरांचे राजकीय विचार** / डॉ. अशोक चौसाळकर — ४० रु.
- ❑ **आगरकरांचे धर्मचिंतन** / भा. ल. भोळे — ४० रु.
- ❑ **आगरकरांचे सांस्कृतिक** आणि साहित्यविषयक विचार
  प्रा. तानाजी ठोंबरे — ४० रु.

Library IIAS, Shimla
MR 923.2 Am 16 D
00124312

---

मूल्य : ३० रुपये

ISBN 81-86995-95-1